म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंधी
सं. नं. ५०५८

ा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.

# य-गीतारहस्य

अर्थात्

# लो॰ टिळक यांचीं व्याख्यानें.



REFBK-0001518

प्रकाशक—भावे आणि मंडळी, होमरूल ...

ठाकुरद्वार-मुंबई.

# स्वराज्य-गीतारहस्य.

अर्थात्

# लो० टिळक यांचीं व्याख्यानें.

भाग १ ला.

प्रकाशक—

**भावे आणि मंडळी.**

बुकसेलर्स, पब्लिशर्स, ठाकुरद्वारनाका—मुंबई.

सन १९१८.

किंमत ८ आणे.

REFBK-0001518
सं.नि. २८२
१५१८

# अनुक्रमणिका


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| चोपडें | येथील | व्याख्यान, | पृष्ठ | ... | ... | ५— |
| अंमळनेर | ,, | ,, | ,, | ... | ... | १२—१ |
| जळगांव | ,, | ,, | ,, | ... | ... | १६—१ |
| धुळें | ,, | ,, | ,, | ... | ... | २०—२२ |
| ,, | ,, | ,, | ,, | ... | ... | २३—२६ |
| पेण | ,, | ,, | ,, | ... | ... | २७—३१ |
| लोणावळें | ,, | ,, | ,, | ... | ... | ३२—३८ |
| बेळगांव | ,, | ,, | ,, | ... | ... | ३९—६० |
| नगर | ,, | ,, | ,, | ... | ... | ६१—७७ |
| ,, | ,, | ,, | ,, | ... | ... | ७८-१०४ |



मुद्रक—रा. चिंतामण सखाराम देवळे, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ
इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँढर्स्ट रोड, गिरगांव—मुंबई,
येथें पृष्ठें ३९ पासून १०४ पर्यंत छापिलीं.

बाकीचें सर्व पुस्तक—कृष्णराव सखाराम पाटकर, श्रीलक्ष्मीनारायण प्रेस
४०२ ठाकुरद्वार—मुंबई, येथें छापिलें.

प्रकाशक—सखाराम केशव भावे,
ठाकुरद्वार नाका—मुंबई.

# प्रस्तावना हवी कशाला !

लो० टिळकांच्या व्याख्यानांचा संग्रह प्रसिद्ध करतांना त्याच्या अगोदर दोन प्रस्ताविक शब्द लिहिण्याची विनंति श्री० भावे आणि मंडळी यांनीं मला केली. तेव्हां मी त्यांना उलट कळविलें कीं या व्याख्यान संग्रहास प्रस्तावनेची बिलकूल जरूरी नाहीं. व्याख्यानांचा प्रणेता अप्रसिद्ध असता व त्याची योग्यता महाराष्ट्रीय वाचकांस माहीत नसती; किंवा त्यानें प्रतिपादिलेला विषय गहन असता, भाषा दुर्बोध असती किंवा प्रतिपाद्य विषयाची मांडणी करितांना व्याजोक्ति व्यंग्योक्ति किंवा उपरोधिक भाषा यांचा उपयोग करून आपला मुद्दा भाषेच्या पालवीखालीं लपविण्याचा प्रयत्न केला असता, तर तशा व्याख्यानांस स्पष्टीकरण-रूप प्रस्तावना जोडणें अवश्य झालें असतें. परंतु लोकमान्यांच्या व्याख्यानांना वरील एकही कारण लागूं पडत नाहीं. व्याख्यानें अप्रसिद्ध नाहींत. त्यांच्या इतका लोक-प्रसिद्ध व लोक-प्रिय पुरुष महाराष्ट्रांतच काय, पण साऱ्या हिंदुस्थानांत गेल्या १०० वर्षांत कोणी झाला नाहीं व पुढें कधीं होईल तें सांगतां येत नाहीं ! 'टिळक' हें नांव महाराष्ट्रांतील प्रत्येक 'अडाणी' व निरक्षर शेतकऱ्यांससुद्धां माहीत आहे–प्रत्येकाच्या हृदयसंपुटांत प्रेमपूर्वक, आदरपूर्वक सांठविलेलें आहे. तेव्हां त्यांची ओळख वाचकांस करून देण्याची जरूरी नाहीं. बरें, त्यांच्या व्याख्यानांचा विषय दुर्बोध आहे असें म्हणावें, तर तेंही खरें नाहीं. लोक-मान्यांना आपला विषय सुबोध करण्याची हातोटी जशी साधली आहे, तशी दुसऱ्या कोणाखही साधलेली नाहीं. त्यांच्या भाषणांत व्याजोक्ति नाहीं; व्यंग्योक्ति नाहीं; उपरोधिक भाषा नाहीं. लपवाछपवी नाहीं. त्यांचें भाषण कोणाही खेडवळाला–कोणाही निरक्षाला सुद्धां सहज समजेल. इतकें सुबोध, सोपें, स्पष्ट, पारदर्शक व जोरदार भाषण करणारा वक्ता हिंदुस्थानांत दुसरा नाहीं. तेव्हां

अशा भाषणांचें हुद्गत कळविण्यास प्रसतवना लिहिण्याची आवश्यता नाहीं; कदाचित् असलीच, तर तशी प्रस्तावना दुसऱ्या कोणास लिहितां यावयाची नाहीं. 'स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ।' या न्यायानें ती खुद्द लोक मान्यांनींच लिहावयास पाहिजे ! पण त्यांच्या व्याख्यानांत त्यांचा विषय इतका ठांसून पुढें मांडिला आहे कीं त्यांनीं स्वतः प्रस्तावना लिहिली, तरीदेखील त्यांच्या व्याख्यानांतीलच कांहीं भागांचा हवाला देऊन ते आपला त्रोटक प्रस्तावनालेख आटोपतील, असा मला भरवंसा वाटतो. सारांश काय कीं सदर व्याख्यानसंग्रहास प्रस्तावनेची बिलकूल आवश्यकता नाहीं. वाचकांनीं हीं व्याख्यानें प्रस्तावनेशिवायच वाचावीं. त्यांची कोठेंच दिशाभूल व्हावयाची भीति नाहीं !

सदर व्याख्यान-संग्रहांत आलेलीं व्याख्यानें मोठ्या मार्मिकपणें निवडलीं आहेत. १९१६ सालीं बेळगांवास महाराष्ट्रीय स्वराज्यसंघ स्थापन झाला, तेव्हांची लोकमान्यांचीं व्याख्यानें व नंतर लगेच अहमदनगरास झालेलीं व्याख्यानें हीं दिलीं आहेत त्यांत स्वराज्य संघाचे उद्देश, त्याच्या कार्याची रूपरेषा व संघाचीं जरूरी विशद हीं केलीं आहेत. सदर व्याख्यानांवर आक्षेप घेण्यांत आला होता. पण, हायकोर्टानें तीं निर्दोष ठरविलीं. त्यानंतर विलायतेंतील वातावरणांत फरक होऊन स्टेट सेक्रेटरींनीं स्वतःच स्वराज्यसंघाची मागणी हेंच ब्रिटिश अमलाचें ध्येय असल्याचें जाहीर केलें व मि. मांटेग हे स्वतः हिंदुस्थानांतील लोकमताची नाडी तपासण्यासाठीं व लोकमताचा कानोसा घेण्यासाठीं हिंदुस्थानांत आले. त्यानंतर लोकमान्यांचीं जीं भाषणें झालीं, त्यांतलीं निवडक निवडक भाषणें यांत दिलीं आहेत. चोपडें व लोणावळें येथील भाषणें हीं लोकमान्यांचे अगदीं ताजे उद्गार आहेत. तेव्हां हें पुस्तक समग्र वाचल्यास गेल्या २।३ वर्षांतील स्वराज्याच्या चळवळीची प्रगति व विकास, व ती यशस्वी होण्याचीं प्रसादचिन्हें यांची माहिती वाचकांस सहज होईल. स्वराज्य प्राप्ति हा एकच हिंदुस्थानाचा अजचा मनोरथ आहे. तेंच हिंदीराष्ट्राचें प्रामण्य आहे. तोच हिंदीराष्ट्राचा धर्म आहे.

या सद्यःकालीन धर्मांचें रहस्य सांगणारा व्यास लोकमान्याखेरीज दुसरा कोण सांपडणार ! म्हणून हीं व्याख्यानें ह्मणजे सद्यःकालीन धर्मांचें 'गीतारहस्य' आहे. तें प्रत्येक महाराष्ट्रीयानें वाचलें पाहिजे; निदान ऐकिलें तरी पाहिजे. तें रहस्य लोकांत पसरावें म्हणून सध्यांच्या कागदाच्या दुष्काळांतही त्या रहस्याचा प्रारंभ व त्याचा उत्तरभाग हे दोन्ही संग्रहीत करून अल्प किंमतींत महाराष्ट्रीय वाचकांच्या हातीं देण्याचें श्री. भावे मंडळीनें ठरविलें याचा आनंद वाटतो. आणि हें स्वराज्य गीतारहस्य महाराष्ट्रीय वाचक आपल्या घरांत व हृदयांत सांठवून ठेवतील अशी मी उमेद बाळगितों. कारण, यांत सर्व धर्मांचें सार आहे. आचारशास्त्राचें हृतद्र आहे. टिळांचें अंतःकरण यांत ओतलेलें आहे. यांत राष्ट्राचे मनोरथ-व स्वराज्याचे डोहाळे-एकवटले आहेत. हें सर्वांनीं समजून घेतलें पाहिजे. यापेक्षां अभिलाषणीय तें दुसरें काय असणार ?

गोपाळ अनंत ओगले.

मुंबई, ता० १४ फेब्रु० १९१८.

# प्रकाशकांचे दोन शब्द.

युरोपखंडांत यदृच्छेनें उद्भवलेल्या महायुद्धामुळें लोकनियंत्रित राज्यपद्धतीचें तत्व ब्रिटिश साम्राज्यास मान्य करावें लागलें व त्यामुळें आपल्या हिंदुस्थानदेशांत 'होमरूल'च्या चळवळीची जी प्रचंड लाट उसळली आहे, तिच्या कारणाची व 'होमरूल'च्या साध्यासाध्यतेची चर्चा लो. टिळक यांच्या भाषणांत जितक्या सुगम आणि पायाशुद्ध रीतीनें करण्यांत आली आहे, तशी दुसऱ्या कोणत्याही वक्त्याच्या भाषणांत केलेली क्वचितच आढळून येईल. अशा स्थितींत ह्या उत्कृष्ट 'होमरूल'-विषयक वाङ्मयाचा जितका अधिक प्रसार होईल तितकें सर्वसामान्य जनतेचें 'होमरूल'च्या चळवळीस अधिक पाठबळ मिळेल हें लक्षांत घेऊन, या पुस्तकांत लोकमान्यांच्या होमरूल–विषयक निवडक व्याख्यानांचा आम्हीं मुद्दाम संग्रह केला आहे. आणि हें पुस्तक आम्हीं अगदीं अल्प किंमतींत देत आहों. पुस्तक लौकर छापून दिल्याबद्दल 'श्रीलक्ष्मी–नारायण' छापखान्याच्या मॅनेजरांचे व पुस्तकाचीं प्रुफें काळजीपूर्वक वाचल्याबद्दल रा. जगन्नाथ र. आजगांवकर यांचे, त्याचप्रमाणें रा. ओगले यानीं वेळ नसतांही आपला अमूल्य वेळ खर्च करून प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचे आम्ही फार आभारी आहों. त्याचप्रमाणें इतर सद्गृहस्थांनीं या पुस्तकाचे बाबतींत जी मदत केली त्यांत रा. बल्लाळ यांचे नांवाचा उल्लेख करणें जरूर आहे.

**भावे आणि मंडळी,**

**बुकसेलर्स, पब्लिशर्स, मुंबई.**

# स्वराज्य गीतारहस्य

## अर्थात्

# लो० टिळक यांचीं व्याख्यानें.

## १. चोपडें येथील व्याख्यान.

" अध्यक्षमहाराज, मानपत्रावर सही करणारे गृहस्थ व बंधुभगिनींनो, आपण मला जें मानपत्र व होमरूलला थैली अर्पण केलीत त्यावरून असे समारंभ करण्यांत चोपडेकर मंडळी बरीच तरबेज झाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. स्वराज्याचें प्रेम अंतःकरणांत असल्याखेरीज इतकी मंडळी या उत्साहांत सामील होणें शक्य नाहीं; मी फक्त या उत्साहाचें प्रदर्शन करण्यापुरता निमित्त झालों आहें. स्वतंत्रतेची बुद्धि प्रत्येक मनुष्यमात्रांत आहेच. उघड आहे कीं मी आपल्या निमंत्रणाबद्दल आभारी आहें. शेट गंगादास यांनीं प्रथमच कबूल केलें होतें कीं मिरवणूक वगैरे होणार नाहीं पण ती गोष्ट झाली याबद्दल मी त्यांना दोष देत नाहीं. हें मानपत्र कोणाला दिलेंत ? मला का होमरूलला ? मला ह्मणावें तर थैली होमरूलला व होमरूला ह्मणावें तर नांव माझें ! याचा मेळ असा घालतां येईल कीं स्वराज्य-देवतेची पूजा करण्याकरितां मला दगड बनविलें असावें. मूर्ति कसलीही असो. भावना पवित्र पाहिजे. माझ्या अंगांत जरी गुण नसले तरी

### भावनेचें फळ

तुह्मांला मिळाल्याशिवाय राहणार नाहीं हें मी शास्त्राधारें सांगूं शकतों. या मूर्तीला विसरा व भक्तीला दृढ करा. भावना दृढ असली ह्मणजे उपासनेचें फळ मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. स्वतंत्रता हा तरी परमेश्वराचाच गुण होय. पूर्ण स्वतंत्र फक्त परमेश्वर आहे. सार्वजनिक चळवळ ही दहापांच पुढारी लोकांची गडबड किंवा बडबड नव्हे. या चळवळ करणाराच्या मनांत स्वार्थबुद्धि नसून परमेश्वरी प्रेरणा असते. अशी प्रेरणा पहिल्यानें ज्यांना होते ते धन्य होत. अशी या कार्याच्या ठिकाणीं श्रद्धा ठेवाल तर ती कधींहि निष्फळ होणार नाहीं. मानपत्रांत गुणांचें बरेंच

वर्णन आहे. पण तो माझ्यावर गुणांचा अध्यारोप आहे. अध्यारोप हा खोटा ख
पण त्याचा उपयोग असतो. अमक्यानें अमुक केलें असें म्हणतां तर तें तुम्ही
करीत नाहीं ? तें तुम्हालाहि करतां येईल. याचा सर्वांस उपयोग इतकाच
त्यानें कर्तव्याची आपल्या मनांत जागृति उत्पन्न होईल. या

## कर्तव्याचा उदय

झाला आहे हें या थैलीवरून दिसतें. हें कार्य व्यापारी, हिंदु, मुसलमान यां
मिळून केलें आहे. मला वार्धक्य आलें आहे असें मानपत्रांत लिहिलें आहे. प
देह काहीं बरोबर वर जात नाहीं. देह हा धर्माकरितां झिजला म्हणजे कार्य झालें
अशी बुद्धि असली म्हणजे देह जीर्ण झाला तरी आपण तरुणच असतों. मला खालच्या
वातावरणांत यायचें नाहीं. माझें करणें आपणाला बरें वाटत असलें तरी ठीक आ
व नसलें तरी ठीकच आहे. माझ्या प्रेरणेप्रमाणें मी करतों. ती प्रेरणा मला
थोर महात्म्यापासून मिळाली आहे. तीच प्रेरणा आपणांला होवो.

मुख्य विषय स्वराज्याचा आहे. हा विषय असा आहे कीं तो दहा व्याख्
नानींसुद्धां पुरा पडावयाचा नाहीं. दुसरें असें कीं ज्याप्रमाणें कीर्तन ए
मोक्ष मिळत नाहीं त्याप्रमाणेंच व्याख्यानें ऐकून स्वराज्य मिळणार न
व्याख्यानाला आपण आलां पण काम तें पुढेंच आहे. स्वराज्य हें अ
करणांत जळलें पाहिजे. ( टाळ्या. ) त्यानंतर मुख्य गुण म्हणजे नि
व संकटांना हाणून पाडण्याची बुद्धि लागते. संकटांना जुमानलें नाहीं म्ह
जेच देवता 'वरंब्रूहि' म्हणत. ( टाळ्या. ) तुम्ही या कार्याला लागा. व आपल्या
देशबान्धवांना लावा. प्रयत्न करून आपला हक्क शाबीत करा. स्वराज्य वस्तू लहान
पण त्याला फार कष्ट पडतात. परमेश्वराचें नुसतें वर्णन ऐकून मोक्ष मिळत नाहीं.
त्याला जिवाची

## तळमळ लागते.

तशीच गोष्ट स्वराज्याचीहि आहे. स्वराज्याच्या चळवळीचें सार काय तें प्रथ
लक्षांत आणा. आपण मनुष्य आहों व पशु नाहीं हें प्रथम मनांत ठसलें पाहिजे
'नर करणी करे तो नरका नारायण होय' एवढें मनुष्याचें म[illegible] [illegible]
बलाच्या साधनानें मनुष्य परमेश्वर बनूं शकतो. उद्योग [illegible] आहे. आत्मिक
दोन चाकें होत. दैव हें तिसरें चाक कोणी म्हणत[illegible] व निश्चय हीं परमेश्वरप्राप्तीचीं
आढळलें नाहीं. उद्योग करून यश आलें नाहीं [illegible]त. पण तें मला आजपर्यंत
तरीहि दैव नाहीं. दैव अनुकूल

न घेण्याकरितां पुनः उद्योग केला पाहिजे. उद्योगापुढें दैवाला केव्हां तरी माघार घ्यावीच लागते. उद्योग करा व स्वराज्य कसें मिळत नाहीं तें पाहूं हा निश्चय करा. उद्योग झाला म्हणजे परमेश्वराचा पदर धरून त्याला विचारूं. ( टाळ्या. ) त्यापूर्वी उद्योग झाला पाहिजे. आज स्वराज्य म्हणजे काय हें समजावून सांगावें लागतें हें देशाचें सुलक्षण नाहीं. स्वराज्य हे तुम्हांला जन्मतःच कळलें पाहिजे होतें. ज्यांनीं स्वराज्य चालविलें जिंकलें अशा लोकांचे वंशज आहां हें लक्षांत आणा. तुम्ही स्वराज्य विसरलां हा

## राज्यपद्धतीचा दोष.

आहे. ( टाळ्या ) हा काळ, ही परिस्थिति ज्यांच्या हातांत राज्य त्यांनीं उत्पन्न केली. लोकांमध्यें दम नसावा, हुरूप नसावा, अशी स्थिति उत्पन्न करणारी ही राज्यपद्धति आहे. दोष जसा राजाचा, तसा तो अंशतः आमचाहि आहे. अशी स्थिति आम्हीं कां होऊं द्यावी ? राजा काय किंवा त्याचें मंत्रिमंडळ काय हीं आम्हीं उत्पन्न केलीं आहेत. राजा व प्रजा, स्वामी व गुलाम हीं नातीं मूळचीं नाहींत. तीं आम्ही आपल्या कल्याणाकरितां उत्पन्न केलीं आहेत. राज्यव्यवस्था ही आमच्या कल्याणाकरितां आहे. वेनराजा बिघडला तेव्हां त्याला ब्राह्मणांनीं धरून आणिला व त्याच्या हें मथून दुसरा राजा निर्माण केला. दुसरें उदाहरण इंग्रज इतिहासांत आहे. राजा व प्रजा हें नातें प्रजेच्या हिताकरितां आहे. राजाला नम्रतेनें पण निर्भीडपणें सांगणें हें

## प्रजेचें कर्तव्य.

आहे. हिंदु व मुसलमान राज्यें गेल्यावर इंग्रजी राज्य झालें. गेल्या १०० वर्षांत काय झालें ? प्रजेला जें स्वातंत्र्य होतें तें या राज्यानें कमी कमी करीत आणिलें आहे. पूर्वी अशी स्थिती होती कीं प्रत्येक गांवानें आपली व्यवस्था पहावी. या गोष्टी राजानें ठरविल्या नाहींत, त्या धर्मानें ठरविल्या आहेत. या गोष्टी पूर्वी आमच्या स्मृतिकारांनीं ठरविल्या होत्या. या राज्यांतील गोष्टी जरा विचित्र आहेत. पूर्वी जमिनीवर राजाची सत्ता नव्हती. पण ती आज आहे. आज आमजे सभासद कौन्सिलांत आहेत. पण त्यांना बोलण्यापलीकडे हक्क नाहीं. जमिनीचा कायदा झाला तेव्हां फेरोजशहा वगैरे उठून गेले. त्यावर अशी टीका टाइम्सनें केली कीं

आहें. आजच्या सभेला एक श्रीमंत व उदार व्यापारी अध्यक्ष मिळाले हें मी सुदैव समजतों. आज असें निघालें आहे कीं आह्मी व्यापारी मागसलेले ! कारण काय तर इंग्रजी लिहितां येत नाहीं ! नसेल सही करतां येत पण व्यापार तर येतो कीं नाहीं ? सही करतां येत नाहीं पण शिवाजीला कोठें सही करतां येत होती ? त्या विषयीं अजून संशयच आहे. मागसलेला कोण ? आमचें सरकारसुद्धां मागसलेलें, राजासुद्धां मागसलेला. इंग्रजांपुढें आम्ही सारेच मागसलेलें आहों. हा मागसलेला, हा पुढें गेलेला हा बुद्धिभेद उराशीं बाळगाल तर

## देशाचा नाश.

कराल. ज्याच्या जवळ जें असेल तें भारतमातेला पाहिजे आहे. श्रीकृष्णांनी करांगुलीवर पर्वत उचलला पण त्याला गवळयांनीं काठ्या लावल्या होत्या. परमेश्वर सर्व घडवून आणतो पण तुम्हीं आपल्या काठ्या लावण्यास तयार असलें पाहिजे. कोणाची काठी वेळूची असेल तर कोणाची रुप्याची असेल. साम्राज्याचे सर्व अवयव टुमटुमीत, स्वतंत्र आहेत पण हा फार मोठा एकच अवयव अर्धांगवायूनें बधिर आहे. हा रोग जाण्याला परिश्रमानें केलेलें नारायण तेल पाहिजे आहे, हें साम्राज्य आज एकाच कानानें ऐकत आहे व एकाच डोळ्यानें पहात आहे. या देशाचा हा मोठा अवयव झाला तर त्यांत साम्राज्याचाहि फायदाच आहे. आम्हीं केवळ

## आपलपोटे नाहीं.

सबंध मिळेल तरच तृप्त होऊं. कोणी म्हणतात तुह्मी नालायक ! काय आह्मांला डोळे नाहींत, का कान नाहीत कीं शेपटें आहेत ? आह्मीं जाणते आहोंत ही जाणीव आतां उत्पन्न झाली आहे. आह्मीं चुकूं म्हणतात ! पण चुकल्याशिवाय तरी तुह्मी कोठें सुधारलां होता ? चुका तुम्हांला सोडीत नाहींत. एवढेंच नव्हे तर तो आमचा हक्कच आहे. ( हंशा ) चुकीचा अनुभव आला तरच शहाणपणा येतो. एका कवीनें म्हटलें आहे कीं परमेश्वर जग निर्माण करण्यांत चुकला ! एवढी चुकी करण्याचें परमेश्वराला काय कारण होतें ? आह्मांला चुक्या करून शहाणें व्हावयाचें आहे. तुम्हांला ४ आणे देऊं २ आणे देऊं, या वचनांनीं व फुसलावणीनीं आम्हीं फसणार नाहीं, स्वराज्य मिळाल्याशिवाय आह्मी स्वस्थ बसणार नाहीं, संतुष्ट होणार नाहीं या दोन गोष्टी शिका. स्वराज्य तुला हवें ? हो, मला हवें, तो माझा हक्कच आहे, असें तुम्हांला कोणाहि अंमलदारापुढें सांगितलें पाहिजे. आम्हांला इंग्रजांशीं, मुसलमानांशीं, पार्श्यांशीं,

कोणाशींहि भांडावयाचें नाहीं. सर्वांनाच प्रिय गोष्ट जी स्वतंत्रता ती आह्मांला पाहिजे. या खटपटींत आह्मांला मदत करा, स्वराज्यशाखेचे सभासद व्हा, त्यांत आम्हीं १ रु. पेक्षां दरसाल जास्त मागत नाहीं. एवढें तुमच्या हातून होत नसेल तर नाइलाजाची गोष्ट आहे. पुढें उद्योग करणारे दुसरे आहेत, त्यांना मदत करा; एवढेंच आमचें तुमच्याजवळ मागणें आहे. जे कष्ट सोशीत आहेत

## त्यांना धीर द्या,

पुढाऱ्याला चुकी करण्याची बुद्धि होऊं नये इतका त्याला तुम्हीं पाठिंबा द्या. तुम्हीं शिकलेले असा वा नसा, एवढें तुम्हीं सांगूं नये काय कीं आम्हीं राष्ट्रीय सभेच्या मागणीला अनुकूल आहों. एवढीहि गोष्ट तुम्हांला करावयाची नसेल, तर हिंदुस्थानांत जन्मास फुकट आलां असें आर्यभू म्हणेल! स्वराज्य झालें म्हणजे ब्राह्मण वैश्यांना छळील, हिंदू मुसलमानांना छळील, या कल्पना कोठून आणल्यात? असें कोणी छळील असें मानलें तरी त्याला काढावयाचा अधिकार तुह्मांला आहे ना? दोन दोन वर्षांनीं अधिकाऱ्यांना काढण्याचा आम्हांला अधिकार मिळाला म्हणजे मी स्वराज्य मिळालें असें म्हणेन. मागें गव्हरनरसाहेब म्हणाले कीं 'माझ्या मागेंहि डिटेक्टिव्ह आहेत.' पण नामदारसाहेबांच्या मागें जसा डिटेक्टिव्ह तसा आमच्या मागें आला तर स्वराज्यच मिळालें. मामलेदाराच्या मागें दोन पोलीस आणि चोराच्याहि मागें पोलिस! मग हें काय सारखें झालें? ( हंशा ) पोलिस काढण्याचा किंवा ठेवण्याचा अधिकार लोकांचा पाहिजे. हल्लींची व्यवस्था तुह्मांला

## हितकारक नाहीं,

साम्राज्याला हितकारक नाहीं, पृथ्वीलाहि हितकारक नाहीं. तुह्मी जी थैली दिली तिचा उपयोग स्वराज्याकडेच होणार. तुम्हीं आज वित्त दिलें पण चित्त द्या. बाराखडींत 'च' अगोदर आहे 'व' मागून आहे. जो परमेश्वर रामकृष्णांच्या रूपानें हिंदुस्थानांत जन्मास आला तो तुम्हांला या वेळीं सोडील असें मला वाटत नाहीं. तीस कोटी देव आहेत. पण आमच्या देशांत लोकसुद्धां तीस कोटी आहेत. उद्योग कराल तर यशाकरितां प्रत्येक देवामागें एकएक मनुष्याचा लकडा लावतां येईल! ( टाळ्या ) वेळ अनुकूल आहे. या वेळीं प्रयत्न कराल तर परमेश्वर यश देईल. तुमची मदत या कार्याला मिळो अशी तुमची पदर पसरून प्रार्थना करून आपण माझें भाषण शांतपणें ऐकून घेतल्याबद्दल आभार मानतों ( टाळ्यांचा गजर. ) आतां यापुढें दोन ठराव येतील. एक साम्राज्याला यश व दुसरें स्वराज्याची मागणी हे ते ठराव होत. आपण या ठरावांना पुष्टी द्यावी." ( टिळक महाराज की जय! )

---

## २. अंमळनेर येथील व्याख्यान.

"अध्यक्ष महाराज व अंमळनेर शहर व तालुक्यांतील सभ्य गृहस्थ हो, आपण जो माझा गौरव केलात याबद्दल प्रथम आपले आभार मानणें अवश्य आहे. मानपत्र देणें व आभार मानणें ही गोष्ट हल्लीं केवळ औपचारिक होऊन राहिली आहे. हा एक विधि आहे. संस्कार आहे. मीहि त्याबद्दल आभार मानले खरे, पण आपलें प्रस्तुतचें काम हें नव्हे. हा आनुषंगिक भाग असून यापेक्षां जास्त महत्त्वाचें काम आपणाला करावयाचें आहे. हल्लीं देशाचा असा काल आला आहे कीं देशांतील प्रत्येक इसमानें-जातिधर्म यांचा भेद न मानतां कांहीं तरी विशिष्ट कामगिरी केली पाहिजे. आज सर्व देशभर

### स्वराज्याची आरोळी

उठली आहे. स्वराज्य ह्मणजे काय व पुढें आपणांला काय करावयाचें आहे हें प्रत्येक इसमानें आपल्या मनांत ताडून तपासून घेतलें पाहिजे. १५ वर्षांपूर्वी मी स्वराज्यावर बोललों असतों तर माझी मुंबईस जाण्याऐवजीं एरवड्यास रवानगी झाली असती. त्या वेळीं स्वराज्य हा शब्दहि उच्चारण्यास लोक कचरत असत. पण ती स्थिति आज बदलली आहे. पूर्वी पिनलकोडाची भीति होती पण ती विनाकारण कांहीं माणसांनीं उपस्थित केली होती ही गोष्ट आज सिद्ध झाली आहे. स्वराज्याचें ध्येय व त्याची व्याख्याही दादाभाईनीं कलकत्यास जाहीर केली. स्वराज्य म्हणजे इंग्रज लोकांस येथून हांकून द्यावयाचें नाहीं हें प्रत्येक व्याख्यानांत अगोदर सांगितलें पाहिजे. स्वराज्य म्हणजे कोणा संस्थानिकाला राजा बनवावयाचा नाहीं. भलताच अर्थ करून भीति उराशीं बाळगण्याचें कारण नाहीं. स्वराज्य म्हणजे आमच्या घरची व्यवस्था आम्हांला पाहण्याचा हक्क असणें हें होय.

### राजा कोणीहि असो

तो आमच्या स्वराज्याच्या आड येऊं शकत नाहीं. स्वराज्याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ग्रामपंचायत होय. पूर्वी गांवाचा कारभार गांवांतील पंच पहात. हा कारभार आमच्या हातून इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हातीं कां जावा? मी आज स्वदेशी साखर बाजारांतून आणली तर काय गुन्हा होतो? ही जशी घरची व्यवस्था तशीच गांवाची,

तालुक्याची-प्रांताची-देशाची व्यवस्था पाहण्याचा हक्क प्राप्त होणें याचें नांव स्वराज्य. अंमलदार हल्लीं आहेत तेच राहणार, पण स्वराज्यांत फरक इतकाच होणार कीं हे अंमलदार लोकांच्या ह्मणजे लोकप्रतिनिधींच्या तंत्रानें व सल्ल्यानें वागूं लागणार ! हल्लीं जे नोकर आहेत ते आमच्या देशाचे मालक बनले आहेत. नोकर पाहिजेत, खातीं पाहिजेत, सी. आय. डी. पाहिजे. पण हा सारा कारभार लोकमता-प्रमाणें चालला पाहिजे. पूर्वीं कायदे कोण करी ? राजाची पर्वा न करतां मोठमोठे ऋषी कायदे करून ठेवीत व त्या कायद्यांप्रमाणें राजाला कारभार करावा लागे. हल्लीं कायदे काय लोकमताच्या तंत्रानें होतात ? मार्ग दाखवायला ह्मणून जो सोबती राजानें दिला तो हुकमत चालवूं लागला आहे. कैद्याच्या हाताला दोरी बांधलेली असते व त्याच दोरीचें दुसरें टोंक पोलिसाच्या हातीं असतें, मग काय दोरी धरणारे दोन्ही इसम सारखे ? जमीन महसुलाचा कायदा झाला तेव्हां आमचे लोक कौन्सि-लांतून निषेध प्रदर्शित करण्यासाठीं

## उठून आले पण

कायदा पास झाला. मग लोकांचें ह्मणणें तें काय चाललें ? स्वराज्य म्हणजे फक्त हुकमतींत फरक आहे. घोडा एकच आहे पण लगाम कोणाच्या हातीं असावा हा प्रश्न आहे. लगाम आमच्या हातीं आला तर काय बादशहाचें नुकसान आहे ? या गोऱ्या अधिकाऱ्यांऐवजीं आमचा कारभार आम्हीं पाहिला तर काय बिघडेल ? बादशहांची सत्ता कायम असली म्हणजे झालें. स्वराज्य झालें ह्मणजे बादशहाचें नुकसान नाहीं पण नुकसान होणार तें या अधिकारीवर्गाचें. कोणालाही हातची सत्ता जातांना वाईट वाटणें स्वाभाविक आहे. ते तुह्मांला अपात्र ह्मणणार पण आपलें म्हणणें मांटेग्युसाहेबांपुढें स्पष्टपणें व निर्भीडपणें मांडा. मांटेग्युसाहेब आज तुम्हांला विचारणार ‘ या अधिकाऱ्यांच्या अधिकारांत तुह्मांला रहावयाचें आहे कीं काय ?’ हा स्वराज्याचा प्रश्न आहे. आज आपआपसांत बेदिली उत्पन्न करण्याचा प्रयत्न होत आहे पण त्याला बळी पडूं नका. प्रत्येक जातीनें आपला प्रतिनिधी मागितला तर अनवस्था प्रसंग उत्पन्न होईल व कोणाच्याच हातीं कांहीं पडावयाचें नाहीं हें

## चांगलें लक्षांत आणा.

स्वराज्य ह्मणजे काय हें नीट समजावून घ्या. जो तुमच्या हिताकडे पाहील त्याला

निवडून द्या. तो इसम तुमच्या हिताविरुद्ध वागला तर त्याला पुनः निवडूं नका. तो अधिकार तुमच्या हातीं राहणार आहे हें विसरूं नका. तुम्ही जो निवडून देणार तो तुम्हांला नको, व विलायतेहून स्वयंभू इसम येणार तो हवा हें म्हणणेंच कसें कोणाला पटतें तें समजत नाहीं. तुमचा मनुष्य तुमचें नुकसान करील व तुमच्या देशाचा नव्हे असा परकी इसम तुमचें हित पाहील हें मानणें चुकीचें आहे. ही एक प्रकारची भूल आहे व ती काढून टाकली पाहिजे. एकीकडे म्हणायचें हिंदुस्थानांत जातिभेद नको व दुसरीकडे जेथें जातिभेद नाहींत तेथें ते उत्पन्न करायचे; यांचा मेळ कसा घालायचा तेंच मला कळत नाहीं! स्वराज्यांतील राज्यव्यवस्थेंत जातिभेदाला वाव नाहीं हें लक्षांत घ्या. दुसरी एक कोटी अशी निघाली आहे कीं स्वराज्य द्यायचें खरें पण तें हळूहळू देऊं. ब्यूरॉक्रसीचें म्हणणें आहे कीं अजून तुम्हाला शिकायचें आहे. शिकायचें काय आहे? काय आम्ही पूर्वी

## राज्यें चालविलीं नाहींत ?

कोणी जर असें म्हणूं लागला कीं लग्न करायचें पण तें हळूहळू करूं, आज बायकोच्या पायांशीं करूं, उद्यां डोंपराशीं करूं तर हें म्हणणें कोणाला पटेल? (हंशा) स्वराज्य दिलें पाहिजे असें हायकोर्टच काय पण खुद्द लाट साहेबही म्हणूं लागले आहेत. भिक्षा द्यायची आहे पण ज्या वारीं मागायला यालं त्या वारीं नाहीं. ब्यूराक्रसीला कांहीं तरी सबब काढून वेळ गुदरून न्यायाची आहे. इंग्लण्ड कां भांडतें! बेल्जमकरितां! बेल्जम तरी केवढा? तर ३ जिल्ह्यां एवढासुद्धां नाहीं! या एवढ्याशा बेल्जमला सोडविणाऱ्या इंग्लंडला आतां हिंदुस्थानला परतंत्र ठेवतां येणार नाहीं. ही गोष्ट विलायतेंतील लोकांना व मंत्री मंडळाला पटली आहे. तेव्हां जर प्रयत्न करणार नाहीं तर केव्हां मागणार? ही स्वराज्याची मागणी ३० वर्षांची जुनी आहे. अबकारी काढा, फॉरेस्ट दुरुस्त करा हे अर्ज आजपर्यंत झाले. आतां अर्ज नकोत. आज हातांत सत्ता मागा. वेळ आलेली आहे. मागणी निश्चित आहे. अशा शुभ वेळीं झोंपा काढल्यात तर तुमच्यासारखे दुर्दैवी जगांत सांपडणार नाहींत. (टाळ्या) सर्व योग जुळून आले आहेत. या वेळीं

## कमी मागणी मागूं नका.

स्वराज्य मागायचें तें निकरानें मागा. खानदेश हा जिल्हा पूर्वी शिपायाचा होता

मग आज येथें लष्करभरतीकरतां मारामारी कां पडते ! पूर्वीच्या तरवारीचे नांगर झाले. आतां त्या नांगरांच्या तरवारी बनवायला कांहीं वेळ लागणारच ! पण हें कोणी केलें ? काय आम्हीं ? तुमचें म्हणणें निश्चयानें मागा. कमी दिलें तर तृप्त होणार नाहीं असें स्पष्टपणें मॉंटेग्युसाहेबांना कळवा. स्वराज्य–संघाची स्थापना कॉंग्रेसच्याच कार्यसिद्धीकरतां आहे. लोकांना जागृत करायचें, त्यांची मदत घ्यायची व निरनिराळया जातींना व धर्माच्या लोकांना आमची मागणी संमत आहे हें विलायतेंतील सरकारला कळवावयाचें आहे. तुम्हीं मागें कां राहतां ? भिऊं नका. पोलिसानें विचारलें तर उघड सांगा. कायदे कसे बदलायचे हें पहावयाचें आहे. राज्यव्यवस्थेचें पाणी बिघडलें आहे. तें पाणी दुरुस्त व्हावयाचें तर घरची नळी फिरवून होणार नाहीं. त्याकारितां मूळ झऱ्यांतच सुधारणा केली पाहिजे. आजचा प्रसंग

हरभरे व दांत

यांची गांठ पडण्याचा आहे. पेला भरलेला आहे तो ओंठाशीं तुम्ही न न्याल तर त्याचा परमेश्वराकडे दोष नाहीं. तुमचें कर्तव्य करावयास परमेश्वर तुम्हांस बुद्धि देवो अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.”

---


## लक्ष्यांत ठेवा.

लोकमान्य टिळक यांचे हस्तें उघडलेलें
भावे आणि मंडळी, ठाकुरद्वार, मुंबई,
यांचे दुकानीं पैसाफंड कांचसामान,
सर्वप्रकारचीं पुस्तकें, स्वराज्य-
विषयकवाङ्मय मिळतें.

---

## भावे आणि मंडळी

बुकसेलर्स, पब्लीशर्स.

सुगंधीमालाचे व्यापारी ठाकुरद्वार, मुंबई.

## ३. जळगांव येथील व्याख्यान.

### महत्वाच्या दोन मागण्या.

" सभ्य गृहस्थ हो, आपण माझा सन्मान केला त्याबद्दल मी आभार मानतों. पण तो विशिष्ट हेतूकरतां आहे असें मला वाटतें. मी फक्त निमित्तमात्र असून तो होमरूलाकरितां आहे असें मी समजतों. हा माझा व्यक्तिशः सन्मान झाला आहे असें म्हटलें तर ती चुकी होईल. हल्लींची राज्यव्यवस्था लोकांना

### सुखाची वाटत नाहीं.

शेतकऱ्यांची तक्रार आहे कीं जंगलाचा उपयोग शेतकीकडे कां करण्याची परवानगी नाहीं ? मजुरांची तक्रार कीं आपल्या चाळीजवळ हा दारूचा गुत्ता कां ? व्यापाऱ्यांची तक्रार कीं आमच्या देशाचा व्यापार वाढेल असे कर कां बसविले गेले नाहींत ? पोलिसचा अंमलदार चोरीची चौकशी करावयास येतो तो गांवांतील प्रतिष्ठित लोकांची भीडमुर्वत धरीत नाहीं. तुम्हीं त्याला कां भितां ? त्याला अधिकार आहे म्हणून. तो शिरजोर कां होतो ? त्याला काढण्याचा अधिकार तुमच्या हातीं नाहीं म्हणून. सबंध हिंदुस्थानांतील राज्यकारभार असाच चालतो. आमचे पैसे हे अंमलदार वाटतील तसे खर्च करणार व ते करतील ते कायदे लोकांना पाळलेच पाहिजेत. आमचे लोक कौन्सिलांत आहेत पण ते फार थोडे आहेत. जमीन महसुलाचा मागें कायदा झाला त्याचा आशय असा कीं सारा थकला कीं शेतकऱ्याची जमीन खालसा व्हावी. २ रुपयांचा सारा थकला तर ५०० रुपयांची जमीन खालसा व्हावी हा काय न्याय ? आमचे फेरोजशहांसारखे विद्वान् लोक कौन्सिलांत होते पण त्यांचें कांहीं चाललें नाहीं. कौन्सिलची रचनाच अशी आहे कीं आमच्या लोकांनीं दोन दोन हात वर केले तरी सरकारी सभासदांची संख्या जास्त आहे. शेवटीं फेरोजशहा व त्यांचे मित्र हे त्रागा केल्यासारखें करून कौन्सिलांतून उठून गेले ! त्या वेळीं टीका झाली कीं यांनीं गव्हर्नरसाहेबांचा अपमान केला ! ( वाहवा ! ) आमचें सरकार ऐकत नाहीं हा कांहीं आमचा अपमान नव्हे, उलट आम्हीं उठून गेलों तर सरकारचा अपमान होतो !! ( हंशा ) दारूच्या व्यसनांत सांपडलेल्या लोकांनीं जरी अर्ज केले तरी गुत्ता उठत नाहीं. कारण काय तर दारू पिणें हा लोकांचा हक्क आहे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे ते सांगतील तसें आम्हीं ऐकलें पाहिजे. राज्य बळकट

आहे, चांगलें आहे हें खरें. आगगाड्या, तारायंत्रें झाली हेंहि मला मान्य आहे आतांच गाडीही ओरडत होती ! ( हंशा. ) आह्मांला

## कोंडल्यासारखें वाटतें.

अशी ही राज्यपद्धती आहे. सरकार एकमुखी झालें म्हणजे पहिला दोष असा कीं तें आपल्या घमेंडीवर राज्य चालवितें. अंमलदार परकी असल्यामुळें त्यांचा ओढा त्यांच्या जातिबांधवांकडे असतो. याबद्दल त्यांना दोष देण्यापेक्षां पद्धतीलाच दोष दिला पाहिजे. बादशहांनीं असले लोक कां नेमावे ? असें 'हम करेसो कायदा' राज्य चालवायला बादशांनीं कांहीं सांगितलें नाहीं. तुह्मांला हें राज्य चांगलें वाटत असेल तर माझें कांहींच म्हणणें नाहीं. गुरांना गोठाच आवडत असेल तर त्याला यजमान तरी काय करील ? मनुष्याचा धर्मच असा आहे कीं मोठेपणीं त्याला आपल्या हातांत कारभार असावा असें वाटतें. आई जन्मभर मुलाला भरवूं ह्मणेल तर तें कोणाला आवडेल ? जर घरचा कारभार तुम्हांला पाहिजे तर देशाचा कां नको ! राजा कोणीहि असो आमच्या घरांतला कारभार आमच्याच हातीं पाहिजे. हिन्दुस्थान हा देश माझा नव्हे ? माझ्या देशाचा कारभार माझ्या हातीं पाहिजे. हल्लीं जे इंग्लंडांतून इकडे राज्य चालविण्याला लोक येतात ते खरे राजे नव्हत. ते आमच्या बादशहाचे नोकर आहेत. राणीनें आपल्या जाहीरनाम्यांत म्हटलें आहे कीं ' प्रजेचा संतोष तेंच आमचें सामर्थ्य !' आम्हीं संतुष्ट नाहीं हा दोष आमचा नव्हे. खरे राजद्रोही आम्हीं नाहीं. दोष तुम्हींच पाठविलेल्या नोकरांचा आहे हें बादशहांस कळविलें पाहिजे. हे अधिकारी जावेत असें आम्हीं मागत नाहीं हें लक्षांत ठेवा. अधिकारी हेच पण ते आमच्या तंत्रानें चालले पाहिजेत. हल्लीं काय झालें आहे ? घोड्यावर आम्हीं पण

## लगाम दुसऱ्याच्या हातीं !

त

ही स्थिति तुम्हांला आवडते ? हाच आमच्या सर्व तक्रारींचा मुख्य मुद्दा आहे. हे मीच सांगतों असें नाहीं तर ५० वर्षें अनुभवलेले दादाभाई नौरोजी या पुरुषानें हा मुद्दा १९०६ सालीं कॉंग्रेसपुढें मांडला. गांवांत विहीर नाहीं करा अर्ज, अमुक पाहिजे करा अर्ज, कोणी दोन थोबाडींत दिल्या करा अर्ज. यांत आमचें पौरुष नष्ट होतें. तुम्हांला सांगितलें कीं घरीं स्वस्थ बसा. तुला घरींच खायला देतों. हें तुम्हांला आवडेल ? बाप देत नसला तर वयांत आलेला मुलगा कोर्टांत फिर्याद लावून निम्मा हिस्सा ताब्यांत घेतो ( टाळ्या. ) मी जें घर म्हणतो तें फार मोठें आहे. त्याचें नांव

देश. देशाचा कारभार मुसलमानी राज्यामध्यें काय इंग्रज पहात होते ? आम्ही हें सारें पुर्वी केलें आहे. आज आम्हीं लायक नाहीं असें नाहीं तर आमच्या कर्तबगारीला संधिच मिळत नाहीं ! आम्हीं ही ओरड चाळीस पन्नास वर्षें करीत आहों पण कोणी ऐकलें नाहीं. राज्य हेंच आम्हांला पाहिजे, फक्त सध्यां मुनीम आहेत ते आम्हांला नकोत ही आमची मागणी आहे. राजाकडे आम्हीं न्याय मागितला तर काय राजद्रोह झाला ? अधिकारी वर्गाचा द्रोह झाला असें पाहिजे तर म्हणा. स्वराज्य मागणें यांत राजद्रोहाचें कांहीं नाहीं, कायदे मोडण्यासारखें कांहीं नाहीं. आमची मागणी राजनिष्ट व न्याय्य आहे. तुम्हांला कोणी लहानमोठे अधिकारी विचारतील 'टिळकांनीं काय सांगितलें ?, न कचरतां स्पष्ट सांगा कीं 'आम्हांला स्वराज्य पाहिजे' म्हणून त्यांनीं सांगितलें. ( टिळक महाराज की जय ! ) परदेशाशीं काय व्यवहार करायचा तो तुम्हीं ठरवा पण आमच्या देशांतला कारभार आमच्या हातीं पाहिजे. आम्हीं आतां मोठे झालों, आतां आमच्या हातीं दुकानाचा कारभार द्या अशी आमची मागणी आहे. आमच्या विरुद्ध जे आहेत ते

## स्वार्थाकरितां ओरड

करतात. त्यांना पार्लमेंटनें भीक घालतां कामा नये. आजपर्यंत या अधिकारी वर्गांचेंच म्हणणें पार्लमेंटला खरें वाटे. त्यांचे जातभाईच ते ! आतां वेळ बदलली आहे. आज आमचें म्हणणें ऐकलें जाण्याचा योग आहे. पूर्वी लाखों लोक शस्त्रास्त्रें घेऊन लढाईवर जात. आज ते कां मिळत नाहींत ? रिक्रूट भरतीकरितां मारामार कां पडावी ? साम्राज्याला वाटेल त्या वेळीं हिंदुस्थानांतून १०।१५ लाख शिपाई कां मिळूं नयेत ? हा दोष आमचा नाहीं, हा दोष आम्हांला निःसत्व केलेल्या राजपद्धतीचा होय. आमचें राष्ट्र जें शिपायाचें होतें तें आज शेतकऱ्यांचें बनलें आहे. आज मोठा योग आला आहे. विलायतेंतील सरकारनें आमचें म्हणणें समजून घेण्याकरितां मॉंटेग्युसाहेबांस इकडे पाठविलें आहे. या वेळीं सरकारपुढें आपलें म्हणणें स्पष्टपणें मांडलें पाहिजे. तुम्हांला फसविण्याचे अनेक प्रयत्न होतील. कोणी म्हणेल दोन आणे देतों—चार आणे देतों. आतां दोन आणे चार आणे म्हणण्याचा काळ गेला आहे. आतां आमच्या हातीं तथ्यांश पडेल असे अधिकार द्या. मुख्य हक्क आम्ही दोन मागतों. एक म्हणजे कौन्सिलांत बहुतेक लोक आमचे पाहिजेत, दुसरा म्हणजे हुकमत आमच्या हातीं पाहिजे. बादशहांना विनंती ही कीं नोकर पाठवाल ते आमच्या हुकमतीखालीं पाहिजेत.

## या दोन मागण्या

इतक्या महत्त्वाच्या आहेत कीं त्या मिळाल्या म्हणजे किरकोळ हक्क मागण्याचेंच कारण नाहीं. किरकोळ हक्क मागत होतों तेव्हां दिले नाहींत, आतां किरकोळीचें बोलून काय फायदा ? काळ निराळा आला आहे. आह्मी सबंध घर मागतों तर तुम्हीं खोली देऊन आमचें समाधान होणार नाहीं. लग्न करतांना आणेवारी चालत नाहीं. कांहीं गोष्टी अशा असतात कीं त्या आणेवारीनें व हिस्सेरश्शीनें देऊन भागत नाहीं. आह्मीं घर मागतों तर नुस्ता शौचकूप व तबेला देऊन लोकांत शांति कशी राहाणार ? आमचे हक्क आम्हांला मिळेपर्यंत लोक सन्तुष्ट राहणार नाहींत, ही चळवळ थांबणें शक्य नाहीं. साम्राज्याला हात न लावतां आमचे अधिकार आमच्या हातीं येणें याचें नांव स्वराज्य ! आम्हांला स्वराज्य मिळालें व आह्मीं बलिष्ठ झालों तर साम्राज्याला इतकी बळकटी येईल कीं मग साम्राज्याकडे वक्र दृष्टीनें पाहण्याची कोणाची छाती होणार नाहीं. हें लोकांना समजून सांगण्याकरितां स्वराज्यसंघ निर्माण झाला आहे. कॉंग्रेसनें ठराव केला पण तो समजावून देण्याचें काम कोणी करावें ? तें काम करण्याकरतां संघ निघाला आहे. स्वराज्याला मदत करा व जे स्वराज्याकरतां धडपड आहेत त्यांना पाठिंबा द्या. बाहेरचे हजार लोक येथें येऊन लोकांचा पगार खाऊन लोकांच्या तंत्रानें न वागून असा बहाणा करीत आहेत कीं ' आम्हीं रयतेच्या कल्याणाकरितां राज्य चालवितों. हा

## बहाणा खोटा आहे

हें स्पष्ट सांगितलें पाहिजे. दुसरी कोटी अशी निघाली आहे कीं स्वराज्य झालें तर ब्राह्मणांच्या हातीं अधिकार जातील. ही गोष्ट खोटी आहे. तें खरें आहे असें मानलें तरी मी तुम्हांला विचारतों कीं हे ६००० कोसांवरून आलेले ब्राम्हण बरे कीं तुमच्या धर्माचे रक्ताचे, विचाराचे ब्राम्हण बरे ? [ टाळ्या ) कौन्सिलांत कोणीहि जावो, त्याला निवडण्याचा अधिकार तुमच्याच हातीं आहे ना ? तुम्हीं निवडलेला माणूस वाईट निघाला तर त्याला पुनः निवडूं नका म्हणजे झालें. तुह्मांला अधिकारी विचारतील कीं स्वराज्य म्हणजे काय ? त्यांना सांगा कीं बादशहा आम्हांला पाहिजेत. पण साहेब, तुमची शेंडी आमच्या हातीं आली पाहिजे हेंच स्वराज्य. ( हंशा ) स्वराज्य पाहिजे असें हिंदुस्थानांतील प्रत्येक माणूस छाती ठोकून सांगेल तर तें मिळण्यास मुळींच विलंब लागणार नाहीं ''

## ४. धुळें येथील व्याख्यान.

### मांस द्या पण रक्त काढूं नका.

लोकमान्य ह्मणाले:—"अध्यक्ष महाराज व सभ्य गृहस्थ हो, आपण येथें माझा जो सन्मान केला त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. हा कोणाचा सन्मान ? माझा कीं कोणा दुसऱ्याचा ? मानपत्रावर माझें नांव आहे ही गोष्ट खरी. पण त्या बरोबर असा विचार केला पाहिजे कीं देशभर ज्या स्वराज्याचा घोष चालू आहे तो जर नसता व त्याला माझी जर थोडीफार मदत झाली नसती तर तो मान मला मिळाला असता कीं नाहीं याविषयीं शंका आहे. त्या स्वराज्याच्या नांवानें मी हें मानपत्र स्वीकारतों. देवतेचें जसें प्रतीक करतात तशी तुह्मी माझी दगडाची नश्वर मूर्ति बनविली आहे असें मी समजतों. मला मूर्ति बनविण्यांत आपलाहि कांहीं हेतु आहे व माझाहि कांहीं आहे. शंकरराव देव म्हणाले मीं येथें ९ वर्षांपूर्वी आलों होतों. होय. तेव्हांपासून काय काय झालें तें मी आतां सांगणार आहें. १०-१२ वर्षांपूर्वी स्वराज्य शब्द काढणाराला

### शिक्षा मिळत असे.

ही स्थिति कशी पालटली, त्याकरितां कसे उद्योग करावे लागले, व त्यांना कोणाची अनुकूलता मिळाली तें मी सांगणार आहें. पहिल्यानें स्वराज्य या शब्दाचा अर्थ इंग्रजांना घालवून द्यावयाचे असा आमच्यांतील कांहीं लोक निष्कारण करीत. दादाभाईनीं कलकत्त्यास १९०६ सालीं स्वराज्य हेंच आपलें ध्येय आहे हें लोकांस कळविलें. अधिकारी लोकांची राज्यव्यवस्था बरी नाहीं असें लक्षांत आणून पूर्वीही प्रयत्न होतच होते. नाहीं असें नाहीं. अंमलदार हुकूम करतील तो कायदा असें आज १०० वर्षे चाललें आहे. पूर्वी असें नव्हतें गांवाची सर्व व्यवस्था गांवातल्या गांवातची सर्व होई. इंग्रजसरकारनें सर्व देशाची व्यवस्था एका स्थानीं आणली. सर्व परकी अंमलदारांनीं लोकांच्या हातची व्यवस्था आपल्या हातीं हलुहलु घेतली. हा अधिकारी वर्गाच्या मुठींत सर्व अधिकार आणण्याचा प्रयत्न झाला. कर कसे बसवावे, पैसा खर्च कसा करावा, अंमलदार कोण नेमावे हें सर्व ह्या अधिकाऱ्यांनीं आपल्या हातीं घेतलें. ते आमची काळजी घेत पण किती ? आम्ही गोठ्यांतील गुरांची घेतों तितकी ! (हंशा) त्यांनीं आमचें कल्याण करण्याचा उद्योग केला पण ते एक विसरले कीं,

आह्मी माणसें आहोंत, गुरें नव्हत. वर्णानें, धर्मानें, समजुतीनें भिन्न अशा नोकरांनीं राज्यपद्धति चालविणें हें पसंत आहे कां ? हा विचार करा. खातीं आपल्या हातीं ठेवायचीं व तुमच्या हातीं अर्ज करण्याची सोय ठेवायची हें या अधिकाऱ्यांनीं आज-पर्यंत केलें. गांवांत झाडें हवीं कां नकोत, दारूचीं दुकानें ठेवावीं का उठवावीं याबद्दल कलेक्टरकडे

## करा अर्ज

हें आजपावेतों चाललें ! आमच्यामध्यें पात्रता आहे पण संधि गेली. आमचीं साम्राज्यें होतीं—आतां तीं गेलीं. याला आपसांतील भेद वगैरे कारणें आहेतच, पण आमच्या अंगांतील कर्तबगारी गेली असें मात्र नाहीं ! या ब्युरॉक्रसीनें आमचें थोडें थोडें ऐकलें असतें तर आज सर्वच मागण्याचा प्रसंग आला नसता. ही राज्यव्यवस्था अशी कीं एक स्वस्थ बसा नाहीं तर तक्रार केलीत तर राजद्रोही ह्मणून घ्या. सुदैवाची गोष्ट ही कीं, या राज्यव्यवस्थेचीं व्यंगें उघडपणें सांगणें हा राजद्रोह होत नाहीं असें हायकोर्टानें ठरविलें आहे ( टाळ्या ) मी माझा कारभार पाहीन ही प्रत्येक मनुष्याची साहाजिक भावना असते. आमचा स्वराज्य हा हक्क आहे. कोणी ह्मणतो तुम्हांला स्वराज्य कां पाहिजे ? याला उत्तर ह्मणजे स्वराज्य आमचा हक्क ह्मणूनच आम्हांला पाहिजे. भूक कां लागते ? या प्रश्नाला काय तर्कशास्त्र पाहिजे ? आतां तुम्हांला नोकर म्हणून ठेऊं. आमचे काय आणि तुमचे काय मालक एक बादशहा. हें स्वराज्य मागा हा दादभाईंचा उपदेश आहे. तुम्हांला आत्मस्वरूप समजावून सांगण्याकरितां मी आलों आहें. आमचा कारभार आह्मी पाहणार हें मागणें याचें नांव स्वराज्य—तुमचा सल्ला तुम्ही द्या पण अखेर निकाल आमच्या हातीं पाहिजे. दादाभाईंनीं स्वराज्य सांगितलें पण ती ५० वर्षांनीं होणारी गोष्ट या म्हाताऱ्यानें सांगितली असें आमच्यांतीलच लोक म्हणूं लागले. स्वराज्य अधिकाऱ्यांना नको होतें पण त्यांना दादाभाईवर राजद्रोहाची फिर्याद करतां येईना. मग दुसऱ्या लोकांवर खटले झाले व तें स्वराज्य मागणें कायदेशीर ठरलें. पण पुढें असें निघालें कीं स्वराज्य मागा पण पूर्वीच्या राज्यपद्धतीचे दोष दाखवूं नका.

## आमचे मित्र दादासाहेब

खापर्डे ( टाळ्या. ) यांनीं एकदां गोष्ट सांगितली होती. एका मारवाड्यानें—इकडचा नव्हे हो ? तो यहूदी होता—असा करार केला कीं अमुक पैसे नाहीं दिले तर शेरभर

मांस छातीवरचें काढून घ्यायचें. मग कोर्टांत त्यावर शकल निघाली कीं मांस घ्या पण रक्त काढूं नका ! ब्यूरॉक्रसीचें असें ह्मणणें कीं स्वराज्याचें मांस मागा पण रक्ताचा बिन्दु सांडतां कामा नये. रक्ताचा बिंदु ह्मणजे खरें रक्त नव्हे. हा शब्द या गोष्टीच्या अनुरोधानें वापरीत आहे, नाहीं तर या शब्दावर घोटाळा व्हायचा, ( रिपोर्टरांकडे वळून ) हे येथें टिपून घ्यायला बसलेच आहेत. रक्त ह्मणजे दोष. अर्थ हा कीं आमचे दोष न दाखवितां स्वराज्य मागा. ही राज्यपद्धति दोषपूर्ण आहे असें आतां सुदैवानें मुत्सद्दयांना कळूं लागलें आहे. १०१५ लाख लोक लढाईला कां मिळूं नयेत हा प्रश्न मुत्सद्दयांपुढें उभा राहिला आहे. ३० कोटींत एक कोट राहिले पण २१४ लाख लोक सुद्धां मिळत नाहींत, कारण लोकांत हिंमतच राहिली नाहीं. फुकट कोण मरेल ? ही गोष्ट आतां इंग्लंडांतील मुत्सद्दयांच्या लक्षांत आली आहे आमची मागणी काय ती स्पष्टपणें गुदस्तां लखनौला हिंदु व मुसलमान दोघांनीं मिळून मागितली आहे. ही स्वराज्याची मागणी

## कमींत कमी आहे

हेंहि लक्षांत ठेवा. वेळ अशी आली आहे कीं आमची मागणी स्पष्टपणें मांडली नाहीं तर देश खड्डयांत पडेल. हा निश्चय होमरूलचे मेंबर होऊन दाखवा. स्वराज्य पाहिजे? होय, पाहिजे. कारण काय ? माझा कारभार माझ्या हातांत पाहिजे हा माझा हक आहे. पण स्वराज्य ह्मणजे काय ? जास्त खुलासा पाहिजे असेल तर अध्यक्षांना विचारा. तुमच्या घरचा खटला चालवायला जर वकील चालतो तर देशाचा खटला चालवायला वकील केला म्हणून काय बिघडलें ? झोपेंत कोणी विचारलें तरी सांगितलें पाहिजे कीं मला स्वराज्य पाहिजे. स्वराज्यसंघ या कार्यासाठीं काढला आहे. मागें असा भेद निघाला होता कीं स्वराज्यसंघ कां काढला ? कॉंग्रेस तें कार्य करीत नाहीं ह्मणून. शेवटीं विनंति इतकीच कीं सभासद व्हा व आपला निर्धार दाखवा. आभारप्रदर्शन होऊन समारंभ आटोपला.

## ५. धुळें येथील व्याख्यान.

म्हणाले:-" आतां दोन मानपत्रें देण्यांत आलीं त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. काल स्वराज्याच्या संबंधानें दोन शब्द सांगितले त्यापुढें आज थोडें विवेचन करावयाचें आहे. हा विषयच असा आहे कीं त्यावर १०-५ व्याख्यानें झालीं तरी तो पुरा होणार नाहीं स्वराज्य हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे इतकेंच नव्हे तर तो जाणता होऊन न मागेल तर मनुष्यत्वाला मुकेल. स्वराज्याची मागणी करतांना त्यासाठीं सोसाव्या लागणाऱ्या स्वार्थत्यागालाहि प्रत्येकानें तयार असलें पाहिजे. आज १६ वर्षांपूर्वींपेक्षां पुष्कळच जास्त लोकमत स्वराज्याला अनुकूल झालें आहे. विशेषतः मिसेस बिझांट या चळवळींत पडल्यापासून फार मोठा धनिक व सुशिक्षित वर्ग या चळवळीस येऊन मिळाला. त्यांच्या अटकेमुळें तर बॅरिस्टर वकील व व्यापारी हे सुद्धां स्वराज्यवादी बनले. येथेंहि बरेच व्यापारी जमलेले प्रत्यक्ष दिसत आहेत ही आनंदाची गोष्ट होय. स्वराज्याची चळवळ ही आतां फक्त दक्षिण्यांचीच राहिली नाहीं. मुंबईस तर कित्येक स्त्रियासुद्धां आम्हाला मदत करतात. मूठभर लोकच ही चळवळ चालवितात हें विधान आज खोटें पडलें आहे. स्वराज्याला चोहोंकडे सर्व वर्गांची जोराची सहानुभूति मिळत असतां असें विधान जे करतात त्यांचा कांहीं तरी

### आंतला हेतु

असला पाहिजे असें खुशाल मानावयास हरकत नाहीं. पेशवाई गेली तेव्हां असें वाटलें कीं एकंदर पद्धती कायमच राहील, फक्त बाजीरावाच्या ऐवजीं एल्फिन्सटन आला! पण लोकांच्या हातची हलुहळू सर्व सत्ता गेली आहे. पूर्वी सरंजाम्या गेल्या आतां कुळकर्ण्यांची वतनें जाईपर्यंत पाळी आली आहे. या अधिकारी वर्गानें एक गोष्ट केली ती ही कीं सर्व हिंदुस्थान एकाच कायद्यांत व एकाच अमलाखालीं आणला. सर्व सत्ता एकाच अधिकारी वर्गाच्या हातीं आणण्याचा हा प्रयत्न होय. वतनदार-हक्कदार गेले व नोकरपेशा सुरू झाला. कंपनीसरकार गेलें व आतां अधिकारीवर्गाचीही कारकीर्द संपत आली आहे. आज आपण दुसऱ्या तिसऱ्या राज्यकारभाराच्या भागाच्या संधीवर उभे आहों. हिंदुस्थान एका छत्राखालीं आला तरी तो पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीला आलेला नाहीं. हें काम अधिकारीवर्गानें केलं नाहीं

तें आतां आम्हांला पुढें करावयाचें आहे. एक माणूस जंगल तोडतो व शेत साफ करतो व दुसरा येतो व पेरणी करतो. तसें हिंदुस्थानचें शेत अधिकारी वर्गानें साफसूफ केलें आहे. कोठें दंगे धोपे नाहींत, थोडेसें शिक्षणहि लोकांस मिळालें. पण ते धनी आणि आम्ही नोकर हें नातें असें किती दिवस टिकणार ? हा आजचा पुढचा प्रश्न आहे.

## शेत तयार झालें

तर त्यांत कांहीं तरी पेरलें पाहिजे. एका मोठ्या इसमानें मला विचारलें ' तुम्हीं स्वराज्य मिळालें तर काय कराल ?' मी त्याला सांगितलें कीं स्वराज्य मिळाल्यावरच खऱ्या अडचणी उत्पन्न होतील. स्वराज्याचे हक्क मिळून देशाला पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीला आणण्यास फार परिश्रम पडणार आहेत हें आम्हीं जाणून आहों, आमच्या कर्तृत्वाची व बुद्धीची वाढ पुढेंच होणार आहे. पूर्वीप्रमाणें देशामध्यें कर्ती माणसें निर्माण व्हावीं हा आमचा उद्देश आहे. हिंदुस्थानचेंच काय पण वळ पडल्यास साम्राज्याचेंहि संरक्षण आम्हांला स्वराज्य मिळाल्यावर करावें लागेल. पिंजऱ्यातून पोपट बाहेर पडला म्हणजे त्याचे श्रम कमी होत नाहींत. पोपट पिंजऱ्यांत आहे तोंपर्यंत त्याची हरएक काळजी यजमान वाहतो. पोपट बाहेर पडला म्हणजे त्याला स्वतःचें संरक्षण स्वतःच करावें लागतें. हे श्रम असले तरी तो पोपट नेहेमी सुटकेचाच प्रयत्न करीत असतो. आम्हांला स्वराज्य मिळालें व पिंजरा सुटला म्हणजे आम्हीं देशकल्याणाचे कष्ट सोसण्यास तयार आहों असें दाखविलें पाहिजे व तसें दाखविण्याकरितांच आम्हीं तरी स्वराज्य मागतों. निदान घर तरी सगळें आमच्या ताब्यांत द्या म्हणजे सर्व घरच्या सोई गैरसोई आम्ही दुरुस्त करून घेऊं. घराबाहेरची व्यवस्था तुम्हीं पहा. त्याबद्दल आम्हीं मुळींच मागणी केलेली नाहीं. बादशहा आम्हांला पाहिजेत. मात्र देशाचा

## अन्तर्गत कारभार

आमच्या हातांत पाहिजे. सबंध घर आम्हांला पाहिजे नुस्ता शौचकूप देऊन भागणार नाहीं. [ हंशा ] हसेबंदी या कामीं पुरी पडणार नाहीं. आज स्थानिक स्वराज्य देतों म्हणतात. याचा अर्थ असा कीं तुमच्या गांवचे रस्ते तुम्हीं झाडा. हे अधिकार तिजोरीवर अधिकार मिळाल्याशिवाय फोल होत. हा तिजोरीचा अधिकार ही मुख्य व महत्वाची बाब होय. त्याशिवाय कोणतेहि दुसरे किरकोळ हक्क फुकट होत. किरकोळ हक्क दिले व मुख्य सत्ता अधिकारीवर्गाच्या हातीं राहिली

तर ठपका मात्र येण्याचा संभव आहे. अधिकारी लोक शहाणे आहेत हें मला कबूल आहे. कॉंग्रेसच्या मागणीपैकीं ४।६ आणे अधिकार हातीं येण्याचा संभव आहे पण ते ४।६ आणे सोळा आणे मिळाल्याशिवाय फुकट होत हें नीट लक्षांत आणा. आम्हाला पांघरायला धोतर पाहिजे तर चिंध्या देऊन थंडीचें निवारण होणार नाहीं. भूक लागली तर आज एक घांस, उद्यां दुसरा घांस असें करून पोटाची तृप्ति होणार नाहीं. थोडथोडें देऊन चळवळ देशांत चालू ठेवावी व लोकांत संताप वाढावा हें आतां आम्हांला नको आहे. दोन आणे चार आण्यावर संतुष्ट होऊं नका. तें घ्या व १६ आणे मिळेपर्यंत स्वस्थ बसूं नका. सर्वांनीं साह्य केलें पाहिजे व दुसरें असें कीं ४।६ आण्यांनीं तुम्हीं शांत होतां कामा नये.

## स्पष्ट सांगा

कीं ४।६ आण्यांनीं आमची भूक शमणें शक्य नाहीं. तिसरें असें कीं ही चळवळ इंग्लंडांतहि चालविली पाहिजे. तंटा आमचा व अधिकारी वर्गाचा आहे पण त्याचा निकाल पार्लमेंट करणार आहे. म्हणजे इंग्लंडांतील लोकांची अशी खात्री करून दिली पाहिजे कीं हल्लींची राज्यपद्धती आमच्या व साम्राज्याच्या फायद्याची नाहीं. हा सारा उद्योग सिद्धि मिळेपर्यंत केला पाहिजे. आम्ही आपल्या उद्योगानें विलायतें-तील मुत्सद्द्यांना सतावून सोडलें पाहिजे. ही वेळ आहे. लढाई कशाकरितां ? बेल्जमला स्वातंत्र्य देण्याकरतां व लोकसत्ता जगभर स्थापन करण्याकरितां. अशी ओरड दोस्त राष्ट्रें करीत आहेत, तोंपर्यंत विलायतेला विचारा कीं 'तुम्ही हें म्हणतां खरें पण तुमच्या पायाखालीं काय जळतें प्रथम पहा !' या वेळीं आपण आपली मागणी नेटानें केली तर तिला यश येण्याचा फार संभव आहे. साम्राज्याजवळ आज दोन मागणेकरी आहेत एक आयर्लंड व दुसरें हिंदुस्थान. आयर्लंडनें आपली दाद लावून घेतली आहे. या वेळीं आपण स्वस्थ बसणें आत्मघातकीपणाचें आहे. खेडोखेडीं स्वराज्यवादी झाले पाहिजेत. ही जागृति सर्व देशभर झाली पाहिजे. परमेश्वराच्या नांवाप्रमाणें

## स्वराज्याची घोषणा

सुरू झाली पाहिजे. या बुद्धीबरोबरच तनमनधन अर्पण करण्यास प्रत्येकानें तयार असलें पाहिजे. ज्याच्याजवळ पैसा आहे त्यानें ती मदत करावी; ज्याच्याजवळ

बुद्धि असेल त्यानें तशी मदत करावी. सर्व जगभर स्वातंत्र्याची लाट उसळली असतां इंग्लंडला आम्हांस स्वराज्य नाकारणें शक्य नाहीं. बेलज्यमला स्वातंत्र्य दिल्यावर 'हिंदुस्थानास कां असें स्वराज्यविहीन ठेवलेंत ?' असें कोणी इंग्लंडला विचारलें तर त्याचें तोंड कसें दिसेल त्याचा विचार करा. ( हंशा. ) आम्हांला स्वराज्य द्या म्हणजे पहा आम्ही काय करतों तें असें उघडपणें सांगण्यास तयार असलें पाहिजे. स्वराज्यानुकूल परिस्थिति उत्पन्न करण्याकरितां हे स्वराज्यसंघ निर्माण झाले आहेत. कॅांग्रेसनें हें ठरावाच्या अंमलबजावणीचें काम हातीं घेतलें असतें तर संघ निर्माण झालेच नसते. कॅांग्रेसला अंगमोड करावयास नको. ज्यांना काम करावयाचें आहे ते आज पुढें आले आहेत. त्यांना मदत करा व स्वराज्यसंघाचे सभासद व्हा. सर्वांनीं

## भेदभाव विसरून

हा उद्योग सतत चालू ठेवला पाहिजे. आणखीही आक्षेप आहेत. तुमच्या जातींचें काय करणार ? लॅार्ड सिडनहॅम एकदां म्हणतात जाती मोडल्याशिवाय स्वराज्य मिळणार नाहीं. असें इकडे म्हणावयाचें तर दुसरीकडे राज्यकारभारांत जाती आणावयाच्या ! याचा मेळ कसा घालावयाचा तें समजत नाहीं. प्रत्येक जातीचा प्रतिनिधी पाहिजे. काय कौन्सिल म्हणजे जातींचें प्रदर्शन आहे ? कौन्सिल म्हणजे राज्यकारभार चालविण्याकरितां आहे हें लक्षांत ठेवा. कलहानें आजपर्यंत नुकसान झालें हें लक्षांत आणून आतांतरी हे भेद सोडा. हिंदुस्थानांत दोन हजार जाती आहेत मग काय दोन हजार प्रतिनिधी कौन्सिलांत घेणार? सर्व राष्ट्र एक आहे अशी भावना उत्पन्न झाली पाहिजे. जातींचें बंड राज्यकारभारांत घुसणें इष्ट नाहीं. पुनर्विवाह लावणारांना एक प्रतिनिधी, न लावणारांना दुसरा, ब्राह्मणांना तिसरा, कोंकणस्थांना चवथा, शेवांना पांचवा असें करून काय राज्यकारभार चालणार आहे ? आपलें हित पाहणाराला निवडा, तेथें ो कोणत्या जातीचा याच्याशीं तुम्हांला काय कारायचें ? एकदां निवडलेला मनुष्य वाईट ठरला तर त्याला निवडूं नका. राष्ट्राचें हित डोळ्यापुढें ठेवा. कॅांग्रेसमध्यें सर्व धर्मांचे व जातींचे लोक जमवून त्यांनीं जी मागणी केली आहे तिला एकीनेंच काय पण नेकीनेंहि पाठिंबा द्या. " ( टाळ्यांचा गजर ! )

---

## ६. पेण येथील व्याख्यान.

लो. टिळक म्हणाले:—" आपण या ठिकाणीं मला आमंत्रण देऊन माझ्या कल्पनेच्या बाहेर माझा सत्कार केला त्याबद्दल आपले रीतीप्रमाणें आभार मानणें जरूर आहे. आभार मानण्याची कल्पना पाश्चात्य आहे, शिवाय आपल्या हातून एकमेकांचे आभार मानण्यासारखें कांहीं झालें आहे असें मला वाटत नाहीं. जो सन्मान करावयाचा तो पवित्र स्वराज्याचा-होमरूलचा करा. कांहीं विशेष करण्यापूर्वीं आपण आभार मानण्यांत गुंतावें हा एक प्रकारचा

### बुद्धीचा कमकुवतपणा

आहे. कार्य आरंभण्यापूर्वीं काय तो विचार, पण आरंभानंतर तें कार्य न सोडतां शेवटपर्यंत चिकाटी धरणें व निरपेक्ष उद्योग करणें हें परमार्थाच्याहि दृष्टीनें श्रेयस्कर आहे. मी २० वर्षांपूर्वीं येथें आलों होतों त्या वेळीं आमचे सार्वजनिक सभेचे एजंट दुष्काळाप्रीत्यर्थ येथें हिंडत होते व त्यांच्यावर तन्निमित्त खटला झाला होता. त्यावेळीं जर स्वराज्याविषयीं बोललों असतों तर मला सरकारी अधिकाऱ्यांनीं जागच्या जागीं गिरफदार केलें असतें. पण आज काळ अगदीं पालटला आहे. स्वराज्य मागणें हें कायदेशीर ठरलें आहे. इतकेंच नव्हे तर खुद्द लाटसाहेब व भारतमंत्री मॉंटेग्यु साहेब स्वतः स्वराज्याविषयीं लोकमत अजमावीत आहेत. स्वराज्य मागितलें तर काय कैद करतील का सुळावर चढवितील ही भीति आज कां नाहींशी झाली? पहिली गोष्ट ह्मणजे स्वराज्याची मागणी नियमित झाली आहे. यामुळें स्वराज्य म्हणजे इंग्रजांना घालविणें हा अर्थ पार नाश पावला आहे. स्वराज्याची व्याख्या मी दरवेळीं सांगत असलों तरी तिचा येथें पुनरुच्चार केलाच पाहिजे. नाहींतर आज मी राजद्रोह केला असें ह्मणावयास कोणी मागेंपुढें घेणार नाहीं! ( टाळ्या. ) बादशहाची प्रजा ऑस्ट्रेलियांत-कानड्यांत-हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं आहे. मग या प्रजेंत भेद कां?

### हा भेद कोणी केला?

काय बादशहांनीं केला? सर्व प्रजा सारखी असतांना एक आवडती-एक नावडती असा भेद कां झाला? पेशवाई गेली तेव्हां लोकांना वाटलें की राज्य गेलें ह्मणजे राजा बदलला, बाकी इतर कारभार आमच्याच हातीं राहणार! बाजिराव गेला व एलफिन्स्टन आला इतकाच राज्यव्यवस्थेंत भेद झाला नाहीं. आमच्या हातचे अधि-

कार हळूहळू अधिकारीवर्गाच्या हातीं गेले. सर्व सत्ता अधिकाऱ्यांच्या हातीं गेली. आमच्या हातीं त्यांतलें कांहीं एक राहिलें नाहीं. अधिकाऱ्यांना पटेल तेवढीच ते गोष्ट करणार, मग ती तुमच्या सोईची असो वा नसो. दारूचें दुकान नको असलें तर त्याचा निकाल पंच करीत.! पूर्वी गांवचा कारभार गांवांतील पंच पहात पण हल्लीं तो अधिकार कलेक्टर साहेबांचे हातीं गेला ! कलेक्टरसाहेब पहा किती भिन्न विचारांचे ! त्यांना दारू पिणें हें फारसें पाप वाटत नाहीं ! मतभेद प्रामाणिक पण मत कोणाचें कोणी मानावयाचें हा प्रश्न आहे. स्वराज्य ह्मणजे अंमलदार घालवावयाचे नाहींत. स्वराज्य झालें तरी सर्व खातीं पाहिजेतच. सर्वच कारभार राजाला स्वतः करतां येणें शक्य नाहीं, त्याला नोकर नेमणें भाग आहे. पण हे नोकर कोणाच्या हुकमतीखालीं पाहिजेत हा प्रश्न आहे. कायदा बदलला म्हणजे हेच अधिकारी आमच्या तंत्रानें वागूं लागतील ! ते काय ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी ! ! ( टाळ्या ) हा भेद निघाला म्हणजे स्वराज्य झालें. खातीं राहतील पण

## हुकूम आमचा पाहिजे.

गव्हर्नर राहणार पण त्यांनीं आमच्या प्रतिनिधींचें ऐकलें पाहिजे हें स्वराज्य. घोडा तोच, जीन तोच. रिकीब तीच, लगाम तोच. पण हल्लीं लगाम दुसऱ्याच्या हातीं आहे तो आमच्या हातीं आला पाहिजे. ( टाळ्या ) हें स्वराज्य मागणें काय राजद्रोह आहे ? बापाजवळ जाणत्या मुलानें हक्क मागितले तर तो काय पितृद्रोह झाला ? मुलानें अधिकार मागितला व बाप जर म्हणाला कीं तुझ्या मनांत मी मरावें असें आहे तर याला समंजसपणा कोण म्हणेल ? राजा आमचा आहे तसाच राहणार, फक्त आम्हीं आमचे अधिकार आमच्या हातीं मागतों. हा राजद्रोह नाहीं. आम्हीं नालायक आहों अशा कोट्या निघाल्या पण त्यांनाहि उत्तरें मिळालीं आहेत. काय इंग्रज येण्यापूर्वी येथें राज्यकारभार चालत नसे ? उलट इंग्रजी शिक्षणानें आम्हांला पाश्चात्य राज्यकारभार जास्त कळूं लागला आहे. आतां अजूनहि आम्हीं खरोखर नालायक असलों तर तो दोष आमचा नाहीं १०० वर्षें अधिकार उपभोगलेल्या अधिकारी वर्गाचा आहे. [ टाळ्या ] पार्लमेंटसभेनें ज्या गोष्टी ठरविल्या त्या हे अधिकारी योग्य रीतीनें पाळीत नाहींत, मग तक्रार कोणाकडे न्यायची ? आम्हीं जर पार्लमेंटकडे तक्रार करतों तर मग

## द्रोह कसा होतो ?

गोष्ट साधी पण ती सिद्ध करण्याकरतां लोकपक्षाला १०१५ बळी द्यावे लागले ! दादाभाईनीं ५० वर्षें मागण्या केल्या, त्यांना कांहीं मिळेना; तेव्हां त्यांनीं सांगितलें,— " बाबांनों, लहानसहान मागण्या करूं नका, एकाच स्वराज्याची मागणी करा !" १९०६ मध्यें हें दादाभाईनीं सांगितलें पण तेव्हांपासून १५ वर्षें काय झालें पहा ! बंगाल्यांत एक माणूस स्वराज्यावर बोलला, मग त्यावर राजद्रोहाचा खटला झाला, पण हायकोर्टानें त्याला निर्दोषी ठरविलें ! ( टाळया ) स्वराज्य मागणें हा राजद्रोह नाहीं पण अधिकार हातचा जाऊं लागला म्हणजे वाईट वाटणें स्वाभाविक आहे. ज्याचा अधिकार जाणार तो रडणार व ज्याच्या हातीं सत्ता येणार तो हंसणार हें स्वाभाविक आहे. इंग्रजी राज्य उत्तम आहे, सर्व राज्य कसें यंत्रासारखें चाललें आहे, मग त्यांत नाहीं काय ? जो कारभार चालतो तो आमच्या तंत्रानें चालत नाहीं ही आमची तक्रार होय. आम्ही तक्रार कां करतों ? आम्ही स्वराज्य कां मागतों ? आम्हीं माणसें आहों व गुरें नाहीं म्हणून ( हंशा व टाळया. ) स्वराज्य मागणें कायदेशीर ठरले पण मग लचांड निघालें कीं मागची राज्यव्यवस्था वाईट म्हणूं नका. मागचें जर वाईट म्हणावयाचें नाहीं तर नवें मागा कशाला ? ( हंशा ) तीहि

## आडकाठी गेली.

लखनौला स्वराज्य म्हणजे काय तेंहि ठरलें आहे. आम्ही स्वराज्य मागतों तें राजाची अवहेलना न करतां राजाजवळच मागतों. यांत कोठें राजद्रोह आहे तो मला सांगा. आम्हांला कोणाचा द्रोह करावयाचा नाहीं; कोणाला शिव्याशाप द्यायचे नाहींत, फक्त वाईटाला अवश्य तितक्या कडक शब्दांनीं वाईट म्हणायचें व चांगलें मागायचें ! यांत कांहीं द्रोह नाहीं. काळहि अनुकूल आला आहे. लढाईमध्यें रिक्रूटभरती कोठून करणार ? हिंदुस्थानाच्या लोकांची मदत साम्राज्यरक्षणाला नको ही आजपर्यंत घमेंड होती पण ती स्थिती आज पालटली आहे आज अशी स्थिती प्राप्त झाली आहे कीं हिंदुस्थानांतून लढाईवर लोक पाठविण्याची पाळी आली. आमचीं शस्त्रें काढून घेतलीं, आम्हांला निशस्त्र केलें मग आतां लष्करी लोक कोठून मिळणार ? ही राज्यव्यवस्था बदलेल तर हिंदुस्थानांतून १ कोटी लोक मिळतील ! (टाळयाच टाळया.) साम्राज्याचें संरक्षण करण्याकरतां हिंदी लोकांना विश्वासांत घेतलें पाहिजे अशी विलायतेंतील

मुत्सद्द्यांची, लोकांची, व मंत्रिमण्डळाची खात्री झाली आहे. खात्री कोणाची झाली नाहीं ? ज्यांच्या हातून अधिकार जाणार त्यांची ! शेत नांगरलें, पेरलें अशा वेळीं

## पावसाळ्याची हवा

वाहूं लागली आहे हें सुचिन्ह होय ! ज्यांच्या हातीं अधिकार ते दानाच्या वेळीं शुक्राचार्यांप्रमाणें आडवे येत आहेत. मॉंटेग्यु साहेब आमचें मत पहायला आले पण हे अधिकारी नाटकांतल्या राजाप्रमाणें त्यांना डेप्युटेशनच्या वेळीं धरून आणतात व पुन्हां परत नेतात ! हें कां राज्य आमचें ? पैसे देणार आम्हीं, मग नोकरांनीं आमच्या म्हणण्याप्रमाणें वागायला नको ? जे नोकर म्हणून म्हणवतात ते मालक बनले आहेत. हें पालटलें पाहिजे. स्वराज्य म्हणजे दुसरा बाहेरचा संस्थानिक आणून राजा बनवायचा नाहीं ! आमचेच बादशहा राहणार, वांटणी होणार ती अधिकारांत होणार, बादशहाची हुकमत वर राहणार, पण नोकरांवर हुकमत आमची कां चालूं नये ? आम्हीं हिंदुस्थानांतले लोक काय माणसें नाहीं ? दुकान आमचें, मुनीम आहेत ते नोकर झाले पाहिजेत, मालक नकोत ! गुरांचीं माणसें बनविणें याचें नांव स्वराज्य ! जर कोणाला गुरें रहावयाचें असेल तर माझी त्याला ना नाहीं. सर्व गोष्टी अनुकूल आहेत, आतां

## झोंपा काढूं नका.

विघ्नें येणार म्हणून भ्यायला काय झालें ? विघ्नें नाहीं आलीं तर त्यांत तुमचा तरी पुरुषार्थ काय ? या कार्याला जसें शरीरबल तसेंच आत्मिक बलहि पाहिजे. परमेश्वर आपल्याकडून तयार झाला आहे. आतां तो फक्त तुमच्या प्रयत्नांची वाट पहात आहे. परिस्थिती अनुकूल झाली याचेंच नांव परमेश्वर अनुकूल ! विलायतेंतील लोक स्वराज्य देण्याला तयार आहेत या वेळीं काय झोंप काढणार ? जगभर डंका चालला आहे कीं बेलजमच्या स्वातंत्र्याकरितां लढाई चालली आहे मग बेलजमच्या २० पट मोठा देश जो हिंदुस्थान तो काय परतंत्र राहील ! जगावर अनुकूल वारा वहात आहे या वेळीं प्रयत्न करा. तुमच्यामध्यें दुही माजावी असा अप्रत्यक्ष प्रयत्न होईल त्याला जुमानूं नका. प्रजेचा संतोष तरच

## राज्याची बळकटी

असें राणीसरकारचें वाक्य आहे. हिंदुमुसलमान एक झाले पण आतां ब्राम्हण ब्राम्ह-

णेतर हे तंटे निघाले. असें एक निघालें आहे कीं ब्राम्हण निवडून येतील. ब्राम्हण येतील ते तुम्हीं निवडलेत तर येतील. तुम्हांला जो कोणी नको असेल त्याला निवडूं नका. कायदेकौन्सिलांत जे प्रतिनिधि जातात ते कायदे करण्याकरितां जातात. त्यांत म्हणे कुंभार पाहिजे, काय तेथें मडकीं घडायचीं आहेत ? जो समर्थ असेल त्याला निवडा. तो वाईट निघाला तर त्याला पुनः नेमूं नका. तुमच्यांत तंटे लागले म्हणजे मग हे लोक म्हणणार ' पहा, हे आपापसांत भांडतात, हे स्वराज्याला लायक नाहींत !' ही स्थिती ओढवून घेऊं नका. कँग्रेसनें मागितलें आहे तें सर्व एकदम मागा. २।४ आणे देऊन भूक कांहीं शांत होणार नाहीं. सर्व द्या हा आग्रह पाहिजे. ( ऐका, ऐका. ) स्वराज्य म्हणजे काय हें प्रथम नीट समजून घ्या, व तें निकरानें मागा. माझ्या येण्यानें तुमची कांहीं समजूत पडली असेल तर माझ्या येण्याचा उपयोग झाला असें मी समजेन. उगाच इकडून तिकडे गाडींतून ओढलेंत तर मला त्याचें

**कांहीं वाटणार नाहीं.**

मी कांहीं साधु नाहीं-देव नाहीं. स्वराज्य काय आहे तें समजून घ्या. स्वराज्याची तळमळ आत्म्याला लागली पाहिजे स्वराज्यवादी होण्यांत लाज कसली ! आपण होऊन स्वराज्यवादी बनलें पाहिजे. हें प्रत्येकाचें कार्य आहे. एकमेकांचे आभार कसले मानतां ? हा प्रकार ' अहोरूपमहोध्वनिः ' असा होईल ! प्रयत्न करा व यश आलें तर दोघे मिळून परमेश्वराचे आभार माना.उद्योग झाला तर यश हें मिळालेंच पाहिजे. उद्योग करा व तो कृष्णार्पण होऊं द्या म्हणजे झालें. '' ( टाळ्यांचा गजर )

---


# स्वराज्यविषयक वाङ्मय.

शालोपयोगी पुस्तकें, ग्रंथ, नकाशे, अत्तरें औषधें
वगैरे मिळण्याचें ठिकाण.

**भावे आणि मंडळी, ठाकुरद्वार-मुंबई.**

## ७. लोणावळें येथील व्याख्यान.

**लोकमान्य म्हणाले:—** " आतांपर्यंत जिल्हासभेचें काम चाललें होतें तेंच काम पुढें चालविण्याकरितां ही पुढची सभा आहे. अध्यक्षांचीहि तीच स्थिती झाली आहे ही आनंदाची गोष्ट होय. जिल्हासभा ही कॉंग्रेसचीच उपशाखा असल्यामुळें तिचें व कांग्रेसचें मायलेकरांचें नातें आहे. जिल्हासभा झाली, ठराव पास झाले, पण पुढें काय ? हा प्रश्न शिल्लकच आहे. या प्रश्नाचें उत्तर म्हणजे ही सभा होय. आतांपर्यंत जे ठराव पास झाले त्यांत सरकारास विनंति आहे, ' ' आग्रहाची विनंति आहे ' ' जोराची विनंति आहे ' अशी भाषा शेवटीं वापरण्यांत आली होती. वरील भाषा ही We pray, we earnestly pray, we emphatically pray याचेंच भाषांतर होय. या विनंत्या कोणाकडे करावयाच्या ? कलेक्टरसाहेबाकडे. पण ज्यांच्याकडे विनंत्या करावयाच्या त्यांचे कान ठिकाणावर आहेत का ? हा प्रश्न आहे. ( टाळ्या. ) आमचा गेल्या ४० वर्षांचा असा अनुभव आहे कीं अधिकारी वर्गाचे कान कांहीं ठिकाणावर नाहींत. ( टाळ्या ) हे अधिकारी जेव्हां विलायतेहून येतात तेव्हां ते आपले कान विलायतेला विसरून येतात. व येथें आल्यावर मनाला वाटेल तें हातानें करतात. ( टाळ्या, ) जोंपर्यंत अधिकारी वर्गाच्या या वर्तनामध्यें फरक झाला नाहीं, जोंपर्यंत त्यांचा दृष्टिकोन बदलला नाहीं, जोंपर्यंत लोकमताला मान मिळत नाहीं, तोंपर्यंत कळकळीच्या, जोराच्या आणि मेहेरबानीच्या सर्व विनंत्या

**कागदावरच पडून राहणार.**

उघड आहे. ठरावांची भाषा ठरवितांना कायदेपंडित शब्दांचा मोठा कीस काढतात ! त्यांना असें वाटतें कीं अमुक शब्द असला तर कलेक्टरसाहेबांना राग येईल, अमूक शब्द घातला तर ते खुश होतील !! पण हे शब्द ऐकण्यालाच ते मुळांत तयार आहेत का, हा प्रथम विचार करा. आजपावेतों लोकांच्या विनंत्या ऐकायला ते तयार नव्हते ! आतां कोठें लोकांचें ह्मणणें काय आहे तें ऐकण्याची इच्छा त्यांना उत्पन्न झाली आहे. परवां नुक्तें मॉंटेग्युसाहेबांनीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत जबाबदार राज्यपद्धतीचें धोरण अमलांत आलें पाहिजे असें पार्लमेंटांत जाहीर केलें. Responsible Government हा आतां नवाच शब्द निघाला आहे.

आजपर्यंत हें धोरण बदलायची कल्पना अधिकारी वर्गाला मान्य नव्हती. त्यांना आजपर्यंत अशी घमेंड होती कीं आम्ही काय ते शहाणे, आणि लोक सारे अज्ञानी ! आमची मनोदेवता सांगेल तसे आह्मी वागूं, त्यांत लोकांनीं कुरकुर करतां कामा नये. जो कुरकुर करील तो राजद्रोही ! ही अधिकारी वर्गाची राज्यकारभाराची कल्पना जोंपर्यंत बदलली नाहीं तोंपर्यंत विनंत्या करून काय उपयोग होणार तें दिसतेंच आहे. कांहीं झालें तरी म्हसोबाचा कांहीं गणपती होऊं शकत नाहीं.

## म्हसोबा तो म्हसोबाच

राहणार. ( हंशा. ) म्हसोबाच्या ऐवजीं गणपती पाहिजे असेल तर देवताच बदलली पाहिजे. देवता बदलल्या शिवाय आमच्या तक्रारींचा अनुकूल निकाल लागावयाचा नाहीं हें चाळीस वर्षांच्या अनुभवानें सिद्ध झालेलें आहे. याचेंच नांव स्वराज्य. जे आज धनी झाले आहेत ते नोकर झाले पाहिजेत. आज एक हुकूम तर उद्यां दुसराच अशी जी लवाड्याची तक्रार आहे ती तोंपर्यंत राहणारच ! जे घाण काढायला म्हणून आले तेच घाण करून गेले अशी पुण्याच्या ड्रेनेजची स्थिति झालेली आहे. ( हंशा ) हाच न्याय चोहोंकडे लागूं आहे. या अधिकारीवर्गाची घाणीची कल्पनाच निराळी आहे लोकांच्या तंत्रानें कारभार चालला तर घाण झाली अशी यांची कल्पना; तेथें ती पद्धतीच बदलल्याशिवाय काय होणार ? हल्लीं जी लोकांची पशूंसारखी स्थिति झाली आहे ती कां हा विचार करा. साहेबांनीं नाला बांधला कीं तो चांगला म्हटलेंच पाहिजे. " वाः साहेबांनीं नाला बांधला, मग तो वाईट कसा असेल ? " असला प्रकार झाला आहे. ( हंशा ) माणुसकीची वाढ होऊं यायची नाहीं अशी हल्लींची पद्धति आहे. मोर्ले साहेबांना असें वाटत होतें कीं हिंदी लोक जबाबदार राज्यपद्धतीला नालायक आहेत. लोक जबाबदार राज्यपद्धतीला लायक होतील असा काळ,

## एवढे मोर्ले साहेब शहाणे,

पण त्यांच्याहि दृष्टिपथांत येईना ! पण आज ही दृष्टी ढांसळून पडली आहे. परमेश्वरी कृपेनें दहा वर्षांत हा फरक पडला, याला मोर्ले साहेब तरी काय करणार बिचारे ! [ टाळ्या ) जगाचेंच चक्र पालटल्यावर त्याची गती आंवरून धरण्याची ताकद माणसांला असणें शक्य नाहीं. सांप्रतच्या महायुद्धामुळें जगभर प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या संस्थांची स्थापना होत आहे. आणि याच तत्वाचा विजय व्हावा म्हणून आह्मी महायुद्ध सुरू केलें व चालीवलें असें इंग्लंडचे मुत्सद्दीहि म्हणत आहेत. अशा काळीं

विनंती अर्ज काय करायचे ? आतां अर्ज मंजूर करण्याचा हक्क आमच्या हातांत घ्या असें मागणें मागा. ( टाळया ) आज अध्यक्षांना कलेक्टरसाहेबांना विनंत्या कराव्या लागतात. पण उद्यां स्वराज्य झालें म्हणजे कलेक्टरसाहेबच जिल्ह्यांचीं गाऱ्हाणीं काय आहेत तें अध्यक्षांस विचारावयास येतील. ( टा. ) हें त्यांचें कामच आहे. अध्यक्षांनीं हुकूम करावे व ते अधिकाऱ्यांनीं पाळावे याचें नांव स्वराज्य ! या परिषदेला कलेक्टरसाहेब कां हजर राहिले नाहींत ? तें त्यांचें काम होतें. त्यांना इतर कामें पुष्कळ असतील पण जेथें जिल्ह्यांतील सर्व लोक कांहीं विचार करण्याकरितां जमा झाले तेथें हजर राहून लोकांच्या तक्रारी ऐकणें हें कलेक्टरसाहेबांचें कर्तव्य होय ! ( टा० ) लोकमत काय वाटेल तें असेल पण आज तें

## ऐकून घेतो कोण ?

आम्हांला कलेक्टर नकोत असें नाहीं. आम्हांला कलेक्टर पाहिजेत, अम्मलदार पाहिजेत, पण ते लोकांच्या तंत्रानें वागणारे पाहिजेत. याचेंच नांव स्वराज्य स्वराज्य म्हणजे बादशहांना घालवायचें नाहीं. बादशहा पाहिजेत, स्वराज्य पाहिजे, सर्व पाहिजे, स्वराज्य स्वराज्य म्हणजे काळ्या प्रजेचे हक्क — मी काळाच आहें तेव्हां काळी प्रजा नाहीं म्हणून काय उपयोग ? ( हंशा ) काळे लोक गोऱ्या प्रजेप्रमाणें झाले पाहिजेत. ( टाळया. ) अमुक झाले अर्ज करा, तमुक झालें विनंति करा, हें सारें आज भीक मागावयाचें लक्षण आहे. ( हंशा ) लोकांचीं गाऱ्हाणी ऐकणें हें काय कलेक्टर साहेबांचें काम नाहीं ? आम्हांला कोणाचा उपमर्द करावयाचा नाहीं. आमचें म्हणणें इतकेंच कीं तुम्हीं लोकांचा पगार खातां, तुम्हीं लोकांची नोकरी बराबर करा ! [ टाळया. ] प्रजा जसें म्हणेल तसें तुम्हांला वागलें पाहिजे. तुम्हांला बादशहांनीं लोकांचे नोकर म्हणून नेमलें आहे ना ? अशा सभा आज आम्ही ४० वर्षें करीत आलों आहों पण उपयोग काय झाला ? सभा करूं नयेत असें माझें म्हणणें नाहीं. ठरावहि केले पाहिजे जें ज्या परिस्थतींत शक्य असेल तें केलेंच पाहिजे त्याबद्दल वाद नाहीं. पण परिस्थिती-परिस्थती म्हणून तरी किती दिवस ओरड करणार ? परिस्थिती प्रतिकूल असली तर ती बदलणें हें तुमच्या हातचें आहे. पशूला परिस्थितीशीं नमून वागावें लागतें—पण मनुष्य हा परिस्थती वांकवूं शकतो. [ टाळया ] बादशहांच्याच साम्राज्यछत्राखालीं काळा गोरा

## असा भेद कां ?

बादशहांना हा भेद नको आहे. काळा व गोरा हे सम हक्काचे झाले कीं स्वराज्य झालें !

पूर्वी स्वराज्य झटलें कीं भीति वाटत होती. पण स्वराज्याचें ध्येय योग्य होय असा आतां न्याय कोर्टानेंच निकाल दिला आहे–आतां भीतीचें कारण राहिलें नाहीं. ( टाळ्या. ) ध्येय कायदेशीर ठरलें. पण आतां त्यासाठीं प्रयत्न करण्यास तयार आहांत का, हा प्रश्न आहे. अशा वेळीं जर कचराल तर तुमच्यासारखे दुर्भागी कोणी नाहींत असें झटलें पाहिजे. तुम्हीं आतां काय करणार हें विचारण्यासाठीं मी येथें आलों आहें. पशुत्व जाणें याचें नांव स्वराज्य. गोठ्यांत बांधलेल्या जनावरांचा मालक चारा घालील तेव्हां तो त्यांना मिळतो. त्या बिचाऱ्यांना अर्जहि करतां येत नाहीं. तुम्हांला ही स्थिति रुचते का ? तलाव बांधला अर्ज करा, मलेरिया झाला अर्ज करा, प्लेग झाला अर्ज करा, [ संतापून ] हा काय पोरखेळ आहे ? ( गांभीर्य ) जरा विचार करा. बादशहांनीं नेमलेले नोकर जर तुमच्या ह्मणण्याप्रमाणें वागत नसले तर सत्ता आपल्या हातीं घेण्याचा उद्योग करा. यश यायचें किंवा न यायचें हें तुमच्या उद्योगावर अवलंबून आहे.

## विघ्नें येतील.

नाहीं असें मी म्हणत नाहीं. पण विघ्नें आलीं नाहींत तर त्यांत तुमचा पुरुषार्थ तरी काय ? [ टाळ्या. ] कोणी तुम्हांला सकाळसंध्याकाळ नळीवाटे जेवण घालूं लागला तर तें तुम्हांला रुचेल का ? रुची ही अन्नांत नाहीं. ती स्वकष्टांत आहे. स्वकष्टानें मिळविलेलें अन्न जास्त गोड लागतें याचा हाच अर्थ होय. आतां उद्योग करणार कीं स्वस्थ बसणार हें विचारण्यासाठीं मी उभा राहिलों आहें. यंदा विनंती करा. पुन्हां पुढच्या वर्षी तीच रड. असेंच चालेल तर पुढें तुमची गुलामगिरीसारखी दुःस्थिती होईल. म्हणे तुम्हांला येत नाहीं. येत नाहीं तर शिकवा. आणि शिकावयाचें तरी काय आहे ? आमचे अध्यक्ष कोणत्याहि वरिष्ठ अंमलदारापेक्षां हुषार आहेत. त्यांच्याइतकें अस्खलित इंग्रजी फार थोड्या साहेबांना येत असेल ! आणि ही स्थिती महाराष्ट्रानें सहन करावी ? महाराष्ट्रानें सर्व जगाला दाखविलें आहे कीं महाराष्ट्र हा अपमान सहन करणार नाहीं ! ( टाळ्या ) याच पूर्वीच्या इतिहासप्रसिद्ध मराठ्यांचे तुम्हीं वंशज ना ? ( टाळ्या ) मग तुम्हीं स्वस्थ बसणार ? ( नाहीं ! ) 'होमरूललीग खटखट करते आहे, बघावें काय होतें तें !' असे उद्गार कां ? 'बघावें' काय तुमचें कपाळ ? हें काय तुमचें काम नाहीं ? तुह्मीं कां पुढें होत नाहीं ? अमुक काय होतें बघावें असे

नामर्दपणाचे उद्गार कां ? ( टाळयांवर टाळया. ) जर तुमच्या हातून कांहीं होत नसेल तर या सभास्थानांतून उठून आसपासच्या

**गोठ्यांत जाऊन बसा ! ! !**

( गांभीर्य ! ) आमचे शिंदे म्हणतात, अमुक अस्पृश्य ! अस्पृश्य कोण ? या अधिकारीवर्गाशीं आम्हीं सारेच अस्पृश्य झालों आहों ! ब्राम्हणसुद्धां साहेबांना अस्पृश्यच ! ! कलक्टरसाहेबाला भेटायला गेलें तर लांब बसावें लागतें अशी आज सर्वांचीच स्थिती आहे; अशा वेळीं हा पुढारी, हा मागासलेला या भांडण्याला काय शहाणपणा म्हणायचा कीं काय म्हणायचें ? दुसरा म्हणतो बायकांची स्थिती सुधारली पाहिजे. पण हिंदुस्थानांतले पुरुष नांवानें नसले तर कृतीनें बायकाच झाले आहेत हें कोण पहातो का ? उत्तरोत्तर देशाची काय दशा होत चालली आहे तें पहा ! ही स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणाऱ्या बायका असोत, ब्राह्मण असोत, अस्पृश्य असोत, ब्राह्मणेतर असोत—जो कोणी देशाचें कार्य करायला पुढें येईल त्याला मी देवाप्रमाणें मानायला तयार आहें ! ( टाळया ) हें देशाचें कार्य आहे--यांत अभिमान नाहीं--स्पृश्य अस्पृश्य नाहीं. ( टाळया ) हें कराल तर तुम्हांला जग माणसें म्हणेल हें ध्यानांत ठेवा. देशाची लोकसंख्या मोठी, लोक विद्वान्, माणसें धट्टीकट्टी पण कांहीं होत नाहीं. असें कां ? या अधिकारी वर्गाच्या राज्यपद्धतीनें देशांतील वीर्याचीच हानी झाली आहे. आजपर्यंत आमचें म्हणणें ऐकण्यासच कोणी तयार नव्हता, पण आतां या महायुद्धानें सरकार ऐकावयास तयार झालें आहे. इंग्लंडजवळ हत्यारें पुष्कळ आहेत—पण तीं धरायला कोणी

**माणसें हवीं ना ?**

इंग्लंडला वाटलें होतें कीं हिंदुस्थानांत सहज ५।२५ लाख लढवय्ये निघतील ! आणि तीन कोटी लोकांत ५।२५ लाख सैन्य जमणें काय अशक्य आहे ? पूर्वीच्या राजांजवळ इतकें सैन्य असे. मग आज मोठी माराकुटी करून ४।५ लाखच लोक कां जमले ! आतां म्हणतात लोक द्या. १०० वर्षें झोंप काढलीत, कोणी छाती वर काढूं नये म्हणून प्रयत्न केलेत आणि आतां सैन्य द्या. कोठून ? माणसें पुढें येत नाहींत म्हणून आतां आम्हांला कां दोष देतां ? आतां नशिबाला बोल लावा, कर्माला रडा ! ! ! प्रसंग आला तेव्हां आज इंग्लंड जागें झालें आहे. आम्हांला नामर्द बनविलें नसतें तर आज ५।५० लाख लोक साम्राज्याला लढायला नसते मिळाले ? आम्हीं आपली मागणी केली त्यावर चर्चाहि झाली. आतां म्हणतात, वरिष्ठ सरकारचे हक्क मागूं

नका, प्रांतिक हक देतों ! असें कां ? ज्यांचे पैसे त्यांच्याच धोरणानें राजधोरण चाललें पाहिजे. ( टाळ्या. ) अधिकार द्या ही आमची मागणी आहे. आमच्या हातांत लगाम द्या. घोड्यावर तुम्ही स्वार झालांत तरी आम्हांला चालेल ! मागणी थोडी आहे.

## फक्त लगाम मागा.

आम्ही घोड्यावर आणि तुमच्या हातीं लगाम हें आतां आम्हांला नको आहे. म्हणतात, लगाम ही लहान वस्तू आहे ती शेवटी देऊं ! हें नको. लहान वस्तू आम्हांला पुरे, पण लगाम हातीं पाहिजे. [ टा० ] पडलों तरी आम्हांला चालेल. पडण्याचा अधिकार आमचा आहे, आज पडलों तर उद्यां शहाणे होऊं ! हळूहळू देऊं हें म्हणणें आतां चालणार नाहीं. कॉंग्रेसमध्यें पुनः जशाचा तसाच स्वराज्याचा ठराव पास झाला आहे. आम्हीं आतां कमी घेणार नाहीं ( टाळ्या. ) आयर्लंडचे लोक ठरवतील तें द्यायला आज इंग्लंड तयार आहे मग आह्मींच काय पाप केलें ? मांटेग्यु साहेब अधिकारी वर्गाचें व आमचें भांडण तोडण्यास आले आहेत, पण तें माकडाच्या गोष्टीसारखें न होवो म्हणजे झालें ! एक माकड दोन मांजरांच्या खव्याच्या वांटणीचा तंटा तोडावयास बसलें ? थोडा खवा पारड्यामध्यें जास्त झाला कीं तो तोंडांत टाकावा--पुन्हा खवा वजन करावा. ही वांटणी आम्हाला नको आहे. आमची मागणी आम्हांला मिळालीच पाहिजे ( टाळ्या) आम्ही आपलें म्हणणें मॉंटेग्यूसाहेबांपुढें मांडलें आहे. अधिकारीवर्गाच्या गांठी आजकाल मांटेग्युसाहेब घेत आहेत. ते लौकरच इंग्लंडास जातील व तेथें पार्लमेंटपुढें दावा दाखल होईल. अशा वेळीं आपण जर मांटेग्युसाहेबांस मदत केली नाहीं तर वादी हजर नाहीं म्हणून दावा काढून टाकण्यात येईल हें लक्षांत ठेवा. पार्लमेंटपुढें आमच्या स्वराज्याचा प्रश्न निघाला असतां आपली स्थिती तेथील जनतेस कळविण्याकरितां

## आमची मंडळी

तेथें गेली पाहिजे. मांटेग्युसाहेब आपल्याला थोडेफार अनुकूल असले तरी अधिकारीवर्गाकडेही त्यांचें मन जाणें स्वाभाविक आहे. त्यांत मांटेग्युसाहेबांना दोष देण्याचा माझा मुळींच उद्देश नाहीं. खुद्द इंग्लंडमध्यें आज स्वराज्याला विरोध करावयास सिडनहॅमसारखी मंडळी टपून बसली आहे. त्यांचें म्हणणें खोडून काढून इंग्लंडच्या लोकांची खात्री करून देणें आपलें कर्तव्य आहे. या कर्तव्याला चुकला तर मुकला हे ध्यानांत धरा. आफ्रिकेंतील लोकांनासुद्धां स्वराज्य देऊं असें मुख्य प्रधान म्हणत आहेत--अशी ही स्वराज्यानुकूल मंगल वेळ आहे. ही घालवूं नका. अशी सोन्यासारखी

संधी पुनः १०० वर्षांत येणार नाहीं. स्वराज्य हा परीस आहे तो मागा. म्हणजे सर्व कांहीं सुवर्ण बनेल. प्रत्येक दरवाज्यावर लाथ मारून घर उघडत नाहीं. तुमचें घर तुमच्या हातीं यावयास पाहिजे असेल तर मुख्य दरवाजाची किल्ली मागा म्हणजे सर्व दरवाजे आपोआप उघडतील. स्वराज्य ही कांहीं फुकटची गोष्ट नाहीं. ( टाळ्या ) हा टाळ्या वाजविण्याचा प्रसंग नाहीं. ही प्रयत्न करण्याची वेळ आहे परमेश्वर अनुकूल आहे तोंच प्रयत्नांची शिकस्त कराल तर यश येईल. आज तुम्हीं आळस कराल तर तुमचेच वंशज अपयशाचें खापर तुमच्याच डोक्यावर फोडतील हें विसरूं नका. प्रयत्न करण्यांत

## कुचराई करूं नका.

कोणी म्हणतात, तुम्हीं विलायतेला जाऊं नका, सबमरीन येईल ! पण सबमरीनची एवढी भीति आहे ? प्लेग हा ' आ ' पसरून बसलेलाच आहे. संकटांना भिणें यांत मनुष्यपणा कसला ? साहस पाहिजे तर साहसहि केलेंच पाहिजे. आम्हां स्वराज्य हिसकावून घेऊं अशी हिंमत बाळगा. स्वराज्य हिसकावून घ्यायचें म्हणजे त्याला बंदुकीची गोळीच जरूर नाहीं. केवळ दृढनिश्चयानें व सनदशीर उद्योगानें आपलें काम भागणार आहे. कर्म करा, त्याला फळ आलेंच पाहिजे हा कर्मशास्त्राचा गहन सिद्धांत आहे ( टाळ्या ) साहेब, आज एवढें दिलेंत तरी पुरे असें म्हणूं नका. आमच्या मागणीपेक्षां कमी मिळालें तर हिंदी लोक संतुष्ट राहणें शक्य नाहीं असें निर्भीडपणें व निश्चयानें सांगा. तुमचें पौरुष पाहण्याकरितां परमेश्वरानें हीं भुतें-संकटें-पाठविलीं आहेत, त्यांना पायांखालीं दाबून टाकलीं पाहिजेत. स्वराज्य ही कामधेनु आहे. तिची सेवा करणें ही थट्टेची गोष्ट नाहीं. दिलीपानें कसा आपला जीव संकटांत घातला हें ध्यानीं आणा. परमेश्वर वस्तू आणून देत नाहीं, तो प्रयत्नांना यश देतो. गाई-म्हशींना जसे तुम्हीं हातांत दंड घेऊन हांकतां तसें परमेश्वर तुम्हांस

## हातांत दंडका घेऊन

हांकणार नाहीं. ( हंशा ) परमेश्वरानें सर्व साहित्य निर्माण केलें आहे, आतां अन्न शिजविण्याच्या उद्योगाला लागा. दृढ निश्चयानें स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नांना लागा असा शेवटचा निरोप परमेश्वराच्या स्फूर्तीनें तुम्हांस कळवून व परमेश्वर तुम्हांला उद्योग करण्याची बुद्धी देवो अशी त्याची प्रार्थना करून मी माझें भाषण संपवितों."

( टाळ्यांचा प्रचंड कडकडाट )

मराठी ग्रंथ संग्रहालय

( आक्षेप घेतलेलीं भाषणें. )

लो० बाळ गंगाधर टिळक यांचें होमरूलवरील

# बेळगाव येथील व्याख्यान.

( ता. १ मे सन १९१६, )

" मला आज या ठिकाणीं व्याख्यान देण्याकरितां जेव्हां विनंति करण्यांत आली त्या वेळीं कशावर व्याख्यान द्यावें हें मला कांहीं कळेना. कोणत्याहि विषयाची विशेष तयारी करून आज मी आपल्यापुढें उभा राहिलों नाहीं. आलों होतों तो परिषदेकरतां. तेव्हां या २।४ दिवसांत ज्या विषयांची चर्चा झाली आणखी कांग्रेसच्या-पूर्वी ज्या कामाकरितां येथें एक होमरूल लीग स्थापन झाली त्याच विषयासंबंधीं आपल्याला दोन शब्द कळविले असतां अयोग्य होणार नाहीं असें वाटल्यावरून मी आजच्या व्याख्यानाचा तो विषय निवडला आहे.

स्वराज्य ह्मणजे काय ? ह्याच्याबद्दल पुष्कळांचा गैरसमज आहे. कित्येकांनां ही गोष्ट कळत नाहीं. कित्येकांनां ती गोष्ट कळून ते-तिचा विपर्यास करतात. कित्येकांनां ही गोष्ट नको असते. असे त्यांत अनेक प्रकार आहेत. तेव्हां स्वराज्य ह्मणजे काय ? आह्मी तें कां मागतों ? त्याला आह्मी पात्र आहों कीं नाहीं ? आणि आपल्याला ज्यांच्या जवळ ही स्वराज्याची मागणी करावयाची आहे त्यांच्या जवळ ती कोणत्या प्रकारानें केली पाहिजे; आपल्याला उद्योग करावयाचा तो कोणत्या दिशेनें आणि कोणत्या धोरणानें केला पाहिजे इत्यादि गोष्टीबद्दल चार सामान्य शब्द सांगण्यापलीकडे कोणत्याहि प्रकारचें विशिष्ट विवेचन करण्याला मी आज तयार नाहीं. हे जे सामान्य शब्द मी आपल्याला सांगणार आहें ते सामान्य शब्द केवळ माझ्याच प्रयत्नानें माझ्याच उद्योगानें आज उपस्थित झाले आहेत असें नाहीं. स्वराज्याची कल्पना फार जुनी आहे. अर्थात् स्वराज्य ह्मटलें ह्मणजे ' स्व ' च्या उलट कांहीं तरी राज्य असतें आणि त्या वेळीं ही कल्पना निघत असते. हें उघड आहे. अशी स्थिति जेव्हां येते तेव्हां स्वराज्य असावें असें वाटूं लागतें आणि

त्या कामाकरितां माणसें उद्योग करतात. तशा स्थितींत तुह्मी हल्लीं आहां. तुमच्यावर जे राज्य करीत आहेत ते तुमच्या धर्माचे, जातीचे, तुमच्या देशांतीलही नाहींत. हें इंग्रज सरकारचें राज्य चांगलें कीं वाईट हा प्रश्न निराळा. स्वकीय आणि परकीय हा प्रश्न निराळा. दोहोंचा घोटाळा पाहिल्यानें करूं नका.परकीय वा स्वकीय हा प्रश्न आला म्हणजे परकीय म्हटलें पाहिजे. तुमच्यावर चांगलें कां वाईट हा प्रश्न आला तर चांगलें म्हणा किंवा वाईट ह्मणा. वाईट ह्मटलें तर त्यांत काय सुधारणा केली पाहिजे हा प्रश्न निराळा. चांगलें ह्मटलें असतां पूर्वींच्या राज्यापेक्षां त्यांत चांगल्या गोष्टी कोणत्या हें पाहिलें पाहिजे. या भिन्न भिन्न दृष्टी आहेत. तेव्हां पहिल्यानें स्वराज्याची मागणी निघण्याचें कारण असें झालें आहे कीं, या पूर्वीं जीं आपल्या हिंदुस्थानांत अनेक राज्यें होतीं-कांहीं ठिकाणीं मुसलमानांचें होतें कांहीं ठिकाणीं रजपुतांचें होतें, कांहीं ठिकाणीं हिंदूंचें होतें व कांहीं ठिकाणीं मराठ्यांचें होतें. तीं हीं जीं स्वराज्यें होतीं तीं वाईट कां चांगलीं हा प्रश्न निराळा हें मी पुनः बजावतों. तें मग पाहूं. ती सगळीं मोडून एकछत्री राज्य हिंदुस्थानांत इंग्रज सरकारचें झालें आहे तीं मोडण्याचा इतिहास आज आपल्याला बघावयाचा नाहीं. कशीं मोडून गेलीं हें ही आपल्याला आज बघावयाचें नाहीं व मला सांगावयाचेंही नाहीं. पण हल्लींची राज्यव्यवस्था अशी आहे कीं कांहीं इंग्लंडांत शिकलेले सुशिक्षित ज्यांना कॉलेजातून चांगल्या प्रकारचें शिक्षण मिळालें आहे अशा कर्तबगारीचे लोक हिंदुस्थानांत येऊन त्यांच्या द्वारें हिंदुस्थानांतील राज्यकारभार चाललेला असतो. बादशहा हें नांव आहे. राजा ह्मणून जी कांहीं एक प्रकारची भावना तुमच्या मनांत उत्पन्न होते त्या भावनेला व्यक्त स्वरूप दिलें ह्मणजे हल्लींचा बादशहा होतो. ही भावना अव्यक्त आहे. या अव्यक्ताला व्यक्त स्वरूप दिलें ह्मणजे राजा होतो-बादशहा होतो-पण कारभार कांहीं बादशहा पहात नाहीं. स्वराज्याचा जो प्रश्न आहे तो बादशहाबद्दलचा नव्हे आणि या अव्यक्त भावनेबद्दलचाहि नव्हे. हें पहिलें लक्षांत ठेवलें पाहिजे. कोणताहि देश असो.त्याला राजा पाहिजे, व्यवस्था कारणारा कोणी तरी मनुष्य पाहिजे आणि त्यामध्यें एक प्रकारचें राज्यहि चाललें पाहिजे. अराजक राष्ट्रांची गोष्ट निराळी. हीं राष्ट्रें कधीं वर येत नाहींत. घरामध्यें ज्याप्रमाणें कोणी तरी व्यवस्था पहाणारा मनुष्य पाहिजे—घरचा पुरुष नसला तर बाहेरचा trustee म्हणून आणतात तशीच राज्याचीही व्यवस्था आहे. कोणत्याहि देशांत त्यांतील कारभार चालविण्याकरितां कांहीं मंडळी असते; आणि कांहीं व्यवस्था असते. ही जी व्यवस्था

आहे-ही जी मंडळी आहे-ह्यांचा आणि अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत काल सांगितल्याप्रमाणें राजा या भावनांचें-या दोन्हीं गोष्टींचें पृथक्करण केलें पाहिजे. राजा पाहिजे. राज्यव्यवस्था पाहिजे. हे दोन्ही सिद्धांत इतिहासदृष्ट्या अबाधित आहेत. ज्या देशांत व्यवस्था नाहीं ज्या ठिकाणीं राजा नाहीं म्हणजे देखरेख करणारी कांहीं एक मंडळी नाहीं त्या ठिकाणीं महाभारतांत असें वर्णन केलें आहे कीं " त्या ठिकाणीं शहाण्या मनुष्यानें एक क्षणभर देखील राहूं नये. त्या ठिकाणीं आपल्या जीविताचा कधीं घात होईल, आपलें वित्त केव्हां कोण चोरून नेईल, आपल्या घरावर केव्हां दरवडा येईल किंबहुना आपल्या घराला केव्हां आग लागेल ह्याचाहि कांहीं नेम नाहीं." सरकार पाहिजे. प्राचीन काळीं कृतयुगामध्यें काय काय होतें तें मी सांगत बसत नाहीं. त्या वेळच्या लोकांना राजा लागत नव्हता. जो तो परस्पराचें कल्याण कशांत आहे हें पाहूनच व्यवहार करीत असे. राजा नव्हता अशी एकदां स्थिति होती. असें आमच्या पुराणांतून वर्णन आहे. पण अशी स्थिति इतिहासाच्या काळीं होती कीं नाहीं याचा जर आपण विचार केला तर इतिहासकाळीं अशी स्थिति नव्हती असें दिसून येईल. कोणी तरी नियंता पाहिजे. सर्व लोकांना एके ठिकाणीं जमून दरएक वेळीं तें नियंत्रणत्व चालवितां येत नाहीं. म्हणून राजसत्तेचे नेहमीं दोन विभाग होतात. एक सल्लागार मंडळ आणि एक कार्यकारी मंडळ. हल्लीं हिंदुस्थानांत जो प्रश्न स्वराज्यासंबंधानें उपयोग झालेला आहे तो या वरच्या अव्यक्त कल्पनेबद्दलचा नाहीं. आमच्यावर ज्यांनीं राज्य करावयाचें ज्यांच्या तंत्रानें हुकमानें ज्यांच्या अधिष्ठानाखालीं तें राज्य चालावयाचें त्याबद्दलचा हा प्रश्न नव्हे. इंग्रज लोकांच्याच हाताखालीं इंग्रजराष्ट्राच्या देखरेखीखालीं इंग्रज राष्ट्राच्या मदतीनें त्यांच्या सहानुभूतीनें आणि त्यांच्या कळकळीनें त्यांच्या ज्या कांहीं उच्च भावना आहेत त्या भावनांच्या योगानें आम्ही आपलें कल्याण करून घ्यावें ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि याबद्दल मला कांहीं बोलावयाचें नाहीं. ( टाळ्या. ) ही पहिली गोष्ट आहे. दोन्ही गोष्टींचा आणखी भ्रम करून घेऊन मनामध्यें घोंटाळा करून घेऊं नका. या दोन्ही गोष्टी अगदीं भिन्न आहेत. आम्हाला जें कांहीं करावयाचें आहे तें कोणाच्या तरी -आज आम्हीं अशा पंगू स्थितीमध्यें आहोंत ह्मणून- सहायानें केलें पाहिजे. त्यांच्या आश्रयानें आपलें कल्याण आपल्याला करून घेतलें पाहिजे. एवढी गोष्ट निर्विवाद आहे. असें

नसतें तर तुमचें स्वातंत्र्य कधींहि गेलें नसतें. तेव्हां ही गोष्ट जर आपण गृहीत धरली कीं इंग्रजसरकारच्या इंग्रजीराज्याच्या मदतीनें आपला भाग्योदय आपल्याला करून घ्यावयाचा तर यामध्यें जो कांहीं कांहीं लोकांना आणखी एक चमत्कारिक प्रकार वाटतो तो सर्व नाहींसा होईल. निराळ्या शब्दांनीं बोलावयाचें म्हणजे यांत कांहीं राजद्रोह नाहीं—मग तुम्हाला जर इंग्रजसरकारच्या मदतीशिवाय–इंग्रजसरकारच्या म्हणजे अव्यक्त इंग्रजसरकार असे शब्द वापरले म्हणजे कांहीं चूक व्हावयाची नाहीं–या अव्यक्त इंग्रजसरकारच्या मदतीनें या अव्यक्त इंग्रजसरकारच्या सहायानें जर तुम्हाला आपला भाग्योदय करून घ्यावयाचा असेल तर मग तुम्हीं मागतां काय आहांत ? हा दुसरा प्रश्न उपस्थित होतो. ह्याचें उत्तर पुनः मी आपल्याला जो भेद सांगितला त्या भेदामध्येंच आहे. अव्यक्त जरी सरकार असलें तरी तें जेव्हां व्यक्त होऊं लागतें त्यांच्या हातून त्यांच्या कृतीनें त्या राज्याची व्यवस्था ठेवली जाते. हा जो व्यक्तभाव आहे हा अव्यक्त सरकारापासून निराळा आहे. कोणत्या प्रकारचा म्हणाल तर परब्रह्म जसें निराळें आहे मायेहून त्या सारखें. हे व्यक्त अव्यक्त शब्द मी वेदांतांतून घेतले आहेत. निर्गुण निराकार असें परब्रह्म निराळें. आणि मायेच्या मोहांत यावयाला लागलें म्हणजे मग त्याला जें व्यक्त स्वरूप येतें तें निराळें. तर मग हे मायेचे जे व्यवहार आहेत ते पालटणारच. मायेचें लक्षण काय क्षणोक्षणीं बदलणें. सरकार रहावयाचें एक. अव्यक्त सरकार. आणि व्यक्तसरकार क्षणोक्षणीं पालटणारें आहे. स्वराज्य जो शब्द हल्लीं निघाला आहे तो व्यक्तसरकारासंबंधानें आहे. अव्यक्तसरकार एक ठेवून व्यक्त सरकार जें क्षणोक्षणीं बदलणारें त्यांत कोणत्या प्रकारचा बदल झाला असतां आपल्या राष्ट्राला श्रेयस्कर होईल हा प्रश्न स्वराज्याचा आहे. आणि हा स्वराज्याचा प्रश्न ह्मटला म्हणजे आपल्या हिंदुस्थानांत हल्लीं ज्या तऱ्हेचा कारभार चालला आहे. तो कोणाच्या हातांत असावा असा प्रश्न उपस्थित होतो. अव्यक्तसरकार—इंग्रजसरकार—आम्ही बदलूं इच्छित नाहीं. व्यक्त जें स्वरूप आहे ज्यांच्या हातून हें अव्यक्त सरकार कामें करून घेत आहे त्यांच्या हातीं नसून दुसऱ्या कोणाच्या हातीं यावा असें आमचें म्हणणें आहे. ज्यांच्या हातानें हे कारभार चालले जातात त्यापेक्षां दुसऱ्या कोणत्या तरी हातानें दुसऱ्या कोणाच्या तरी सहाय्यानें दुसऱ्या कोणत्या तरी व्यक्त मूर्तीनें हें केलें असतां लोकांना हितकारक होईल अशा समजुतीनें हल्लीं जी

स्वराज्याची चळवळ चालू आहे ती चळवळ आज चाललेली आहे. दुसरें उदाहरण द्यावयाचें असेल तर असें सांगतां येईल कीं इंग्लंडांत बादशहा आहेत. एका इंग्रजी कायद्याचा असा नियम आहे कीं King commits no wrong राजा कधींही गुन्हा करीत नाहीं. कारण त्याची सत्ता अशा प्रकारें मर्यादित केली असते कीं त्याला जेव्हां कोणी एखाद्या प्रधानानें जाऊन सांगावें त्यावेळीं त्याला तें कळतें. मुख्य प्रधान आपल्या जबाबदारीवर कार्यें करीत असतो. इंग्रजी इतिहासाचें अध्ययन केलेले येथें पुष्कळसे असतील. नाहीं असें नाहीं हें तत्व त्यामध्यें मुख्य आहे. हें तत्व इंग्रजी इतिहासांत उद्भुत झालें असल्यामुळें तेथें राजद्रोहाचे खटले कमी होऊं लागले. आणि येथें हे राजद्रोहाचे खटले करूं लागतात. राज्य चालविणारे निराळे आणि राजा निराळा. राजा एकच परंतु प्रधानमंडळ पांच पांच वर्षांनीं बदलत असतें. त्या वेळेला असें कोणी कांहीं ह्मणत नाहीं कीं हें प्रधानमंडळ बदलावें याबद्दल जर कोणी कांहीं चर्चा करूं लागला तर तो राजद्रोह झाला. इंग्लीश लोकांच्या डोळ्यांदेखत या प्रत्यही घडणाऱ्या गोष्टी आहेत. राजाचें मंडळ पांच वर्षांनीं गेले दोन वर्षांनीं गेले त्यांनीं आपसांत वाटेल तितकें भांडावें. राजाला काय ? तो निर्गुण परब्रह्म. त्याला कांहीं याचा लेप नाहीं. तर हल्लीं हिंदुस्थानांत जी स्वराज्याची चळवळ आहे ती असलें प्रधान मंडळ बदलण्याबद्दलची आहे. कोण हिंदुस्थानांत राज्य करतो. बादशहा येऊन करतात कां ? मोठ्या प्रसंगी देवासारखी त्यांची मिरवणूक काढावयाची त्यांच्या ठिकाणीं आपली निष्ठा आपण प्रदर्शित करावयाची एवढेंच त्यांचें काम आहे. मग राज्यकारभार चालला आहे कोणाच्या द्वारें ? हल्लीं जे नोकर आहेत स्टेटसेक्रेटरी व्हाईसराय गव्हर्नर त्यांच्या हाताखालीं कलेक्टर पाटील आहे. पोलीस शिपाई शेवटीं घेऊं आपण. यांच्या द्वारें चालला आहे. एक पोलीस शिपाई बदलावा व दुसरा पोलीस शिपाई द्यावा असें ह्मटलें तर राजद्रोह झाला काय ? एक कलेक्टर आला हा नको दुसरा कलेक्टर पाहिजे असें म्हटलें तर राजद्रोह झाला काय ? एक गव्हर्नर नको दुसरा गव्हर्नर आणा असें ह्मटलें तर राजद्रोह झाला काय ? हा स्टेटसेक्रेटरी नको दुसरा आणा असें ह्मटलें तर राजद्रोह झाला काय ? कोणीही ह्याला राजद्रोह ह्मटलें नाहीं. पोलीस शिपायाला जो न्याय लागू आहे तोच स्टेटसेक्रेटरीलाही लागू आहे स्टेटसेक्रेटरी ज्या राजाचा प्रधान आहे ज्या राजाचा तो नोकर आहे त्या राजाचीच आह्मी प्रजा आहोंत. मग असें जर आहे तर हा स्टेटसेक्रेटरी नको हा व्हाईसरॉय नको

बंगाल्यांत फुल्लरसाहेब नको आणखी गव्हर्नरच्या बाबतींत असे पुष्कळदां ठराव झालेले आहेत. हल्लींच्या काळीं नाहींत. मागच्या काळीं. असें जर कोणी झटलें तर आणि त्याला कारणें दिलीं तर तुझी त्याला असें झणाल कीं ह्याचें डोकें फिरलें असेल तो कारणें देतो तीं वरी किंवा पुरी नाहींत. पण तो असें झणूं लागला म्हणजे तो राजद्रोह झाला असें मात्र इतिहासदृष्ट्या होत नाहीं. ( टाळ्या. ) आमचें जें मागणें आहे तें दुसऱ्या वर्गांतील आहे स्वराज्यासंबधानें आहे.

मी काय म्हणतों हें नीट लक्षांत ध्या. हल्लींची राज्यव्यवस्था नीट चालली असेल असें जर तुम्हाला वाटत असेल तर माझें कांहीं झणणें नाहीं. हल्लीं ज्या कांग्रेसा होतात कान्फरन्सें होतात त्यामध्यें तुझी येऊन सांगतां कीं आमचें कुळकर्णी वतन घेतलें, जंगल खात्यांसंबंधीं आमच्यावर जुलूम झाला. अबकारीच्या संबंधी दारूचा अधीक प्रसार झाला. शिक्षणही आम्हाला ज्या तऱ्हेचें मिळालें पाहिजे त्या तऱ्हेचें मिळत नाहीं. या सगळ्यांचें मूळ काय आहे ? हें नुसतें सांगण्यांत काय फायदा आहे, तुझाला शिक्षण कां मिळत नाहीं ? अबकारी खात्याचीं दुकानें जेथें आपल्याला नको तेथें कां उघडलीं जातात ? फारेस्टमध्यें रिझर्व फारेस्ट अमूक फारेस्ट तमुक फारेस्ट अशा तऱ्हेचे कायदे होतात. ते कां झाले ? हल्लीं कांग्रेसच्या पुढें ह्याच्या याद्याच्या याद्या येत असतात. ज्यूरी तुमची बंद कां झाली तुमच्या इच्छेविरुद्ध ? कर्नाटकांत आजपर्यंत कालेज कां निघालें नाहीं ! हे सगळे प्रश्न अशा तऱ्हेचे आहेत कीं त्यांना एकच उत्तर आहे. आज आमचे विचार काय चालले असतात कीं कालेज नाहीं कां करा कलेक्टरला अर्ज किंवा गव्हर्नरला करा. कारण त्यांच्या हातांत सत्ता आहे. ही सत्ता तुमच्या हातांत आली असती, त्यांच्या ठिकाणीं जर तुम्ही अधिकारी असता किंवा त्यांचे अधिकार लोकमताला जबा- बदार असते तर या गोष्टी घडून आल्या नसत्या. याशिवाय याला दुसरें उत्तर देतां येत नाहीं. या घडून येण्याला कारण सत्ता तुमच्या हातांत नाहीं. तुझी झणजे ज्यांच्या कल्याणाकरितां ही सर्व व्यवस्था करावयाची असे जे तुझी त्यांना या गोष्टी ठरविण्याचा अधिकार दिलेला नाहीं. तेव्हां आझाला काय मागावयाचें असेल तें लहान पोरासारखें होतें. भूक लागली म्हणजे तें रडतें त्याला सांगतां येत नाहीं भूक लागली. मग आईनें ओळखावयाचे भूक लागली असेल किंवा त्याच्या पोटांत दुखत असेल. कित्येक वेळेला उपचार होतात ते केवळ अनाठायीं होतात. तशी आपली आज

सध्यां स्थिती झालेली आहे. तुम्हाला काय पाहिजे कोठें आडतें आहे हें पहिल्यानें तुम्हाला कळत नाहीं मुळींच. ते कळूं लागलें तेव्हां तोंडानें तुह्मी बोलूं लागला. परंतु तुमच्या बोलाप्रमाणें करवून घेण्याची शक्ती तुमच्या हातामध्यें नाहीं अशी स्थिति असल्यामुळें हल्लीं काय झालेलें आहे. जें काय करावयाचें, जें काय पाहिजे तुह्मांला–घरामध्यें विहीर खणावयाला–पाहिजे कलेक्टर साहेबाकडे अर्ज करा. रानांतील वाघ मारावयाला पाहिजे कलेक्टरसाहेबाकडे करा अर्ज. गवत मिळत नाहीं जंगलांतील भारा मिळत नाहीं गवत तोडण्याची परवानगी पाहिजे करा कलेक्टरसाहेबाकडे अर्ज. ह्मणजे हें सर्व दुबळ्यासारखें झालेलें आहे. ही व्यवस्था आम्हांला नको आहे. यापेक्षां कांहींतरी चांगली व्यवस्था पाहिजे तें स्वराज्य. तें होमरूल. पहिल्या पहिल्यानें हे प्रश्न निघत नाहींत. ज्याप्रमाणें मुलगा लहान असला ह्मणजे त्याला कांहीं कळत नाहीं. मोठा झाला ह्मणजे या गोष्टी कळूं लागतात. मग त्याला असें वाटूं लागतें कीं आपल्या घरांतील व्यवस्था कांहींतरी आपल्या मताप्रमाणें झाली तर चांगली. तसेंच राष्ट्राचें. ज्याप्रमाणें त्याला या गोष्टीचें विवेचन करतां येईल विवेचन करण्याची शक्ति त्याच्या अंगामध्यें येईल त्यावेळीं हा प्रश्न निघण्यासारखा आहे. पण आतां आमच्याकडे अशी अवस्था झाली आहे कीं आपण वरचा विचार सोडून या अव्यक्त सरकाराचा विचार सोडून या व्यक्त सरकारच्या मर्यादेंत या. तर ही व्यवस्था हा राज्य-कारभार करणारे लोक विलायतेहून कांहीं एक प्रकारच्या नियमानें व कायद्यानें नेमले जातात आणि त्यांचें धोरण कोणत्या प्रकारचे असावें याबद्दल त्या त्या कायद्याच्या मर्यादेंत नियम केलेले असतात. हे नियम चांगले असतील किंवा वाईट असतील. चांगले असतील मोठे अगदीं सुयंत्रीत असतील, व्यवस्थित असतील नाहीं–असें मी म्हणत नाहीं. पण लोकांच्या हातची व्यवस्था कितीही चांगली असली तरी ज्याला ही व्यवस्था करण्याचा अधिकार पाहिजे असतो त्याला नेहमीं हें पसंत असतें असें नाहीं. स्वराज्याचें हें तत्व आहे. तुह्माला आपला कलेक्टर निवडण्याचे अधिकार मिळाले तर तो कलेक्टर हल्लींच्या कलेक्टरापेक्षां कांहीं अधिकच काम करील असें सांगतां येत नाहीं. नाहीं करणार कदाचित्. वाईटहि करील. मला कबूल आहे. पण यांच्या आणि त्यांच्यामध्यें भेद असा होतो कीं हा आम्हीं निवडलेला असतो आमचा मनुष्य असतो आम्हीं ज्या दिशेनें संतुष्ट राहूं इकडे तो पहात असतो. व जो दुसरा असतो त्याला

असें वाटतें कीं आमच्या बुद्धीला जें चांगलें तें इतरांना चांगलें वाटलेंच पाहिजे. लोकांचें काय ऐकावयाचें. मी इतका शिकलेला मला इतका पगार मिळतो माझ्याठायीं इतकी कर्तबगारी आहे मी जें करीन तें लोकांचें अकल्याण काय म्हणून करीन. उत्तर एवढेंच कीं अशी घमेंड आहे म्हणून. ( हंशा ) एक मार्ग त्याला कांहीं नियम नाहीं.

ज्याच्या पोटाला चिमटा बसतो त्याला त्याचा अनुभव नाहीं एवढेंच त्याला कारण दुसरें कांहीं कारण नाहीं, तेव्हां आपल्याकडे ज्या ज्या कांहीं तक्रारी उपस्थित झालेल्या आहेत याचें सूक्ष्मरीतीनें विवेचन कराल तर हल्लींची जी पद्धती आहे ती पद्धती आम्हाला नको आहे, राजा नको आहे असें नाहीं. इंग्रजसरकार नको आहे असें नाहीं. बादशहा नको आहे असें नाहीं. ज्या पद्धतीमुळें ही राज्यव्यवस्था चाललेली आहे तींत एक प्रकारचा विशिष्ट फरक आम्हाला पाहिजे आहे. आणि तो फरक केला असतांना इंग्रजराज्याला कांहीं धोका येईल असें त्यांत मला तरी कांहीं दिसत नाहीं. मग कांहीं लोकांना आणखी ज्यांचा चष्मा आमच्याहून निराळा त्यांना दिसत असेल असें मानण्याला जागा आहे. कारण ते तसें बोलतात, ( टाळ्या ) तेव्हां अशा तऱ्हेनें जें इंग्रज सरकारचें राज्य चाललेलें आहे त्या राज्यपद्धतींत कोणता फरक केला पाहिजे या गोष्टीकडे आतां पुष्कळ लोकांचीं मनें लागलीं आहेत. आह्मी ज्या किरकोळ मागण्या मागतों कीं अमूक एक घोडेगांवचें ( दारूचें ) दुकान उठवा त्यांनीं सांगावें उठवूं नये म्हणून. झालें. मिठावरचा कर कमी करा ( असें ह्मटलें तर ) ते म्हणतात कीं मिठावर जें जकातीचें उत्पन्न येतें ते—किती पैसे येतात इकडे आमचें लक्ष असतें. हा ( कर ) कमी केला तर तिकडे कसें करावें पण जो व्यवस्था करणारा असतो त्याला ह्या गोष्टी करावयाच्या असतात. माझ्या घरच्या व्यवस्थेचा अधिकार जेव्हां मी मागतों तेव्हां असें म्हणत नाहीं कीं तुमची जी प्राप्ती असेल ती मला द्या आणि खर्च करूं नका. खर्च आम्हांलाच करावयाचा पैसे ही गोळा करावयाचे ही जी एक प्रकारची संयुक्त—जबाबदारी आहे ती आह्मांला पाहिजे आहे. मग आह्माला काय करावयाचें तें पाहूं. हल्लीं असा तंटा आहे. दुसरे जे ब्यूराक्रसीचे लोक येतात अधिकारी वर्गाचे लोक येतात ते म्हणतात आमच्या मर्जीप्रमाणें करा आह्मी ह्मणतों आमच्या मर्जीप्रमाणें करा ह्मणजे सर्व दुःखांचें निरसन होईल. आपल्याला माहीत आहे कीं कित्येक वेळेला बापाजवळ एखादा मुलगा हट्ट धरून बसतो कीं मला २५ रुपयाची टोपी पाहिजे तो

जर बापाच्या ठिकाणीं असता तर त्यानें टोपीला २५ रुपये दिले असते कीं नाहीं याची शंकाच आहे. बाप नाहीं म्हणतो पण त्याला त्यावेळीं वाईट वाटतें. आणि हें वाईट वाटतें तें कां वाईट वाटतें तर त्याला तें कळत नसतें. त्याच्या हातांत व्यवस्था नसते म्हणून. तर अशा प्रकारची राज्यव्यवस्था अमलांत येणें हें हिंदुस्थानाला श्रेयस्कर आहे ही गोष्ट आज आम्हाला पाहिजे आहे. ही एक मिळाली असतां बाकीच्या गोष्टी आपोआप ताब्यांत येतात. आम्ही ज्या हजारों गोष्टी मागतों त्या सर्वांचें मूळ हें एक आहे. ही किल्ली आपल्या हातांत सांपडली म्हणजे एकच नव्हे तर १०१५ दरवाजे आम्हाला एकदम उघडतां येतील. अशा तऱ्हेचा हा प्रश्न आहे. या प्रश्नाकडे सर्वांचें लक्ष लागावें म्हणून ही होमरूल लीग परवां येथें स्थापन केली आहे.

वाईट वाटेल कोणाला. नाहीं असें म्हणत नाहीं. प्रत्येकाला वाईट वाटतें. पूर्वी येथें सांगितलें कीं, मुलगा अज्ञानी असला म्हणजे बाप मरतांना पंच नेमतो. तो पंच नेमला म्हणजे तो पंच सगळ्या इस्टेटीची देखरेख करीत असतो. त्यांत कांहीं फायदाहि होत असतो नाहीं असें नाहीं. मग हा मुलगा थोडासा मोठा होऊं लागला म्हणजे त्याला दिसतें कीं ह्याच्यामध्यें कांहीं गैरशिस्त आहे. मला व्यवस्था करण्याचा हक्क संपादन करावयाला पाहिजे. म्हणजे मी यापेक्षां बरी व्यवस्था ठेवीन त्याला भरंवसा असतो. तशी तो ठेवतोच असें नाहीं. कदाचित् उधळा असला तर बापाचे पैसे उडवून टाकतो. पण असें त्याला वाटूं लागतें. आणखी या दोघामध्यें विरोध येऊं नये म्हणून कायद्यानें अशी मर्यादा करण्यांत येतें कीं २१ वर्षें झालीं म्हणजे ट्रस्टीनें आपली देखरेख पुरी करून ती मुलाच्या ताब्यांत दिली जावी. ही जी व्यवहारांतील गोष्ट तीही राष्ट्राला लागू आहे राष्ट्रांतील लोक सुशिक्षित झाले त्यांना आपले व्यवहार कसे करावे हे कळूं लागले म्हणजे ह्यांच्याकरितां म्हणून जे व्यवहार इतर लोक करीत असतात ते आपल्या हातांत यावे अशी इच्छा होणें अगदीं स्वाभाविक आहे. पण या इतिहासामध्यें किंवा राजकारणामध्यें मौज अशी आहे कीं हा जो २१ वर्षांचा कायदा आहे तो राजकारणांत नाहीं. शंभर वर्षें तुम्ही एखाद्या राष्ट्राला शिक्षण दिलें आतां त्याचा कारभार त्याच्या हातामध्यें द्या असें सांगणारा कायदा कोणत्याहि प्रकारें यदाकदाचित् कल्पिला तरी त्याची अम्मलबजावणी होणें कांहीं शक्य नाहीं ही अम्मलबजावणी करून घेणें म्हणजे लोकांनींच करून घेतली पाहिजे. त्यांचा हक्क आहे. तेव्हां अशी कांहीं व्यवस्था आपल्याकडे

पाहिजे. पूर्वी अशी कांहीं थोडीशी व्यवस्था होती. तशी व्यवस्था हल्लीं नाहीं. आणखी ह्या सर्व आपल्या मागण्यांचे, आपल्याला जीं दुःखें होतात आपल्याला ज्या कांहीं उणिवा आहेत राज्यकारभारांत आपल्याला ज्या कांहीं गैरसोई नजरेस येतात, त्या सर्वांचें मूळ यांमध्यें आहे. आणि अशा तऱ्हेनें त्या मूळाची चौकशी करून त्याच्यावर जो उपाय योजिलेला आहे त्याला होमरूल असें म्हणतात. त्याचें नांव स्वराज्य. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्या संबंधीची जी व्यवस्था ती आपल्या हातांत असावी, अशी जी मागणी ती स्वराज्याची मागणी. पुष्कळांचे सुद्धां आतां याच्या विरुद्ध आक्षेप आहेत. मी नुसती व्याख्या सांगितली ती स्पष्ट करण्याकरितां सांगितली. दुसऱ्या बाजूचे लोक असतात ते नेहमीं त्याचा विपर्यास करीत असतात. हें मी आतां जें सांगितलें तें तर्कशास्त्राच्या विचारसरणींत जर कांहीं चूक नसेल तर ह्याच्या पैकीं कांहींसा विपर्यास केल्याशिवाय चूक कशी उत्पन्न होणार. तेव्हां ज्यांना चूक दाखवावयाची असते ते लोक ह्याच्यापैकीं कांहीं वाक्यांचा विपर्यास करून हें अमूक आहे हें तमूक आहे असें करून त्याला नांवें ठेवीत असतात. तेव्हां ज्या गोष्टी आम्ही कधीं मागतही नाहीं. त्या आमच्यावर लादणें आमची निंदा करणें आमचा एक प्रकारें लोकांमध्यें उपहास करणें हें कांहीं शहाण्या पुरुषाचें कर्तव्य नव्हे. यापेक्षां मी जास्त काय सांगूं. ( टाळ्या ) तेव्हां तुमच्या पैकीं असा गैरसमज कोणाचा असेल तर तो काढून टाका. निदान एवढें पक्कें लक्षांत ठेवा कीं मीं जें सांगतों तें सुसंगत आहे. हें तर्कशास्त्राला अनुरूप आहे. हें इतिहासाला धरून आहे. मी जो राजा म्हणजे जो अव्यक्त राजा किंवा सरकार सांगितलें याबद्दल कोणत्याही प्रकारचा गुन्हा होत नाहीं. मध्यें देवता असतात. कित्येक वेळेला परमेश्वर रागावत नाहीं ह्या देवता क्रुद्ध होत असतात. मधल्या मधेंच. त्यांची व्यवस्था लावावी लागते. तेव्हां असा जो कांहीं गैरसमज झाला असेल तर तो काढावा. एवढ्याकरितां मी हें सांगितलें.

आतां त्याचें स्वरूप मी आपल्याला सांगतों. आणि त्याच्याही पूर्वी आम्ही अशा प्रकारच्या राज्यकारभाला योग्य आहों कीं नाहीं याहि प्रश्नाचा थोडाबहुत विचार करूं. मघाशीं मी आपल्याला पंच आणि त्यांच्या हाताखालच्या बॉर्डचें उदाहरण दिलें. तेथें बहुतकरून असें होत असतें कीं ज्यांना आणखी दुसऱ्याच्या हातामध्यें व्यवस्था जाऊं

नये असें वाटतें ते, मुलगा जसा जसा मोठा होईल तसे तसे रिपोर्ट होतात कीं त्याचें आतां डोकें फिरावयाला लागलें आहे. दुसरा म्हणतो वेड कांहीं लागलें नाहीं. परंतु अर्धवट वेडा दिसतो. ह्याचें कारण ह्याच्यामध्यें दोन वर्षें व्यवस्था अधीक रहावी म्हणून तिसरा सांगतो तुम्ही त्याच्या हातामध्यें अधिकार द्याल खरा परंतु त्याला वाईट संवयी आहेत हें माहीत आहेत काय ? ह्यांनीं त्याच्याबद्दलच्या १०१५ गोष्टी सांगाव्या. इतकें करून करावयाचें काय ? मग तो कोर्टांत जातो तंटा आणि मग तो वेडा आहे म्हणून ठरवून घेतात. तशा प्रकारच्या हल्लीं कांहीं आमच्याकडे गोष्टी होऊं लागल्या आहेत. लोकांच्या हातांत अधिकार देणें हें राज्यकारभाराचें उत्कृष्ट तत्व आहे. याबद्दल कोणी वाद करीत नाहीं कारण जे येथें अधिकारी आहेत त्यांच्या देशांत तोच प्रकार चालू आहे. तेथें गेलें असतांनां त्यांनां तेंच तत्व प्रतिपादन करावें लागतें. तेव्हां इतिहासाचें हें तत्व वाईट आहे असें कोणी सांगत नाहीं. मग वाईट काय आहे. हिंदी लोक स्वराज्याला आज पात्र झाले नाहींत (हंशा) असें स्पष्ट सांगतात. आणि आमच्यापैकीं कांहीं अशी मंडळी आहेत कीं, पंचतंत्रामध्यें ' त्रयाणां धूर्ताणां ' गोष्ट आहे त्यासारखी आहेत ती गोष्ट अशी. एक खेडेगांवचा मनुष्य एक मेंढरूं डोक्यावर घेऊन आला होता. एक धूर्त त्याला म्हणाला तुझ्या डोक्यावर शेळी आहे. दुसरा म्हणाला तुझ्या डोक्यावर कुत्रा आहे तिसऱ्यानें तिसरेंच सांगितलें त्यानें मेंढरूं टाकून दिलें धूर्तांनीं मेंढरूं नेलें. तशासारखी आमची स्थिति आहे. ही मनुष्य स्वभावाची गोष्ट आहे तशीच आमच्यांत कांहीं मंडळी आहेत. कां आम्ही पात्र नाहीं ? कारण आमच्यांत पात्रता आणली गेली नाहीं. आम्ही केलेले नाहीं. आमच्या आईबापांनीं केलेलें नाहीं. आम्हांलाही असे अधिकार मिळाले नाहींत. पण सरकारानें तुम्हाला काऊन्सिलांतून कांहीं अधिकार दिले आहेत. सिंह, चौबळ काऊन्सिलमध्यें आहेत. दुसऱ्या ठिकाणच्या एक्झीक्युटिव् काऊन्सिलमध्येंहि निवडलेले लोक आहेत. हे लोक जेव्हां नेमणुकीकरितां निवडले गेले तेव्हां कोणी असें कधीं आहे लिहिलें काय कीं आम्ही पात्र नाहीं, आम्हाला जागा देऊं नका. कोणी सांगितलें नाहीं. (टाळ्या) तेव्हां आमच्या सभेमध्यें येऊन सांगण्यांत काय फायदा. ब्यूराक्रसी जेव्हां प्रत्यक्ष तुम्हाला एखादा मोठा अधिकार देईल त्या वेळेला उभें राहून ज्या वेळेला ही कोणी मंडळी म्हणूं लागतील कीं आम्हाला तें नको आम्ही त्याला पात्र नाहीं. आमच्या घरचें श्राद्ध ब्राह्मणानींच येऊन

केलें पाहिजे आम्हाला तें करतां येत नाहीं असें जेव्हां ह्मणूं लागतील त्या वेळेला हे खरोखर बोलतात असें मी समजेन. अमक्याला आवडणार नाहीं ह्मणून अशा गोष्टी सांगणें आणि अशा करतां अशा प्रकारच्या सबबी पुढें आणतात. तीं मनुष्यें एक प्रकारें आपल्या दुर्बल स्वभावाचें प्रदर्शन करतात असें मी समजतों. ( टाळ्या ) आह्मी पात्र कां नाहीं, आह्मांला नाक नाहीं ? डोळे नाहींत ? कान नाहींत ? बुद्धी नाहीं ? लिहितां येत नाहीं ? ग्रंथ वाचलेले नाहींत ? घोड्यावर बसतां येत नाहीं ? कां नाहीं आह्मी पात्र शेक्सपीअरच्या एका नाटकांत एका ज्यूनें विचारलेल्या प्रश्नासारखें मीं आपल्याला विचारतों. नाहीं काय आम्हांला ? तुह्मी काम केलें नाहीं. दिलेंच नाहीं. तर केव्हां करणार आह्मीं ? ( टाळ्या ) देऊन, केलें नाहीं अशी कधीं गोष्ट झाली होती काय ? तेव्हां कोणी सांगितलें नाहीं कीं आह्मीं नालायक आहोंत. आम्हांला नेमूं नका. त्यांना तुह्मीं नेमतां यांच्याकडून काम करून घेतां व मग पाठीमागून He has done his duty & so on असें सरकारी ठरावांतहि प्रसिद्ध होतें. उलट याही पेक्षां असें विचारावयाचें कीं विलायतेहून करकरीत २१ वर्षांचा मनुष्य तुह्मी आणतां. त्याला काय करतां येतें. त्याला कोठें अनुभव असतो. तो एकदम येतो तो येथें assistant collector होतो व ६० वर्षांचा मामलेदार असला तरी त्याच्यावर हाच २१ वर्षांचा कलेक्टर कोठें ( टाळ्या ) ६० वर्षांचा अनुभव फुकट ? २१ वर्षांचा मनुष्य येतो तो तुह्माला सांगावयाला लागतो या ६० वर्षांच्या मामलेदाराला बहुतकरून तो आपल्या पुढें उभा करतो. बसावयाला खुर्ची ही देत नाहीं. आणि हा बिचारा १५०।२००।४०० रुपये मिळावयाचे असतात म्हणून त्याच्यापुढें हात जोडून उभा असतो. ( टाळ्या ) मग या साहेबाला अनुभव मिळावयाचा कसा, हा पात्र व्हावयाचा कसा आणि हें गाडें चालावयाचें कसें याचा कोणी विचार केला आहे कां ? हिंदुस्थानांतील लोक स्वराज्याला पात्र नाहींत त्यांच्या हातून आपल्या राज्याचा बंदोबस्त नीट ठेवतां येणार नाहीं अशी जर हीच गोष्ट खरी असती तर या देशामध्यें प्राचीनकाळीं हिंदु व मुसलमान यांनीं कधींही राज्यें केलीं नसतीं. या देशांत पूर्वी आपलीं राज्यें होती. व्यवस्था लावणारे पुरुष होते. ह्याचा पुरावा एवढाच द्यावयाचा कीं इंग्रज सरकार या देशांत येण्यापूर्वी कांहीं तरी व्यवस्था होती सर्वत्र अंदाधुंदीं नव्हती. एक मनुष्य दुसऱ्याला कांहीं मारीत नव्हता. अशी जर व्यवस्था होती तर ह्याला पात्र नाहीं असें कसें ह्मणावयाचें ? हल्लींच्या काळीं शास्त्राची प्रगति झालेली आहे माहिती वाढलेली आहे. अनुभवाचा एके ठिकाणीं संग्रह झालेला आहे.

५५३८

तेव्हां पूर्वीच्या पेक्षां अधिक मोकळीक आह्माला पाहिजे आहे. आणि आह्मी अधिक पात्र व्हावयाला पाहिजे. उलट ते न होऊन आह्मी पात्र नाहीं पूर्वी काय असेल तें असो—हें म्हणणें सर्वस्वी चुकीचें आहे. द्यावयाचें नाहीं म्हणा या पेक्षां ( टाळ्या ) पात्र नाहीं हे शब्द लावूं नका असें माझें सांगणें आहे. निदान खरें तरी हें द्यावयाचें नाहीं हें आह्माला कळेल. आह्माला तें मिळेल. पण आह्माला कां मिळत नाहीं तें? पर्यायानें सांगावयाचें कीं आह्मीं पात्र नाहीं. आह्मीं येथें आलों आहोंत ते तुह्माला शिकवायला आलों आहोंत. हें कबूल आहे. पण किती दिवस शिकविणार? ( हशा ) १ पिढी, २ पिढ्या का ३ पिढ्या! कांहीं मर्यादा घाला. तुम्ही आह्मांला शिकवायाला आलां ज्यावेळीं शिक्षक घरामध्यें मुलांकरितां आह्मीं नेमतों त्यावेळीं किती दिवसांत शिकविशील १० वर्षांत, २० वर्षांत का २५ वर्षांत असा प्रश्न त्याला विचारतो. दोन महिन्यांत चार महिन्यांत पण जर आमच्या अदमासाबाहेर सांगितलें कीं, या मुलाचा जितका अभ्यास सहा महिन्यांत व्हावा तो वर्षांत होईल असें सांगितलें तर त्याला सांगतो तूं कुचकामाचा आहेस, जा. आह्मी दुसरा शिक्षक नेमूं. ( टाळ्या ) तेव्हां अशा तऱ्हेनें लोकांवर-सर्व लोकांवर ज्या लोकांचें शिक्षण ह्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांत आहे, ज्यांना सुधारणें हें ज्या अधिकाऱ्यांचें कर्तव्य आहे तें कर्तव्य करण्याचें एका बाजूला राहिलें. प्रयत्न करित असतात दुसऱ्या बाजूला. सांगावयाचें कीं आम्ही कितीहि प्रयत्न केले तरी हे लोक ह्या कामांला तयार होणें अशक्य आहे. अशा तऱ्हेच्या सबबी अव्यक्त सरकारापुढें मांडावयाच्या म्हणजे एक प्रकारें हा आपला स्वार्थाचा धंदा आहे असें मी समजतों यांत कांहीं तरी स्वार्थ असला पाहिजे असें जर कोणी अनुमान केलें तर तें चुकीचें व्हावयाचें नाहीं. कां म्हणून असें? तुमच्यासारखीं माणसें, तुमच्या इतकीं प्रबुद्ध तुम्ही त्यांना कामावर घेतां, त्यांच्याकडून काम करवून घेतां, सक्ति कमी करतां असें नाहीं. खालसा मुलखामधें काय चाललें आहे? व्यवस्था कांहीं अडली नाहीं. ह्मैसूरमध्यें काय अडली आहे? कोण कामें करीत आहेत? ह्मैसूरचा राजा हिंदु, प्रधान हिंदु, प्रजा हिंदु, खालचे अमलदार हिंदु, ह्मैसूर एवढें राज्य चालवितें तर ह्मैसूरच्या पलीकडील दोन जिल्ह्यांतील लोकांना म्हणतात असें चालवितां यावयाचें नाहीं ( हशा, टाळ्या ) ह्मैसूरच्या मुलुखांत सहा जिल्हे असतात तेव्हां सहा पात्र आणि आठ पात्र नाहीं असं म्हणण्यासारखें आहे. पात्रता निःसंशय आमच्यामध्यें आहे ( टाळ्या ) मग कांहीं कारणामुळें तुम्ही तें कबूल करा अगर नका करूं. बरें पात्रता आमच्यामध्यें आहे असें

मानावयाला प्रमाण काय आहे ? नेटिव्ह संस्थान मीं दाखविलें. दुसरें असें सांगतों. आपण एका बाजूला दहा वर्षें रहा आणि चालतें कीं नाहीं हें पहा. (टाळ्या, हशा.) नाहीं चाललें तर दहा वर्षांनीं तुम्हीं आपल्या ताब्यांत घ्या. ( टाळ्या ) मोकळेच आहां तुम्ही. स्वराज्य नाहीं, स्वराज्य नाहीं म्हणजे काय ? आम्ही काय मागतों ? इंग्रज सरकारला हांकलून द्या असें म्हणतों ? पण मी असें विचारतों कीं, बादशहाला काय सिव्हिल सर्वंटानें कारभार चालविला काय आणखी आमच्या बेळवी साहेबांनीं चालविला काय ? (टाळ्या) बादशहाचें कांहीं नुकसान आहे का याच्यांत ? तें राज्य कायमच आहे तो बादशहा कायमच आहे. फरक काय होणार कीं, त्याच्यापाशीं एक गोरा नोकर होता तो काळा होणार (टाळ्या)मग हा विरोध कोणाकडून येतो. तर अधिकारारूढ जे लोक झाले आहेत, त्यांच्या कडून हा विरोध होत असतो. हा बादशहाकडून विरोध होत नाहीं यांत कांहीं बादशहाच्या दृष्टीनें अराजकत्व आहे राजनिष्ठा नाहीं असें होत नाहीं, राजद्रोह होत नाहीं. राजद्रोह म्हणजे काय राजाचा द्रोह. राजा म्हणजे काय पोलीस शिपाई ? ( हशा ) मघांशीं मी सांगितलें कीं हा भेद पहिल्यानें केला पाहिजे मग उद्यां तुम्ही म्हणाल कीं, पोलीसच्या शिपायाला काढा तर झाला का राजद्रोह ? पोलीस शिपायांची तशी समजूत आहे. ( हशा ) तसेंच जरा वर चढा म्हणजे आपल्याला कळून येईल कीं जी कांहीं आपण मागणी करीत आहों ती बरोबर आहे, योग्य आहे, न्याय्य आहे, मनुष्य स्वभावाला अनुसरून आहे, इतर राष्ट्रांनीं तेंच केलें आहे फक्त आमच्याकडे मात्र झालें नाहीं स्वराज्य. स्वराज्य स्वराज्य म्हणजे काय ? तुम्हांला इंग्रजी राज्य नको असें नाहीं. मुळांत चूक आहे. कांहीं तरी कोणाचा तरी त्याच्यामधें हेतु आहे. तुम्हांला थोपविण्यांत ज्यांचें हित आहे अशीं माणसें ही कोटी पुढें आणीत असतात याला कांहीं भीक घालूं नका. तुम्हांला जर वाटत असेल कीं तुम्ही इतर माणसांसारखीं माणसें आहांत तर विलायतेंत गेलें म्हणजे त्यांच्या बुद्धीची, त्यांची परीक्षा तेथें होते. त्यांत आम्ही वर येतों. मग दुसरें काय निघालें ! बुद्धी चांगली असेल तुमची पण तुमच्या अंगांत शील, धैर्यादि गुण, त्यांचा स्वभाव तुमच्यांत नाहीं. स्वभाव नाहीं ही गोष्ट मला घटकाभर कबूल आहे. पण येणार नाहीं असें होत नाहीं (हशा) ज्यांचा जन्म सेवा करण्यांत गेला त्यांचा स्वभाव तरी असा कसा बनणार ? असें जर सांगितलें कीं ज्यानें कारकुनीचें काम २५ वर्षें केलें, कांहीं हुकूम साहेबानें द्यावे यानें ते लखोट्यावर लिहावे, त्यावर साहेबाची सही घेऊन धाठवावे तेव्हां त्याला २५।४० वर्षांचीं सवय झाली तरी पहिल्या पहिल्यानें काम कर-

ण्याला अडचण पडेल नाहीं असें नाहीं पण अशीं माणसें ज्या पिढींत आहेत ती गेली असतां पुढच्या पिढींत तयार होणार नाहीं असें मात्र सांगतां येणार नाहीं. तेव्हां माझ्या समजुतीनें आह्मी स्वराज्याला पात्र आहोंत. आतां आह्मी काय मिळवूं इच्छितों आणि काय आपण मागावें हे मी आपल्याला थोडक्यांत सांगणार आहें व माझें भाषण पुरें करणार आहे हिंदुस्थानचा राज्यकारभार कसा आहे हें आपल्याला माहीत आहे. पण सांगावयाची गोष्ट अशी कीं ती विशिष्ट कायद्याप्रमाणें होत असते. तिचे नियम ठरलेले आहेत. स्टेट सेक्रेटरीचे अधिकार काय गव्हर्नर जनरलाचे अधिकार काय त्यांत पद्धतीचे तीन मोठे भाग आहेत विलायतेंत स्टेट सेक्रेटरी साहेब आहेत. हिंदुस्थानांत दिल्लीला गव्हर्नर जनरल आहे. याखालीं इलाख्यापर्यंत एक गव्हर्नर आहे. ह्याच्या खालचे तूर्त सोडून देऊं. पण मोठी व्यवस्था ह्मणजे ही तीन प्रकारची आहे ह्या रीतीची. आतां पुढें प्रत्येकीं विचार करावयाला लागलों तर स्टेट सेक्रेटरी नेमतो कोण ? आह्मी नाहीं. ही जी रचना केली आहे ती कंपनी सरकारच्या धोरणावर केली आहे. ईस्ट इंडिया कंपनीकडे जेव्हां या देशांत राज्य होतें तेव्हां व्यापारी तत्वावर सर्व व्यवहार चालला होता. कंपनीच्या भागीदारांना पुष्कळसा नफा कसा मिळेल इकडे सगळें लक्ष असे आणि कंपनीचे जे डायरेक्टर होते ते हल्लींच्या स्टेट सेक्रेटरीच्या जागीं होते. सगळें राज्य चालविण्याचा हा एक मक्ता दिलेला होता ह्मणांना. पेशवाईंत मक्त्याच्या मामलती होत्या. ईस्ट इंडिया कंपनीकडे जणू हा सरकारच्या त्या वेळेच्या कायद्याप्रमाणें हिंदुस्थानचा राज्यकारभार हा एक त्यांचा व्यापार होता. त्यांतून जितका फायदा मिळेल तितका घ्यावा. कंपनीचे डायरेक्टर विलायतेंत असावयाचे. त्यांचें लक्ष असावयाचें कीं डायरेक्टरला ह्मणजे भागीदारांना नफा द्यावा लागतो. इकडे गव्हर्नर जनरलाला पत्र यावयाचें कीं आह्मांला यंदाच्या सालीं इतका नफा दिलाच पाहिजे. तसा तो उत्पन्न करून आमच्याकडे पाठवा. ही राज्यव्यवस्था. लोकांचें त्याचेमधें हित नाहीं. गवळी आणि त्याच्या गाई. गाई दूध देत नाहींत तर मग तो सांगतो कीं पाणी घालून भरून आण. तसा हिंदुस्थानचा व्यवहार चालला होता. हा राज्यकारभार कांहीं चांगल्या प्रकारचा नाहीं. असें पुढें वादविवादाअंतीं दिसून आलें. आणि राणी सरकारांनीं व्हिक्टोरिया राणी सरकारांनीं जेव्हां आपल्या ताब्यांत घेतला पार्लमेंटनी आपल्या ताब्यांत घेतला ह्मणा त्या वेळेला ही व्यापाराची पद्धती त्यांना पसंत पडली नाहीं, त्यांनीं आपल्या हातामध्यें घेतला

हा एक भाग झाला. आपल्या हातांत घेतेवेळेला व्यापारी म्हणून जें कांहीं धोरण राहिलें होतें तेथें विलायतेमध्यें डायरेक्टर होते येथें त्याचे नोकर असत त्या धोरणाचें; अनुकरण करून ही राज्यपद्धति बसविलेली आहे. डायरेक्टराच्या ऐवजीं स्टेट सेक्रेटरी आला आहे. त्यांचा जो गव्हर्नर होता त्याच्या ठिकाणीं गव्हर्नर जनरल. म्हणजे केलें काय ? व्यवहार राजानें आपल्या ताब्यांत घेतला पार्लमेंटनें आपल्या ताब्यांत घेतला पण नोकर लोकांची जी प्रणाली होती ती तशीच तेथें कायम राहिली आहे. ही गोष्ट १८५८ सालीं बंडानंतर झाली. तेव्हां पासून आतां पर्यंत त्या कंपनीच्या धोरणावर रचलेल्या नियमाप्रमाणें व्यवस्थेप्रमाणें हिंदुस्थानचा कारभार चाललेला आहे. जर राजाकडे वास्तविक जावें राजा होता तेव्हां हें कंपनीचें स्वरूप जावें. तो राजा त्याची आम्ही प्रजा. प्रजेच्या कल्याणाकारितां राज्य करणें हा त्याचा धर्म. आणि त्या धर्माप्रमाणें जे नियम असतील—कायदेशीर—त्या प्रकारची व्यवस्था झाली पाहिजे. पण ही व्यवस्था अशी झाली कीं डायरेक्टर गेला त्याच्या ठिकाणीं स्टेट सेक्रेटरी आला. हिंदुस्थानांत किती पैसा खर्च करावयाचा कोणते कर बसवावयाचे हे ठरवावयाचे कोणी. तर स्टेट सेक्रेटरीनें. गव्हर्नर जनरलाला असे अधिकार ठेविले नाहीं. हा मुख्य अधिकारी. ह्याच्या हाताखालचे गव्हर्नर हा नोकर. आणि त्याच्या हाताखालीं दुसरे नोकर. आणि एकंदर सर्व राज्यकारभार या स्टेट सेक्रेटरीच्या संमतीनें ह्याच्या विचारानें ह्याच्या सल्यानें चालला पाहिजे. असें हल्लींचें धोरण आहे. पुढें काय झालें.—हळू हळू व्यापारीच धोरण हें जरी राणीसरकाराकडे राज्यकारभार गेला त्यांनीं मोठा जाहीरनामा काढला तरी त्या जाहीरनाम्याच्या धोरणावर मात्र राजधोरण नाहीं. राजधोरण व्यापारी कंपनीच्या धोरणावर राज्याची व्यवस्था कंपनीच्या धोरणावर. आणि जाहिरनामा मधल्यामधें फुकट. ( हंशा. टाळ्या ) अशी व्यवस्था झाली. त्या वेळेला आमच्याकडच्या लोकांना कळलें नाहीं. मला वाटतें त्या वेळेला जर हल्लींच्या इतका शिक्षणप्रसार असता तर लोकांनीं तक्रार केली असती कीं खुद्द राणीसरकारनें ज्या अर्थीं आपल्या हातांत राज्याची सूत्रें घेतलीं आहेत त्या अर्थीं राजा व प्रजा ह्यांच्या प्रकारें राज्याची व्यवस्था प्रजेच्या हिताची असावी. कंपनीनें जी ( व्यवस्था ) केली होती ती केवळ आपल्या फायद्याकरितां केली होती. त्या धोरणांत त्या व्यवस्थेंत फरक झाला पाहिजे असें आपल्या लोकांनीं त्या वेळेला सांगितलें असतें.

लोकांनीं ह्या तक्रारी पुष्कळ वर्षें चालविल्या. अगदीं कमीत कमी आपल्याला सांगावयाचें असेल तर ही व्यवस्था पाहिलेले—ह्यांत काय उणीवा आहेत हे दाखविणारे आमच्यांत जे पुरुष हयात आहेत त्यापैकीं ते दादाभाई नौरोजी ( टाळ्या ) हे हयात आहेत. त्यांनीं या कामाकरितां उपक्रम केला. काय उपक्रम केला ? त्यांनीं सांगितलें कीं कंपनीच्या व ह्याच्यांत भेद काय आम्हांला कांहीं नाहीं यांत नियम केले ते सर्व कंपनीच्या धोरणावर. लोकांना कांहीं आहे का त्यांच्यामधें फायदा ? मग ही कायदे काउन्सिलें निघाली. तीं हीं अशीं कीं गव्हर्नर जनरलनें आम्हाला नेमावयाचें. पहिलें कांहीं लोकांना नेमावयाचे नव्हतें. हळूं हळूं म्युनिसिपालिटींत तुमचे कामगार झाले. कायदेकौन्सिलांत झाले तरी अखेरच्या किल्ल्या अझून त्यांच्याच ताब्यांत आहेत. कायदेकौन्सिलांत वादविवाद करावा. वादविवाद करण्याला तुम्हाला पूर्ण मोकळीक आहे. हे पैसे इकडे खर्च करा याबद्दल वादविवाद करा. करावयाचे कीं नाहीं ते आम्ही ठरवूं. तुमच्या तोंडाला तुमच्या मनाला वाटेल तेवढे श्रम द्या आमची कांहीं हरकत नाहीं. रात्रभर जागा आपलीं speeches तयार करा वर्तमानपत्रांत छापण्याऐवजीं मुंबईच्या ग्याझेटांत प्रसिद्ध करूं. एवढाच काय तो फरक. यामध्यें कांहीं मिळालें नाहीं. मिळण्याची आशा दाखविली आहे. महाभारतांत एक श्लोक आहे. त्यांत असें सांगितलें आहे कीं "आशां कालवतीं कुर्यात्" हक्क तुह्माला द्यावयाचे आहेत तुह्मी पात्र व्हाल तेव्हां. आह्माला हिंदुस्थानांत राहण्याची इच्छा नाहीं. तुह्मी तयार झाला ह्मणजे तुमच्या ताब्यांत गाठोडें द्यावयाचें आणि विलायतच्या बोटींतून विलायतला जावयाचें ( टाळ्या ) अशी कालमर्यादा घालावी. दोन वर्षांत देऊं दहा वर्षांत देऊं. पुढें अशी वेळ आली ' कालं विघ्नेन योजयेत् ' दहा वर्षें सांगितली हातीं. हे दिवस गेले ते मोठे खडतर गेले. दहाचे पंधरा करणें भाग पडलें आहे. ' आशां कालां विघ्नेन योजयेत् ' विघ्न आलें तुह्मीच आणलें असेल. आमच्या हांतून नाहीं आलें. आह्मी चांगल्या काळाची वाट पहात होतों. त्याला निमित्त जोडून द्यावें. निमित्त आलें. निमित्त तरी कसें आलें ? निमित्त त्याला कांहीं सांगतां येत नाहीं. कांहीं तरी दुसरेंच कारण दाखवावें ही एकप्रकारची नीति आहे. जेव्हां तुम्हाला द्यावयाचें नसतें तेव्हां कसें बोलतां तेव्हां हाल्लीच्या काळांत नीतिशास्त्रांत राजकीय ग्रंथांत लिहिलें आहे असें नाहीं. जुनी परंपराच चालत आलेली आहे. तेव्हां असें या ब्यूराक्रसीनें चाळवीत ठेवलें आहे—

आम्हांला गेल्या पांच पन्नास वर्षांमध्यें स्टेट् सेक्रेटरी गव्हर्नर जनरल ह्यांनीं सुद्धां असें चाळवीत ठेवलें आहे तरंगत ठेवलें आहे–जराशी तुह्मी गडबड करावयाला लागला पांच मेंबर होते तें आह्मी उद्यां सहा करणार. पांचाचे सहा करून आह्मांला काय फायदा ? उगीच आमच्या पैकीं एखाद्या मनुष्याला चार दिवस फुकट तेथें रखडावयाला लावावयाचें. ( टाळ्या ) या पेक्षां कांहीं फायदा नाहीं त्याच्यांत. सहाला तुम्हीं तक्रार केली आठ करतो. आमचे जे १० आहेत ते बारा करतों पाहिजे तर ( हंशा टाळ्या ) हें उत्तर. अशा तऱ्हेनें याचा कांहीं निकाल लागावयाचा नाहीं. अशी लोकांची खात्री होऊन चुकली आहे. तुह्मांला जे कांहीं हक्क द्यावयाचे असतील ते तोडून द्या आम्हांला. तुमचे अधिकार कितीहि मोठे असोत एका विद्याखात्याचीच व्यवस्था घेतली तर बहुतेक खालचे नोकर आहेत ते आमचेच आहेत. वर एक साहेब असतो तो कशाला ठेवावयाचा कीं त्यांचीं तोंडें त्यांच्या बुद्धीची मर्यादा आकुंचित करण्याकरितां. मग २० वर्षें नोकरी केली तरी साहेबाशिवाय व्हावयाचें नाहीं काम असें हा ह्मणावयाला लागतो बिचारा. अशीं माणसें तयार करावयाचीं. हा हल्लींच्या राज्यपद्धतीचा उघड नसला तरी अंतस्थ हेतू आहे. ह्यांच्यामध्यें दोन भेद दिसून येत आहेत. एथें या पलीकडे एकानें माळ्याला बाग तयार करावयाला सांगितला. ह्मणजे तो कुंड्या पहातो. फारेस्ट डिपार्टमेंटमध्यें मोठीं रानें तयार करावयाची असली ह्मणजे कुंड्या नाहीं लागत बियांची पोतीं आणतात आणि सोडून देतात सर्रास झाडें वाटेल तेवढीं वाढतात. कांहीं लहान होतात कांहीं मोठीं होतात तशा प्रकारची ही व्यवस्था आहे. या व्यवस्थेमुळें आमच्यांतील झाडें वाढत नाहीं. किंबहुना काळजीच असते कीं बागेंतील कुंड्यांत घातलेलीं झाडें गोजिरवाणीं दिसतात हातानें त्याचीं फुलें फळें तोडतां येतात. तशा तऱ्हेचीं हीं गोजिरवाणीं झाडें वाढावीं अशा तऱ्हेचें त्याला शिक्षण दिलें जातें. अशा तऱ्हेनें त्याला वागविलें जातें. राबविलें जातें. आणि मग २५।३० वर्षें गेल्यानंतर हा ह्मणूं लागतो आपण खरोखरच या कामाला पात्र नाहीं. ही पद्धती आह्माला नको आहे. इंग्रज सरकार पाहिजे आहे. या राजछत्राखालीं आह्माला रहावयाचें आहे. पण हा स्टेट सेक्रेटरी ह्मणून जो जांवई उत्पन्न केला आहे. ( टाळ्या ) तो जांवई आह्माला नको ह्याच्या निदान सल्लागारमंडळींत आमचे लोक पाहिजे आहेत आह्मी निवडलेले. ही पहिली सुधारणा झाली पाहिजे. त्याच प्रमाणें हिंदुस्थानचा खर्च कोण करणार पैसा किती गोळा करणार कर किती बसविणार

हें आमच्या मतानें ठरलें पाहिजे. ( टाळ्या ) आह्मी म्हणतों ते कर नसावयाला पाहिजेत. ते म्हणतील खर्च कसा चालेल तें पुढें आम्ही पाहूं. आम्हाला इतकें कळतें की जितके पैसे असतील त्या मानानें खर्च करावा लागतो किंवा जितका खर्च होईल त्या मानानें पैसे वसूल करावे लागतात हें आम्हाला समजतें हें पाहूं आम्ही मग कोंणती तरी व्यवस्था-होमरूलचें दुसरें तत्व असें आहे की हे अधिकार लोकांच्या हातांत पाहिजेत. चांगल्या माणसांच्या अर्थात लोकांनीं निवडून दिलेल्या लोकांच्या हातांत पाहिजेत आतां एवढी लढाई चालली आहे युरोपमध्यें. लढाईवर किती पैसा खर्च करावा लागतो हें बादशाहा कांहीं ठरवीत नाहीं. आस्क्विथ ठरवितात, मग आस्क्विथनीं काम केलें त्याच्यावर तक्रार झालीं तर ती पार्लमेंटपुढें जाते आणि आस्क्विथची चूक झाली तर आस्क्विथला राजीनामा द्यावा लागतो. राजीनामा देण्याची त्याला पाळी आली ह्मणजे तो राजद्रोह झाला ! व्यवस्थेंत फरक आहे. मांडणींत फरक आहे. पद्धतींत फरक आहे. आणि अशा प्रकारचा फरक पद्धतींत आपण मागत आहोंत. राज्य बुडेल, राज्य जाईल, हे विचार मुळीं बाहेरचे आहेत. आमच्या मर्यादेंत आमच्या टप्यांत आमच्या नजरेंत येत नाहींत. आणि हें पण आह्मी इच्छित नाहीं. पुन्हा असें सांगतों की जर राष्ट्राला सुख व्हावयाला पाहिजे—हजारों ज्या आज तक्रारी उपस्थित झालेल्या आहेत, त्या जर काढून टाकावयाच्या असतील तर पहिल्यानें ही राज्यपद्धती बदला. मराठीमध्यें एक ह्मण आहे. " घोडा कशानें अडला, विड्याचीं पानें कशानें सडलीं, भाकरी कशानें जळली ? " त्याला उत्तर एक. न फिरविल्यामुळें. पानें चाळवावयाला पाहिजे होतीं. भाकरी फिरवावयाला पाहिजे होती. घोडा फिरविला असता तर तो अडला नसता. त्याचें मूळ असें आहे की आमच्या जंगलच्या तक्रारी काय अबकारीच्या तक्रारी काय-कुळकर्णी वतनाच्या तक्रारी काय-सत्ता आमच्या ताब्यांत नाहीं ह्मणून. ह्याचें थोडेंसें भाषांतर केलें तर स्वराज्य नाहीं ह्मणून. ( टाळ्या ) स्वराज्य आह्माला असणें हें मूळ आहे त्याच्यांत. मग कांहीं कोणाच्या तंत्रानें नाचावयाला नको. असेंही होईल नाहीं असें मी ह्मणत नाहीं. स्वराज्यामध्यें की आह्माला पैशाची तूट आली असतां तुमच्या हातांत अधिकार आले असतां तुह्मी कर वाढवाल, आपण होऊनच वाढवाल. खर्च कोठून करावयाचा ? पण तो आपण होऊन वाढविलेला असल्यामुळें तो आपल्या मनावर कांहीं जाचावयाचा नाहीं. परक्यांनीं विद्वान लोकांनीं

सांगणें आह्माला असे या दरवाज्यामधून आह्मी चाललों ह्मणजे या दरवाज्यांतून न जातांनां त्या दरवाज्यांतून जा पण तेथें कोणी येऊन उभा राहिला या दरवाज्यांतून जाऊं नको ह्मणायला तर त्याला आह्मी धक्का देऊन बाहेर जाणें आहे. तशीच ही स्वराज्याची गोष्ट आहे. ही ब्यूराक्रसीची नडवणूक आहे. आह्मांला अशी नवडणूक नको आहे. स्वराज्याची मागणी ह्मणजे अशी आहे कीं तींत राजद्रोहाचा संबंध नाहीं. अव्यक्त सरकारचाहि पण संबंध नाहीं ही जी कांहीं घरची व्यवस्था तुमची तुह्मीच करावी आणि असें केलें असतांना काय होईल एक तर मनें तुमची शांत राहतील. तुह्माला काय करावयाचें तें आपल्या हिताकरितां आपण करीत आहोंत अशा बुद्धीनें कराल इतकेंच नव्हे पण खर्चही आपण मूळांत संदिग्ध कमी कराल. मला वाटत नाहीं कीं कोणत्याही नेटीव संस्थानांत कलेक्टराला पंचवीसशें हे रुपये पगार नाहीं. जगामध्यें कलेक्टराचें काम करणाऱ्या मनुष्याला अधिकांत जर अधीक कोठें पगार असेल तर तो हिंदुस्थानामध्यें आहे. ( टाळ्या ) पूर्वीच्या राज्यांत एका कलेक्टरला २५०० रुपये पगार ह्मणजे सरासरी ३०००० ची वर्षाची जहागिरी होते. ती आपण आपल्या स्वराज्यांत ३०००० ची जहागिरी कधीं आणून दिली आहे कां ! ३०००० रुपये ह्मणजे कांहीं थोडे होत नाहींत. कारण आहे त्याला. काय कारण देतात. प्रत्येक गोष्टीला कांहीं तरी कारण असतें हें ध्यानांत ठेवा. ह्याला २५०० रुपये विलायतेला पाठवावे लागतात मुलांकरतां वगैरे. विलायततेल्या थंड हवेंतून उष्ण हवेंत येतात प्रकृती बिघडून घेतात. तुमच्या कल्याणाकरितां. तर मग त्यांना पगार द्यावयाला नको. इतकी मेहनत केली स्वार्थत्याग केला इतके कष्ट सोसले त्यांनीं आणि त्याला पैसे देत नाहीं तुह्मी एकदा सांगितलें ह्मणजे सकृद्दर्शनीं बरोबर वाटतें. पण आतां मुख्य प्रश्न असा आहे कीं तिकडून इकडे येण्याला त्याला कोणी सांगितलें ? ( टाळ्या ) आह्मी कांहीं बोलाविलें नव्हतें. जशी योग्यता असेल तुझी तसें तूं काम करतोस. तुझ्याइतकी योग्यता आमच्यांत असेल पण तें काम आह्मांला कमी पगारांत करतां येईल. मनुष्यें मिळतात. मग इतका कां त्याला एवढा पगार आह्माला जरूर नाहीं शिक्षणाकडे आज पैसे आपल्याला नाहींत असें वाटतें. लोकोपयोगी कामें करण्याकरितां पैसे नाहींत ही सबब पुढें येते ती प्रथम नाहीशी होईल. व्यवहार इतका सुरळीत चालेल. आरंभीं नाहीं सुरळीत चालणार. यदाकदाचित् एक आणा रुपयांत कमी चालेल, तरी

तो ( व्यवहार ) आपल्या लोकांनीं चालविला आहे आणि तो लोकांच्या अनुमतीनें ह्यामुळें जें कांहीं चीज होईल त्याची किंमत अधिक आहे. अशा तऱ्हेनें ह्याच्यामध्यें चांगली व्यवस्था मागावयाची आहे. हल्लीं जो कायदा आहे त्यामध्यें दुरुस्ती करून घ्यावयाची आहे. ती पार्लमेंटकडून दुरुस्त करून घ्यावयाची आहे. दुसऱ्याकडून नाहीं आम्ही मागणार. फ्रान्स देशाला अर्ज करून ही मागणी करून घ्यावयाची नाहीं. allies असले तरी ( त्यांच्याकडे अर्ज करावयाचा नाहीं ) इंग्रज लोकांना इंग्रज पार्लमेंटाला अर्ज करावयाचा त्यांच्यापुढें ही स्थिति मांडावयाची याकरितां जें कांहीं करावयास लागेल तें करावयाचें असा जर उद्योग तुम्ही आतां ५।२५ वर्षें चालविला तर ह्याचें फळ आल्या खेरीज केव्हांही रहावयाचें नाहीं. त्यांतून आतां जी लढाई चालू आहे त्या लढाईमुळें आतां अशी वेळ आली आहे कीं हिंदुस्थानची किंमत हिंदुस्थानचें शौर्य हिंदुस्थानचें धैर्य आणि स्थैर्य ज्या तऱ्हेनें वाढेल असा कांहीं तरी उद्योग करणें प्राप्त आहे. हा उद्योग ते ( आपण ) करीत असतात ही गोष्ट जर सरकारच्या नजरेस आली तर आपली मागणी लवकर सफल होण्याची आशा आहे. याकरितां हा विषय मुद्दाम मी आपल्यापुढें घेतलेला आहे. दुसरीकडेही या विषयाची चर्चा चालू आहे. आम्ही याकरिता जो संघ स्थापिला आहे तो असा आहे कीं या उद्योगाला आजच नव्हे तर पुढें कांहीं दिवसांनीं प्रत्येक ठिकाणीं मला किंवा दुसऱ्या कोणाला विषय मांडण्याचा प्रसंग येईल हा जो विषय आहे हा आपल्या चर्चेमध्यें ठेवून त्याची नित्य चर्चा करा त्याचें नित्य ध्यान करा त्याचा उपयोग काय आहे हें समजून घ्या त्यांत राजनिष्ठपणा किती अराजनिष्ठपणा किती ह्याची नीट मीमांसा करून ठेवा असे आजच्या प्रसंगीं माझें आपल्याला सांगणें आहे. माझें जें कांहीं ह्मणणें आहे तें जरी यापेक्षां पुष्कळ अधिक असलें तरी त्यांतील मथितार्थ काय आहे तो मी थोडक्यांत आपल्याला सांगितला आहे ह्याचा विचार आपल्याकडे सुरू झाला महाराष्ट्रांत सुरू झाला हिंदुस्थानांत सुरू झाला तर केव्हांना केव्हां तरी या उद्योगाला यश येणार आणि ही परमेश्वराच्या हातचीं गोष्ट असली तरी ती अवश्य आहे. आमच्या हातची नाहीं हें मी कबूल करतों. पण कर्माचा परिणाम होणें हें जगांत कांहीं चुकत नाहीं कर्माला फल केव्हांना केव्हां तरी मी ह्मणतों इतक्या लवकर मिळणार नाहीं माझ्या डोळ्यादेखत मिळणार नाहीं कदाचित् मला त्यांपासून फायदा व्हावयाचा नाहीं परंतु

या कर्माचें फळ हें झालेंच पाहिजे. ( टाळ्या ) मग कर्माच्या कायद्याप्रमाणें असूक कर्म केलें त्याच्यापासून दुसरें उत्पन्न होतें. त्याच्यापासून तिसरें उत्पन्न होतें अशी ही परंपरा चालते. वेळ लागेल उशीर लागेल. परंतु आह्मांला मोक्ष हा आमच्या डोळ्यांदेखत व्हावा म्हणून तरी कोठें मागतों. असुक पुरुषाच्या हातून व्हावा अशा बुद्धीनें तरी कोठें मागतों. आतांच आपल्या परिषदेमध्यें ठराव पास झाला माडरेट्स आणि न्याशन्यालिस्ट हे पक्ष नकोत. ह्मणजे कोणालाहि स्वराज्य देणें आह्माला सारखेंच आहे. उद्यां तुमच्या शिपायाला दिले अधिकार तरी हरकत नाहीं. कारण तुह्मी ह्मणाल शिपाई एवढा मोठा अधिकार चालवील कसा. शिपाई केव्हां तरी मरावयाचा आहे. आणि मग पुढें पाहूं. ( टाळ्या ) हक्क आह्माला पाहिजे आहेत. असुक एक प्रकारची सुखकर व्यवस्था आह्माला पाहिजे आहे. आह्माला मिळेल. आमच्या मुलाबाळांना मिळेल उद्योग करणें तो करा. हें आपलें काम आहे अशा बुद्धीनें या उद्योगाला प्रवृत्त व्हा. माझी खात्री आहे कीं, परमेश्वरकृपेनें या उद्योगाचें फल तुमच्या डोळ्यादेखत नाहीं तरी तुमच्या पुढील पिढीला मिळाल्याखेरीज राहणार नाहीं. ( टाळ्या )

# नगर येथील पहिलें व्याख्यान

( नगर, ता. ३१ मे सन १९१६ )

चौकर वकील ह्मणाले कीं:—

सद्गृहस्थ हो, आज आपल्या शहरचा मोठा भाग्याचा दिवस आहे. आज आपल्याला श्रीयुत लो. टिळक ( टाळ्या ) यांचे कडून उपदेशामृत ऐकण्याचा लाभ होणार आहे. तेव्हां त्याविषयीं ज्यास्त आतां कांहीं एक न बोलतां ते ज्या विषयावर बोलतील त्या विषयावर ते जें विवेचन करतील तें आपण शांत अंतःकरणांनीं कांहीं एक गडबड न करतां ऐकावें आणि त्याप्रमाणें वर्तन करण्याचें मनामध्यें आणावें. एवढी आपल्याला विनंती करून मी ( Referring to Tilak ) आपल्याला व्याख्यान सुरू करण्यास विनंती करितों. ( टाळ्या )

लो. बाळ गंगाधर टिळक म्हणाले:—

सद्गृहस्थहो, आपल्याला कांहीं दोन शब्द सांगण्यापूर्वी माझें पहिले काम आपले अत्यंत आभार मानणें हें होय. आपण या ठिकाणीं मला बोलावून माझा जो सन्मान केला मला जें मानपत्र दिलें याबद्दल आपले आभार मानणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे. आपण मला जो मान दिलांत तो ज्या कांहीं हेतूने दिला असेल तो जरी कोणत्याही प्रकारचा असला तरी मला या प्रसंगीं आपल्याला जे दोन शब्द सांगावयाचे आहेत ते माझ्या कार्यासंबंधाचे आहेत. कदाचित् ही गोष्ट आपल्याला विपरीत वाटेल. आपण मला या ठिकाणीं बोलावून आणलें. आणि मीं आपलेंच कार्य तुमच्यापुढें सांगावें हा एक प्रकारचा विरोध आहे. टिळक येथें आले आणि आपल्याच गोष्टी त्यांनीं लोकांना सांगितल्या असें जर तुम्हाला वाटेल तर मला ज्या गोष्टी येथें सांगावयाच्या आहेत त्या माझ्या जितक्या फायद्याच्या आहेत तितक्याच आपल्याही फायद्याच्या असल्यामुळें मला त्या गोष्टी या ठिकाणीं सांगण्याला कांहीं दिकत वाटत नाहीं. आजपर्यंत पुष्कळ प्रकारें आपल्या देशाच्या स्थितीसंबंधानें ठिकठिकाणीं वादविवाद आणि विवेचन झाले आहे. एकंदर लोकांना हितावह काय आहे? पुष्कळ गोष्टी हितावह आहेत. पारलौ-

किक धर्म हितावह आहे. त्याचप्रमाणें नीतिधर्म ही हितावह आहे. पोटापाण्याची सोय होणें हितावह आहे. आपला व्यापार वाढावा प्रजा वाढावी सुबत्ता व्हावी. सुरक्षीतपणानें ती सुबत्ता आपल्या पदरांत पडावी या सर्व गोष्टींची मनुष्यांना अपेक्षा आहे. परंतु इतक्या सगळ्या गोष्टीचें विवेचन थोड्या काळांत मला नेमून दिलेल्या वेळांत होणें शक्य नाहीं. तेव्हां यापैकीं मुख्य गोष्टी ज्या आहेत, ज्या हजारों लोकांच्या विचारानें मुख्य ठरल्या आहेत, ज्याबद्दल हल्लीं चोहोंकडे चर्चा होत आहे अशा विषयासंबंधानें मी आज दोन शब्द आपल्याला सांगणार आहें. हा विषय म्हटला म्हणजे स्वराज्य हा होय ( टाळ्या. ) ज्या कांहीं आपल्या घरच्या गोष्टी आहेत त्या आपल्या घरीं आपण सत्तेनें करतो. मला अमुक गोष्ट कराविशी वाटली जर ती केवळ खासगी असली तर त्याबद्दल कोणास विचारावें लागत नाहीं कोणाची परवानगी घ्यावी लागत नाहीं किंवा दुसऱ्या कोणाचा सल्ला आपल्याला घेण्याची जरूरी नाहीं. सार्वजनिक बाबतींत तशी स्थिति नाहीं. ज्याप्रमाणें स्वतःचे कल्याण त्याचप्रमाणें सर्व लोकांचे कल्याण. लोक चांगल्या रीतीनें नांदण्यास कसे लागतील त्यांना अधिकाधिक सुस्थिति कशी प्राप्त होईल यासंबंधी विचार केला तर आपल्या ध्यानांत असें येईल कीं कोणत्याही गोष्टी घेतल्या तरी त्या आपल्या हातांत सत्ता नसल्यामुळें आडतें. या ठिकाणाहून आगगाडी दुसऱ्या ठिकाणीं न्यावयाची असली तर ह्या गोष्टी आपले ताब्यांतल्या नाहींत. व्यापार काय, अमुक धंद्यांत देशांत उत्तेजन यावें असें मी पुष्कळ बोललों पण ज्या ठिकाणीं हा धंदा चालतो त्या ठिकाणचें ज्ञान संपादन करून आणून त्या लोकांचा व्यापार या देशांत आहे तो कमी करून आपला व्यापार वाढविणें ही कांहीं सर्वस्वी आमच्या ताब्यांतली गोष्ट नाहीं. कोणतीही गोष्ट घेतली तरी अशीच आहे. आपल्याला दारू कांहीं बंद करतां येत नाहीं, आम्हांला नको आमच्या सरकाराला नको अशाही कांहीं गोष्टी आहेत. ज्या आम्हाला नको आमच्या सरकारालाहि नको पण जो कांहीं एकंदर राज्यव्यवस्थेचा ओघ आहे तो असा पडलेला आहे कीं त्यांत फेरफार करणें, यत्किंचित फेरफार करणें आमच्या ताब्यांतली गोष्ट नाहीं. आम्ही पुष्कळ आजपर्यंत गाऱ्हाणीं केलीं व सरकारनीं ऐकलीं. पण सर्व गाऱ्हाण्याचें मूळ काय ? आम्ही म्हणतों त्याप्रमाणें आमची स्थिती सुधारण्याचे आड कोणकोणत्या गोष्टी येतात. आमची अडचण काय, याचा विचार आज ५।५० वर्षें होऊन पुष्कळ शहाण्या लोकांनीं या

गोष्टीचा विचार करून त्याचें एक कारण शोधून काढलें आहे तें हें कीं आमच्या लोकांच्या हातांत सत्ता नाहीं सार्वजनिक बाबतींत पुष्कळ लोकांचे पुष्कळ अभिप्राय आहेत. कोणी म्हणतात तुमचे हातांत सत्ता कां नाहीं. तुह्मी दारू पिऊं नका ह्मणजे झाले. उपदेश गोड दिसतो खरा. पण सर्व लोकांनां बंदी करणें हें काम नुसत्या उपदेशाचें नाहीं. याला कांहीं सत्ता लागत असते ती सत्ता ज्यांचे हातांत नाहीं त्याला तें काम करतां येत नाहीं आणि अशा नुसत्या उपदेशानें काम होण्याजोगें असतें तर राजाची आज्ञांला जरूर पडली नसती. पुष्कळ लोकांचे मनांत ज्या गोष्टी येतात त्या गोष्टींचा अंमल व्हावा त्या गोष्टी अमलांत याव्यात. याकरितां राजव्यवस्था निर्माण झालेली आहे आणि ती राजव्यवस्था आपल्या हातांत नसल्यानें जर तुमच्यापैकीं हजारों लोकांना एकादी गोष्ट इष्ट वाटली आणि ज्यांच्या हातांत राज्यव्यवस्था आहे त्यांना ती गोष्ट इष्ट वाटली नाहीं तर त्या गोष्टी कधींहि अमलांत यावयाच्या नाहींत. मागें मी या ठिकाणीं आलेला होतों. दुष्काळाची व्यवस्था काय ? दुष्काळामध्यें कोष्ट्यांचे अतिशय नुकसान होतें. ही गोष्ट सरकारच्या मनांत ज्या दिवशीं आली त्या दिवशीं त्याचा थोडा बहुत कांहीं बंदोबस्त झाला. आपला व्यापार बुडाला. अडतेगिरीचा धंदा पूर्वी चाले. पूर्वी अडतेगिरी नव्हती असें नाहीं, हल्ली नाहीं असें नाहीं. आडत्यांचा धंदा चालू आहे. फरक काय झाला आहे कीं, त्या काळामधें आमच्या व्यापाराचे जे तुह्मी अडते होतां ते ह्या विलायतच्या धंदेवाल्याचे आडते बनलां आहां. कापूस येथें खरेदी करून विलायतेला पाठवावयाचा आणि त्याचें विलायतेंतलें कापड आलें म्हणजे आडतीनें खरेदी करून आम्हांला विकावयाचें. आडतेचा धंदा कायमच राहिला पण त्यामध्यें झालें काय कीं ज्या अडतीच्या धंद्यामुळें देशाला अधिक फायदा होत होता तो जाऊन या अडतीच्या धंद्यामध्यें जो कांहीं फायदा व्हावयाचा तो विलायतच्या लोकांचा होतो. गोष्ट अशी आहे, मनुष्यें तींच धंदा एकच पण राज्यव्यवस्थेमध्यें फरक पडल्यामुळें कांहीं गोष्टी आपल्याला करतां येत नाहीं. देशाला हितावह होतील अशा तऱ्हेच्या करतां येत नाहींत. असें झालें आहे. पहिल्या पहिल्यांदा आमची समजूत अशी होती कीं बोलून चालून इंग्रज सरकार परकीय आहे; त्यांना परकीय म्हणण्यांत राजद्रोह नाहीं तर परकीय ज्या गोष्टी आहेत त्या सांगणें यांत कांहीं राजद्रोह नाहीं. कोणत्याही प्रकारचा गुन्हा नाहीं. परकीयपणानें होतें काय ! परकीय व आपल्यामध्यें भेद काय होतो

तर परकीयांची दृष्टी परकीय असते. परकीयांचे विचार परकीय असतात. आणि परकीयांची एकंदर वागणूक अशा तऱ्हेची असते कीं ज्यांना तें परकीय आहे त्या लोकांचें कल्याण विशेष करण्याकडे त्यांचे बुद्धीची प्रवृत्ती होत नाहीं आपण असें समजूं कीं या ठिकाणीं अहमदनगरला जे मुसलमान राजे होते मी मुसलमानांना परकीय ह्मणत नाहीं. ते या देशांत येऊन राहिले, येथें धंदे वाढावे अशी त्यांची बुद्धी तरी होती. धर्म निराळा असेल ज्या मनुष्याला हिंदुस्थानांत रहावयाचें त्याचीं मुलेंबाळें हिंदुस्थानांत रहायाला इच्छितात. ते रहातील त्या मुलाबाळांचें, त्या मनुष्याचें आणि इतर हिंदुस्थानांत राहणाऱ्या माणसांचें जेणेंकरून कल्याण होईल अशी ज्यांची इच्छा ते परकीय नाहींत. परकीय ह्मणजे धर्मानें परकीय मी घेत नाहीं. या देशांत राहणाऱ्या लोकांचें जेणेंकरून हित होईल, असें जो करितो तो मनुष्य मग मुसलमान असो इंग्रज असला तरी हरकत नाहीं. परकी नाहीं. परकीयपणा हिताहिताच्या संबंधांत आहे. परकीयपणा गोऱ्या आणि काळ्या कातडींत खचीत नाहीं. परकीयपणा धर्मांत नाहीं. परकीयपणा व्यापार धंद्यांत नाहीं. ज्या देशांत आपण रहावयाचें त्या देशांतील लोकांचे मध्यें आपलीं मुलें बाळें रहावयाचीं, ज्या देशांत आपली पुढली पिढी राहिल, त्यांना चांगले दिवस येतील, त्यांचें कल्याण होईल, त्यांचे हित होईल अशी व्यवस्था जो मनुष्य करूं इच्छितो तो मनुष्य मी परका समजत नाहीं. कदाचित माझ्या बरोबर देवाची प्रार्थना करण्याला तो एक देवळांत येणार नाहीं. कदाचित् माझा त्याचा रोटीबेटीव्यवहार होणार नाहीं. हे सगळे प्रश्न गौण आहेत. पण जो मनुष्य हिंदुस्थान देशाचें कल्याण होण्याला झटत असेल आणि अशी व्यवस्था योजील तर तो मनुष्य परकीय असें मी समजत नाहीं. पहिल्या पहिल्यांदा अशी माझी समजूत होती कीं यांत कांहीं विशेष झालें नाहीं, पेशवाई गेली, मुसलमानी राज्य गेलें, इंग्रजांच्या ताब्यांत आलें. पण राजाचें ह्मणून जें कर्तव्य तें कर्तव्य हे कीं ह्या राष्ट्राचा उदय व्हावा, या राष्ट्राचा फायदा व्हावा, हें राष्ट्र वर चढावें, हें इतर राष्ट्रांच्या बरोबरीला यावें वगैरे ज्या कांहीं गोष्टी त्या सर्व करण्याचें काम राजाचें आहे. जो राजा हें काम करतो तो परकीय नाहीं. जो हें काम करीत नाहीं, केवळ आपल्या फायद्याकडे पाहतो, आपल्या ज्ञातीच्या फायद्याकडे पहातो; आपल्या मुळच्या देशाच्या फायद्याकडे पहातो तो परकीय समजावयाचा. पहिल्यानें हजारों प्रश्न आले. शेतीसंबंधीं सारा पुढें वाढला. जंगल खात्याची व्यवस्था अमुक तऱ्हेची झाली, अबकारी खात्याची

व्यवस्था अमुक प्रकारची झाली या ज्या गोष्टी होत आल्या त्या आम्ही २५।३० वर्षे एक सारख्या सरकारच्या कानापाशीं आरडत आहों. त्या त्या खात्याची व्यवस्था, त्या त्या प्रकारच्या देशाची व्यवस्था, त्या त्या प्रकारच्या व्यापाराची व्यवस्था त्या त्या प्रकारच्या उद्योगधंद्याची व्यवस्थाही कांहीं झालेली नाहीं. ५० वर्षांत हा प्रश्न मुख्य आहे. याचें कारण शोधतां शोधतां आम्ही पहिल्यानदां असें समजत होतों कीं ह्या सरकाराला कळविलें म्हणजे आमच्या सारखें सरकार ताबडतोब करायला लागेल. परकीय सरकार आहे. त्यांना कळत नाहीं. त्याना आमच्या १०।५ प्रमुख लोकांनीं एके ठिकाणीं जमून सांगितलें ह्मणजे त्या लोकांच्या ही गोष्ट लक्षांत येईल तें परकीय असल्यामुळें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. आम्हीं कळविलें म्हणजे ते इतके उदार बुद्धीचे आहेत, शहाणे आहेत कीं त्यांना ह्या गोष्टी कळविल्याबरोबर ते तुमचें ह्मणणें काय आहे तें ऐकून घेऊन त्याचा प्रतिकार करतील असा आमचा समज होता. पण ही समजूत सुटायला गेली. ५० वर्षांचें सरकारचें वर्तन कारण झालें आहे, कितीही तुह्मी ओरडा; कितीही चळवळ करा, कितीही कारणें दाखवा, त्यांच्या रिपोर्टांतले आंकडे त्यांचे पुढें मांडा पण त्यांच्या दृष्टीला असा कांहीं विकार झाला आहे कीं तेच आंकडे त्यांना दिसत नाहींत. त्याच कोट्या तींच कारणें त्यांना पटत नाहींत. आम्ही जर एखादी गोष्ट सांगितली तर त्याच्या विरुद्ध जें कांहीं असेल तेवढेंच ते घेऊन बसतात. तुम्हांला असें कदाचित कोणी येऊन सांगेल कीं, यांत कांहीं नवल नाहीं. तुमचें राज्य मुसलमानाचें असो किंवा हिंदूंचें असो पेशवाई असो किंवा नगरच्या बादशहाचें असो हीं राज्यें मोडून आतां इंग्रजांची सत्ता झाली आहे. अर्थात ते लोक आपला फायदाच करतात मग त्यांच्याबद्दल तुम्ही ओरडतां कां? हें व्हावयाचेंच असें कित्येकांचें म्हणणें आहे. तुमची ही ओरडही मात्र उगीच सरकारला दुखविण्याकरतां, सरकाराचें मन एक प्रकारें विकारवश करण्याकरितां कारण होतें याकरतां ही ओरड कांहीं करूं नका. आणखी ते काय देतील तें मुकाट्यानें घ्या. चतकोर भाकर देतील तिचा आनंदानें स्वीकार करा. आणि त्यांचे आभार माना असें कित्येक लोकांचें ह्मणणें आहे. मला कांहीं हें ह्मणणें पसंत नाहीं माझें ह्मणणें असें आहे कीं सरकार जरी झालें. कोणतेंही कां असेना इंग्लंडचें असो कोणतेंही असो सरकार ह्मणून सरकारला एक प्रकारचें कर्तव्य आहे. सरकारला एक प्रकारचा धर्म आहे. एक प्रकारची जबाबदारी त्यांचे अंगावर आहे. ती जेव्हां

५

जबाबदारी सरकार टाळील तेव्हां तें सरकारच नव्हे असें मी म्हणतों. सरकारचा अधिकार आहे. सरकारची एकंदर लोकांवर जी कांहीं हुकमत मग ती त्यांनीं लढाई करून मिळविली असो किंवा लोकांनी दिलेली असो परंतु सरकारला कर्तव्य आहे, तुह्मा आम्हांला जसें कर्तव्य आहे तसें ज्यांना सरकार ह्मणतात त्यांनाही कर्तव्य आहे. त्यांनीं अमुक कामें केलींच पाहिजेत. कांहीं कर्तव्य सरकारला कबूलच आहे. रस्ते करणें, सडक बांधणें पोष्ट ऑफिसें स्थापणें. तारायंत्रें, हीं कामें सरकार करतें कीं नाहीं ? करतें. उद्यां जर असें कोणी ह्मणेल कीं सरकारनें सडका बांधल्या नाहींत तर त्याची खुशी. वाटेल तर बांधील नाहींतर बांधणार नाहीं. असें जर कोणी ह्मणूं लागले तर हे सगळे तुम्ही लोक जमलां आहां ते लोक त्याला दूषण द्याल. ह्या गोष्टी करावयाच्या नाहींत तर आह्मी कर देतों कशाला ? आमच्या पासून जे कर घ्यावयाचे त्या करांचा उपयोग लोकांच्या सोई करण्याकडे सरकार करणार नाहीं तर सरकारला आमच्यापासून कोणत्याही प्रकारचे कर घेण्याचा अधिकार नाहीं. हें आमच्या कल्याणाकरितां सरकार घेत आहे. तुम्हांला सरकार जेव्हां चांगलें आहे असें कोणी प्रतिपादन करितें तेव्हां काय दाखवितात या आमच्या सरकारनें सडका बांधल्या, आगगाड्या केल्या, तारायंत्रें केलीं, पोष्टऑफिसें केलीं ह्या तुमच्या सोई केल्या नाहींत का ? आणि तुम्ही कां सरकारच्या नांवानें ओरडतां ? असा नेहमीं प्रश्न विचारण्यांत येतो. या गोष्टी केल्या नाहींत असें माझें ह्मणणें नाहीं. परंतु केल्या एवढ्या पुऱ्या नाहींत. ह्या गोष्टी केल्या आहेत चांगल्या केल्या आहेत, पूर्वीच्या सरकारनें केल्या नसत्या त्यापेक्षां इंग्रज सरकारनें अधीक चांगल्या केल्या आहेत हें त्यांना भूषणावह आहे. पण ज्या गोष्टी सरकार करीत नाहीं त्या गोष्टी आम्हीं सांगूं नये कीं काय ? परंतु ज्या केल्या नाहींत, ज्या करण्याची इच्छा अझून दिसून येत नाहीं. पुष्कळ रितीनें सांगितलें असतां त्या लोकांचे तिकडे लक्ष जात नाहीं. त्या गोष्टी आम्हीं सांगूं नये. सांगितल्या असतां त्यांत सरकारचा अपमान झाला असें ज्या सरकाराला वाटतें तें कांहीं खरें सरकार नव्हे. मग खरें सरकार ह्मणजे काय ? याचा थोडा विचार करण्याला पाहिजे. हल्लींची पद्धती आणि जुनी पद्धती फार निराळी आहे. कलेक्टरसाहेब किंवा हे जे सिव्हिलियन येतात, ज्यांना इंग्रजीमध्यें ब्युराक्रसी अधिकारी वर्ग असें ह्मणतात तो अधिकारी वर्ग ह्मणजे सरकार नव्हे. पोलीस शिपाई ह्मणजे सरकार नव्हे. इंग्रजी राष्ट्रांची जी सत्ता आमच्या देशावर आहे ती सत्ता न बिघडतां, त्यांत कांहीं कमी न पडतां जर आपल्याला ही सत्ता कायम

ठेऊन कांहीं करतां आलें तर तें करा असें ह्मणण्यांत कांहीं कोणत्याही प्रकारचा राजद्रोह होत नाहीं. इंग्रज लोकांची सत्ता जी आमच्यावर आहे ती पाहिजे आहे. पण हे मधें जे कोठावळे आहेत ते आह्मांला नको आहेत ( Cheers ) धान्य यजमानाचें आहे. सामग्री यजमानाची आहे. परंतु या कोठावळ्याचें मधें जें पोट दुखतें ते तेवढें मधलें काढून टाका; आणि ते अधिकार लोकांना द्या. ह्मणजे लोक आपापल्या घरच्या रितीप्रमाणें व्यवस्था पहातील. या प्रकारचें स्वराज्य आह्मी मागतों. स्वराज्य ह्मणजे इंग्रज सरकार काढून टाका, बादशहाची सत्ता काढून टाका आमच्या एखाद्या संस्थानाची सत्ता त्या ठिकाणीं घेऊन असा या स्वराज्याचा अर्थ नव्हे. स्वराज्याचा अर्थ असा आहे कीं—तो खापर्डे यांनीं बेळगांव येथें असा सांगितला आहे कीं आह्मांला देवाचे पुजारी काढून टाकावयाचे आहेत. देव ठेवावयाचे आहेत. हे पुजारी नकोत. दुसरे आमच्या पैकीं पुजारी नेमा असें आमचें ह्मणणें आहे. हे जे मधें कलेक्टर कमिशनर वगैरे लोक आलेले आहेत ते नको आहेत. हल्लीं तुमच्यावर सत्ता कोण चालवितो ? बादशहा येऊन ती चालवीत नाहीं. ते विलायतेंत आहेत. त्यांना कांहीं गोष्टी कळविल्या तर तुमचें कल्याण व्हावें अशी त्यांची इच्छा आहे. मग तुमचें कल्याण कां होत नाहीं ? म्हणोन हे पुजारी आम्हांला नको आहेत ( cheers ) ते लोक हुषार आहेत. तुम्ही असें म्हणतां कीं पुजारी नको. ते म्हणतील कीं आम्ही परीक्षा पास झालों आहों. पुष्कळ कामें करितों ह्या सगळ्या गोष्टी खऱ्या आहेत. परंतु पुजाऱ्याचा जो कांहीं वृत्त्यंश आहे. त्या वृत्यंशाकडे त्यांचें लक्ष अधिक लागलेलें आहे. म्हणोन हा पुजारीपणा आपल्या हातांत राहावा. पंढरपुरच्या बडव्यांची आणि यांची स्थिति एक आहे. ( cheers ) हा पुढारीपणा आपल्या हातांत राहण्याबद्दल हे जे लोक ( Bureaucracy ) खटपट करीत आहेत तो पुजारीपणा त्यांच्या हातांत जर न राहिला तर त्यांत बादशहाचें कांहीं नुकसान आहे का ? कांहीं नुकसान नाहीं. कोणी म्हणतील कीं इंग्रज लोक हे बादशहाच्या वर्णाचे लोक आहेत. परंतु आम्हीही बादशहाची प्रजा झाल्यानंतर मग इंग्रज प्रजा काय आणि काळी प्रजा काय यांच्यामध्यें बादशहा भेद करीत नाहीं. करण्याची इच्छा नाहीं. स्वराज्य या शब्दाचा अर्थ असा आहे कीं—मुनिसिपालटीचे लोकल सेल्फ गव्हर्नमेंट. परंतु तो एक फार्स आहे. तें पुरें नाहीं. कलेक्टरचा हुकूम आला कीं, तुम्हांला तो मानावा लागतो त्याला ( collr ) ढवळाढवळ करण्याचा अधिकार आहे. प्रेसिडेन्टला बोलावून त्याला

कांहीं तरी अमुक गोष्ट कर, असें सांगण्याचा त्याला अधिकार आहे. न करील तर प्रेसिडेंटला काढून टाकण्याचा अधिकार आहे. मग स्वराज्य कसलें ? ( cheers ) स्वराज्य शब्दाचा अर्थ वर आपले बादशहा कायम, इंग्रज लोकांची सत्ता कायम आणि बाकीची व्यवस्था करण्याचा अधिकार पूर्णपणें लोकांच्या ताब्यांत असणें हें स्वराज्याचें लक्षण आहे. आम्ही जे कांहीं मागतों तें कांहीं इंग्रज सरकारची सत्ता कमी करा इंग्रज सरकार जाऊन या ठिकाणीं जर्मन सरकार यावें असें कांहीं मागत नाहीं. उलट हल्लींच्या युद्धामुळें असें सिद्ध झालें आहे कीं आणि तें सर्व जगाच्या निदर्शनास आलें आहे कीं, जर्मन सरकार या ठिकाणीं यावें अशी कांहीं आमची इच्छा नाहीं. इतकेंच नव्हे तर या सरकारचें राज्य येथें कायम राहण्याकरितां अत्यंत दूर प्रदेशांत अत्यंत थंड प्रदेशांत आमच्याकडचे हजारों लोक आज प्राण देत आहेत ( hear ) ( hear ) ( cheers ) मग राहिलें काय ? हें राज्य रहावें हें राज्य जाऊन जर्मन लोकांचें राज्य या ठिकाणीं येऊं नये याकरितां जर आह्मी आमच्या शक्तीप्रमाणें कां होईना पैसे—आह्मी इंग्रजाइतके धन द्रव्य नाहीं तरी आमच्या शक्तीप्रमाणें देतों. आमच्या शक्तीप्रमाणें आमचे लढाऊ लोक जाऊन आपले प्राण तेथें खर्ची घालीत आहेत. आणि अशा रीतीनें ते काम करीत आहेत. फ्रान्स जर्मनी किंवा इतर सर्व राष्ट्रेंहि त्यांची शिफारस करीत आहेत. शाबासकी देत आहेत. ( cheers ) hear hear अशा प्रकारची आपली राजनिष्ठा इंग्रजसरकारच्या ठिकाणीं असावी अशा बद्दलची आमची बुद्धी—आमचें रक्त पाडून आह्मीं शाबीत केली आहे. ( hear hear cheers ) यापेक्षां आपला कांहीं अधिक पुरावा कोणी मनुष्य देऊ शकेल असें मला वाटत नाहीं. तेव्हां आज ही गोष्ट निःसंशय आहे कीं, या ठिकाणीं आह्मांला इंग्रजांचेंच राज्य पाहिजे आहे आणि त्याप्रमाणें आह्मी प्रयत्न करीत आहों मग अशी जर स्थिति आहे तर हे मधले जे लोक नेमिलेले आहेत त्या लोकांना काढून टाकून इंग्रजी साम्राज्यामध्यें इतर ठिकाणीं लोकांना जे हक्क आहेत ते आह्मांला कां मिळूं नयेत. आह्मीं त्यांच्यापेक्षां शौर्यानें कमी नाहीं विद्येनें कमी नाहीं आमचे अंगी कर्तृत्व आहे. इतकें असोन हे हक्क आह्माला का मिळूं नयेत ! बादशाहांनीं आपल्या काळ्या आणि गोऱ्या प्रजेमध्यें भेद कां करावा. बादशाला अशी कोणीं सल्ला दिलेली आहे ? इंग्रजी राज्यसत्तेमध्यें जो एक विशेष आहे तो हा कीं बादशहा लोकांच्या सल्लेवर काम करतो. प्रधान मंडळांनीं त्यांना असा सल्ला कां द्यावा ! हल्लीं

ज्यांच्या हातांत सत्ता आहे ह्मणजे जो अधिकारी वर्ग आहे तो गोरा आहे. काळा त्यांत गेला ह्मणजे तोहि तसाच हेतो. हल्लींची जी एक पद्धत आहे तीमुळें एका नेटिवाला विलायतेहून पास होऊन आल्यानंतर जर कलेक्टर नेमिला आणि तो त्यांच्यांत गेला ह्मणजे तोहि त्यांच्या सारखाच होतो. मी गोऱ्याबद्दलच बोलतों असें समजूं नका. ही पद्धत आह्मांला नको आहे. एखादा मनुष्य त्यांच्यांत गेला तर काय झालें! त्याला कांहीं विशेष करितां येत नाहीं. ह्मणून ही पद्धत मोडली पाहिजे. एक दोन माणसें नेमिल्यानें कांहीं आमचें समाधान व्हावयाचें नाहीं. असो. ही पद्धत कोणी काढली? ती बादशहानें काढली नाहीं. राणीचा जाहीरनामा ज्या वेळीं प्रसिद्ध झाला तो जाहीरनामा एकीकडे आणि हल्लींची पद्धत एकीकडे. हल्लीं आमच्या हातांत कांहीं आमचें कल्याण करावयाचें उरले नाहीं. आम्हांला जर असें वाटलें कीं अमुक एक परदेशी माल येतो त्याच्यावर जकात बसवून स्वदेशी मालाला उत्तेजन द्यावें तर ती गोष्ट आमच्या हातांतील नाहीं. आम्हांला वाटलें कीं देशामध्यें अमुक उद्योगधंदे पाहिजे आहेत ते आम्ही सुरु करूं. बाहेर देशांतून पैसे देऊन शिक्षक आणवूं तर ही गोष्ट कांहीं आमच्या हातांतील नाहीं. किती थोडी गोष्ट आहे. सर्व लोकांना लिहितां वाचतां यावयास पाहिजे. मुसलमान असो, कोणत्याही धर्माचा असो, कोणत्याही जातीचा असो, त्याला थोडेंबहुत लिहितां वाचतां आलें पाहिजे. ही गोष्ट आतां सर्व पृथ्वी वरील सगळ्या लोकांना कबूल झाली आहे. याबद्दल आतां कांहीं शंका नाहीं. लिहितां वाचतां आल्यानें मनुष्याला कांहीं तरी फायदा होतो. हें कांहीं कोणाला नव्यानें सांगावयास नको. मग आमच्याकडे ती गोष्ट कां होत नाहीं. पैसा नाहीं म्हणून ही सबब कोण सांगतो? ही सबब अधिकारी वर्ग सांगतात. यांचा पगार २५०० असतो आणि तो ३००० हजार करावयाचा असला तर पैसे आहेत. Exchange compensation ची अशीच गोष्ट झाली. रुपयांचा or (रुप्याचा) भाव उतरला तेव्हा हुंडणावळी करितां सरकारकडोन ६ कोट रुपये बाहेर काढिले गेले तेव्हां पैसे मिळाले. ह्या ज्या गोष्टी होत असतात. त्या तुमच्या हातांत सत्ता असल्या खेरीज कांहीं निभाव लागावयाचा नाहीं. शिक्षणाला पैसा नाहीं आणि कलेक्टरचा २५०० रुपये पगार द्यावयाला पैसा आहे ही गोष्ट आम्ही जितकी स्पष्ट रीतीनें म्हणतों, स्पष्ट रीतीनें सांगतों. आणखी आमचे हातांत सत्ता आली असतां आम्ही त्या गोष्टीचा ज्या दृष्टीनें विचार करूं त्या दृष्टीनें हल्लींचा अधिकारी वर्ग विचार करीत नाहीं. आम्हाला पाहिल्यानें असें

सांगितलें कीं शिक्षणावर पैसा खर्च करावा. लोकांना लिहितां वाचतां येऊं लागलें म्हणजे हजारों गुन्हे कमी होतात, ते आपले व्यवहार चांगले करितात. त्यांना नफ्याची गोष्ट कोणती आणि नुकसानीची गोष्ट कोणती हें कळतें. अशा तऱ्हेचे लोक झाल्यानंतर त्यांची राज्यव्यवस्था करावयाला आम्हांला २,५०० रुपयांचा अमलदार लागणार नाहीं. ५०० रुपयांचा पुरेल व २,००० रुपये आम्हांला शिक्षणाकरितां खर्च करितां येतील. कोणत्याही देशांत हल्लीं इतके मोठ्या पगाराचे अधिकारी नाहींत. हिंदुस्थानाला अधिकारी जो व्हाइसराय येतो त्यांना दरमहा २०,००० रुपये मिळतात. व इंग्लंडच्या मुख्य प्रधानाला ५,००० रुपये मिळतात. सगळ्या इंग्लंडांत बसून जो साम्राज्याचें काम चालवातो त्याला ५,००० रुपये व हिंदुस्थानचा जो इकडे राज्यकारभार चालवितो त्याला २०,००० रुपये असें कां ? त्याला उत्तर कांहीं नाहीं. हें परभारें काम भागतें म्हणून ( cheers ) हा हिंदुस्थान देश आहे. जा आणि खा. तुमच्या ताब्यांत जर लोकांचें एखादें दुकान व्यवस्था चालविण्यास दिलें तर तुम्ही जर तुमच्या दुकानांत ५० रुपये पगार दिला असता तर त्याला १०० रुपये पगार द्याल. आपल्या लोकांचा किंवा जातीचा मनुष्य असेल तर तशी ही व्यवस्था चालली आहे. या व्यवस्थेनें आपलें कांहीं कल्याण नाहीं. तेव्हां ह्या गोष्टी आपल्या नजरेस आजच नव्यानें आल्या असें नाहीं. आज ५० वर्षें ह्या गोष्टी आपल्या नजरेस आल्या आहेत. १९०६ सालीं ज्या वेळेस कलकत्त्याला कांग्रेस भरली त्या वेळेस दादाभाई नौरोजी ( cheers ) यांनीं स्पष्ट असें सांगितलें. त्यांनीं पन्नास वर्षांचा आपला अनुभव सर्वांस सांगितला कीं ही जी कांहीं अव्यवस्था आहे हा जो कांहीं एका प्रकारचा अन्याय हिंदुस्थान देशांत घडत आहे याचा प्रतिकार होण्याला लोकांच्या हातांत सत्ता जाण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं Self Govt. असें त्याला नांव दिलें आणि लोकांच्या हातांत आमच्या घरांत काय करावयाचें, आमच्या गांवांत काय करावयाचें, आमच्या देशांत काय करावयाचें, आमच्या इलाख्यांत काय करावयाचें याची व्यवस्था ठरवायला आम्ही पाहिजे. आम्ही तें ठरविलें तर तें थोड्या खर्चानें होईल, चांगलें होईल, आणि कोणीकडे आज पैसा जास्त खर्च करावा, कोणीकडे कमी करावा याचा जो कांहीं आम्ही निकाल करूं तो लोकांच्या अधिक हिताचा असा होईल. अधिकारी वर्ग म्हणतो तुम्ही शहाणे नाहीं. जें कळतें तें त्यांनाच. अधिकाऱ्यांची पहिली दृष्टि आपला पगार कसा वचावेल ? तिजोरींत पैसे आले म्हणजे

ह्यांच्या पगाराचा खर्च पहिल्यानें निघाला पाहिजे यांचा लष्करी खर्च पहिल्यानें निघाला पाहिजे. यांची एकंदर व्यवस्था झाली पाहिजे. मग जर पैसे उरले तर मग शिक्षणाकडे द्यावयाचे. शिक्षण ते नको म्हणत नाहींत. त्यांच्या दृष्टीनें शिक्षण ही कांहीं वाईट वस्तु नाहीं परंतु सगळा खर्च भागल्यानंतर मग लोकांना शिक्षण द्यावयाचें. लोकांची कांहीं सोय असेल तर पाहावयाची. हा नंतरचा विचार आहे. तुमच्या हातांत सत्ता आली असतां व्यवस्था होईल कीं नाहीं. ह्या गोष्टीचा आधीं विचार करूं. जर आपल्याला असें वाटेल कीं या लोकांना अधिक पगार द्यावा लागतो तर तो कमी करा व त्याला असें सांगा कीं तुला देशाकरितां हें काम करावें लागेल. अशा तऱ्हेनें ज्या वेळीं या सर्व गोष्टींचा विचार होईल त्यावेळीं आपल्याला ज्या कांहीं गोष्टी घडवून आणणें इष्ट आहे त्या घडवून आणण्याचा योग आपल्या हातीं येईल. हा केवळ विचार झाला. तुमचें अडतें आहे कोठें ? मराठींत एक सामान्य ह्मण आहे. एकानें तीन प्रश्न विचारले. घोडा अडतो कोठें ? विड्याचीं पानें कां सडलीं—तिसऱ्या बुकांत गोष्ट आहे. पूर्वीं होती आतां आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं—अशा दोन तीन प्रश्नाला त्यानें एकच उत्तर दिलें आणि तें हें कीं न फिरविल्यामुळें, तसें आमच्या इलाख्यांत दारु कमी खपत नाहीं. ( दारूचा खप कमी होत नाहीं. ) फॉरेस्टमधें लोकांवर जुलूम कां होतो. शिक्षणाला पैसे कां मिळत नाहीं. या सगळ्याचे एक उत्तर आहे आणि तें हें कीं तुमच्या हातांत सत्ता नाहीं म्हणून ( cheers) आणि ही सत्ता जोंपर्यंत तुमच्या हातांत येणार नाहीं तोंपर्यंत तुमचा भाग्योदयही होणार नाहीं बादशहा कोणीही असो त्याच्याबद्दल आमचें ह्मणणें नाहीं. पण ज्या गोष्टी व्यवहारांतल्या, व्यापारांतल्या, धर्मांतल्या समाजांतील आहेत, त्या गोष्टी आम्हाला करावयाला पाहिजेत. त्या गोष्टी आम्ही करण्याची सत्ता आमच्या हातांत थोडीबहुत आल्याखेरीज—सरतेशेवटीं पूर्ण आली पाहिजे—पूर्णपणें आमच्या ताब्यांत आल्याखेरीज आम्हांला कोणत्याही प्रकारें सुबत्तेचा, भाग्योदयाचा, फायद्याचा किंवा उत्कर्षाचा काल येणें अशक्य आहे. लोकांच्या तोंडानें कांहीं पाणी पितां येत नाहीं. तें आपणच प्यावें लागतें. त्याप्रमाणें हल्लींची व्यवस्था आहे—( लोकांच्या तोंडून पाणी पिण्याची ) आपलें पाणी—आपल्या विहिरीचें पाणी—आपण ओढून आपण प्यालें पाहिजे. मग ती विहीर सरकारची असली तर एक रुपया महिनाप्रमाणें कर द्यावा पाहिजे तर. पण आम्हांला सत्ता पाहिजे आहे. ती आमच्या ताब्यांत आल्याखेरीज,

आमचा तरणोपाय नाहीं, हें एक राजनीतीचें तत्व बहुतेक ठरल्यासारखें–इतिहासाचे दृष्टीनें, नीतिशास्त्राच्या दृष्टीनें, समाजशास्त्राच्या दृष्टीनें सिद्ध झाल्यासारखें आहे. मग तुम्ही विचाराल कीं इतके दिवस आम्हांला कां सांगितलें नाहीं, यासंबधानें मला दोन शब्द सांगावयाचे आहेत. ती सत्ता आमच्या ताब्यांत यावी किंवा येण्याचा आज कल दिसूं लागला आहे. इतके दिवस इंग्लंडांत सामान्य लोकांची समजूत अशी होती कीं, हिंदुस्थान देशांतून जितका फायदा निघेल तितका काढावा. हिंदुस्थान एक प्रकारचें आमच्यावर आझें आहे. इंग्लडांतील राष्ट्राला–लोकांना असें वाटत होतें कीं, हिंदुस्थानांत ३० कोटी लोक आहेत ते केव्हांना केव्हां तरी आमचें राज्य बुडविणार. यांच्या हातचीं शस्त्रें काढून घेतलीं पाहिजेत यांना जितकें दास्यांत आणि ताब्यांत ठेवितां येईल तितकें ठेवलें पाहिजे. पण आज ती स्थिती पालटली आहे. हल्लीं युरोपखंडांत जें युद्ध सुरू झालें आहे त्या युद्धामुळें आतां असें वाटूं लागल आहे कीं इंग्रजीं साम्राज्याचे जे कांहीं अनेक प्रांत आहेत. ते सगळे एकत्रट झाल्याखेरीज या साम्राज्याला जितकी शक्ती यावयास पाहिजे तितकी शक्ती येणार नाहीं. आज असें झालें आहे कीं, त्यांचे जे दुसरे देश आहेत–आस्ट्रेलिया, कानडा, न्यूझीलंड जेथें साहेबलोकांची वस्ती आहे वसाहती म्हणतात त्यांना त्यांची मदत आपल्याला पाहिजे आहे अशी बुद्धी जागृत झाली आहे. या जागृत झालेल्या बुद्धीचा जर तुम्ही फायदा घ्याल तर तुम्हांलाही कांहीं हक्क मिळण्याची संधि आलेली आहे. तुम्हांला हे हक्क कांहीं तरवार घेऊन मिळवावे म्हणून कोणी सांगत नाहीं. पण आज राष्ट्राची बुद्धी पालटली आहे, हिंदुस्थानाकडून इंग्लंडला कांहीं मदत होऊं शकते. हिंदुस्थान सुखी असलें तर इंग्लडलाही एक प्रकारचें वैभव, एक प्रकारची शक्ती, आणि एक प्रकारें मोठेपणा येणार आहे. ही बुद्धी इंग्लंडांत जागृत झालेली आहे. या जागृत झालेल्या बुद्धीचा जर या वेळीं फायदा घेतला नाहीं तर अशी संधी कांहीं पुन्हां यावयाची नाहीं? या अधिकारी वर्गाला ही गोष्ट वाईट वाटते. यांत कोणाचें नुकसान आहे? बादशहाचें नाहीं तर या अधिकारी वर्गाचें आहे. तेव्हां त्यांना ही गोष्ट वाईट वाटते. आणि ते हल्लीं असा उपदेश करित आहेत कीं तुह्मी स्वराज्याला पात्र नाहीं. ह्मणून आह्मी येथें आलों आहों. जसें काय हे ज्या वेळीं हिंदुस्थानांत नव्हते त्या वेळीं हिंदुस्थानांत कोठेहि स्वराज्य नव्हतें. सगळे आह्मी रानटी आणि एकमेकांचे गळे कापण्याला प्रवृत्त झालों होतों. पेशवाईत राज्यव्यवस्था नव्हती. मुसलमानींत राज्यव्यवस्था नव्हती

आह्माला कांहीं राज्यकारभार पाहतां येत नव्हता आह्मांला रस्ते करतां येत नव्हतें. लोक सुखी कसे रहावे हें आह्माला कळत नव्हतें. नाना फडणवीस मूर्ख होता, मलिकंबर मूर्ख होता, अकबर औरंगजेब मूर्ख होते. ह्मणून येथें हे आमच्या कल्याणाकरितां आले आहेत आणि तुह्मी अजून पोरें आहांत ( laughter ) पोरें आहांत हेंहि घटकाभर कबूल केलें. आतां तुह्मी मोठे तरी कधीं होणार आहां ? कायद्यामध्यें २१ वर्षांचा झाला ह्मणजे मोठा समजतात यांनीं ५० वर्षें आमच्यावर राज्य केलें तरी आह्मांला मोठें होतां आलें नाहीं तेव्हां यांनीं ५० वर्षें केलें काय ? जर हिंदुस्थानाचे लोक पोरें होते तर त्यांना शहाणे करण्याचें काम कोणाचें होतें ? यांचें काम होतें. राज्यकर्ते हे होते. माझें तर असें ह्मणणें आहे कीं हें काम यांनीं केलें नाहीं—तेव्हां आह्मी पोरें आहों इतकेंच नव्हे—तर हे राज्य करण्याला नालायक आहेत ( cheers )- ज्या लोकांना ५० वर्षांत आपली प्रजा सुधारतां आली नाहीं त्यांनीं आपला अधिकार सोडून दुसऱ्याच्या ताब्यांत द्यावा हेंच चांगलें. तुमच्या दुकानचा म्यानेजर असला आणि त्यानें ५० वर्षें मुनिमाचें काम चालविलें परंतु ५० वर्षें सारखी तूटच येत चालली तेव्हां त्याला तुह्मी काय सांगाल ? सोडून जा बाबा आम्ही आमची व्यवस्था पाहून घेऊं. दुसरा हलक्या प्रतीचा असेल कमी शहाणा असला तरी त्याला इतकें तरी कळेल कीं दुकानची व्यवस्था करतांना नुकसान तरी येऊं नये. एवढें तरी त्याला कळलें पाहिजे. जे लोक आपल्याला असें सांगत आहेत कीं तुह्मी पात्र झालेले नाहीं तें आपमतलबीपणाचें आहे. हें सांगणें खरें असेल तर त्यांची एक प्रकारें नाचक्की आहे. ते अयोग्य ठरत आहेत. आणि खोटें असलें तर आपमतलबीपणाचें आहे. याशिवाय दुसरें आपल्याला त्यापासून कोणत्याही तऱ्हेनें अनुमान करतां येत नाहीं. आम्ही नालायक ह्मणजे आहे काय ? झालें काय आह्माला ? म्युनिसीपालिटीची व्यवस्था केलेली चालते. कोणी विलायतेहून पास होऊन आला आणि कलेक्टर झाला तर चालतो ते कामें करितात. सरकार त्यांची शिफारस करितें. आणि स्वराजाचा हक्क ज्या वेळीं, लोकांना द्यावयाचे, त्या वेळीं तुह्मी नालायक आहां असें स्पष्टपणें सगळ्या लोकांना कोट्यावधी लोकांना नालायकीचें सर्टिफीकीट देणें ह्मणजे आपल्या नालायकीचें प्रदर्शन करण्यासारखें आहे. ( cheers ) याशिवाय आणखी पुष्कळ प्रकारचे आक्षेप स्वराज्यावर घेतले जातात पहिली गोष्ट मीं सांगितलीच कीं ते एकदम सगळ्या राष्ट्राला नालायक ठरवितात

परीक्षा घ्या ह्मटलें तर परीक्षाही घ्यावयाची नाहीं. नालायक नालायक ह्मणजे काय तुमचीं माणसें काम करायाला बसवा आणि आमचीं हीं माणसें कामें करावयाला बसवा काम बरोबर करितात कीं नाहीं तें पहा. कामें करायाला संधी द्यावयाची नाहीं आणि नालायक म्हणावयाचें. ज्यांना संधी दिली आहे. ते तरी नालायक ठरले आहेत का ? कायदे कौन्सिलांत मेंबर आहेत ते नालायक आहेत काय ? त्यांनीं आपल्याला कधीं नालायक म्हटलें आहे काय ? तुम्हीं कधीं म्हटलें आहे काय ? नाहीं. मग नालायक याचा अर्थ तरी काय ? तुम्हांला द्यावयाचें नाहीं. ताक नाहीं म्हणावयाला काय लुचे-गिरी करावयाला लागते ? आज आदितवार आहे ताक नाहीं. अशा तऱ्हेची आज हल्लीं लटपटपंची चाललेली आहे. ती चालूं न देतां पूर्ण नेटानें तुम्ही मागावयाला तयार आहे किंवा नाहीं हे मला विचारावयाचें आहे. तुम्ही जर मागावयाला तयार नाहीं तुम्ही जर याबद्दल आग्रह धरिला नाहीं, आजची संधी तुम्ही फुकट दवडली तर अशी संधी पुन्हा १०० वर्षांत यावयाची नाहीं तेव्हां तुम्ही तयार असलें पाहिजे. मला ठाऊक आहे कीं, तयार होऊन जर अम्मळ जोरानें बोललों तर येखादा, पोलीसचा शिपाई ऐ, म्हणेल नाहीं असें नाहीं. परंतु तें सोसलें पाहिजे. याला कांहीं मार्ग नाहीं. आमच्या हातांत सत्ता नाहीं. आम्ही कांहीं असें सांगू शकत नाहीं पोलीस शिपायाला कीं तूं मूर्ख आहेस परत जा. तो हुकूम पोलीस ईन्सपेक्टरचा मानतो परंतु मला तुम्हांला असें सांगतां येतें कीं याबद्दल जर तुम्ही निश्चयानें एकीनें सर्व जातीचे लोक, सर्व धर्माचे लोक एकत्र होऊन जर या वेळीं ही मागणी सरकाराकडे मागाल, आग्रह धराल, याकरितां जो कांहीं खर्च करावा लागेल तो करावयाला तयार व्हाल, ती मागणी आपल्याला मिळाल्या खेरीज आपली तृप्ती व्हावयाची नाहीं, संतोष रहावयाचा नाहीं असें सरकारलाच नव्हे तर सर्व जगाला जाहीर कराल इतका नेट जर तुमच्या आंगांत असेल तर माझी खात्री आहे कीं, परमेश्वर-कृपेनें ही मागणी लवकरच तुम्हांला मिळाल्याखेरीज राहावयाची नाहीं. तुमच्या निश्चयाचें फळ आहे. धर्मामधें काय किंवा राजकारणामधें काय. निश्चय पाहिजे. आणि तो मनाचा निश्चय हिय्या केल्या खेरिज येत नाहीं. कसें होईल म्हणून चालावयाचें नाहीं. बरें होवो वाईट होवो हीच गोष्ट आम्हांला पाहिजे. हीच आम्ही मागणार याकरितां आम्ही पैसे गोळा करून खर्च लागेल तो श्रम लागतील ते करणार आणि ही आमची मागणी पुरी होईतोंपर्यंत आम्ही ही चळवळ बंद करणार नाहीं. आमच्या हयातींत हें काम पुरें झालें

झालें नाहीं तर आमचीं पोरेंबाळें पण हीच चळवळ कायम ठेवतील अशी जेव्हां निष्ठा या कामावर असेल त्याच वेळीं फळ मिळत असतें. निष्ठेखेरीज परमेश्वराकडे फळ मिळत नाहीं. राजाकडे मिळत नाहीं. इहलोकीं नाहीं परलोकीं नाहीं. ही निष्ठा जर तुमच्यांत नसेल तर अशा तऱ्हेनें प्रयत्न जारीनें करून तरी त्यापासून कांही फळप्राप्ती व्हावयाची नाहीं. निष्ठा प्रथम पाहिजे. श्रीमंताला गरिबाला निष्ठा पाहिजे. गरीबानें आपल्या परीनें मदत केली पाहिजे. श्रीमंतानें आपल्या परीनें मदत केली पाहिजे. जे बुद्धिमान आहेत त्यांनीं बुद्धिद्वारें मदत केली पाहिजे. प्रत्येक मनुष्याच्या मनाला ही गोष्ट लागून राहिली पाहिजे. अशी जर गोष्ट तुमच्या मनाला लागून राहिली नाहीं, तुम्ही खटपट करावयाला तयार झालां नाहीं तर अपयशाचा बोजा लोकांच्या डोक्यावर देणें केवळ मूर्खपणा आहे. मूर्खपणा हा शब्द कदाचित वाईट लागला असेल, मी भरांत बोलून गेलों परंतु माझी अशी दृढ समजूत आहे कीं, आम्ही जितके जारीनें प्रयत्न करावयास पाहिजे तितके जोरानें, तितके आस्थेनें, तितक्या निष्ठेनें अजून करावयास लागलों नाहीं. एखाद्या साहेबानें सांगितलें कीं, तुम्हांला अधिकार दिले तर गैर व्यवस्था होईल किंवा नाहीं. तर आम्ही हो हो म्हणतों. आपल्याकडे लोक नाहीं ! मनुष्याची तयारी नाहीं ! आणि मग साहेबाला हांसतों, घरीं; तेथें हंसावयास पाहिजे ( cheers ) ( laughter ) घरीं हांसून नाहीं चालावयाचें. तोंडावर जबाब पाहिजे. आपल्याला ज्या गोष्टी खऱ्या वाटतात, त्या गोष्टी प्रतिपादन करण्याला, त्या सांगावयाला, लोकांना सांगावयाला, कळविण्याला, अधिकाऱ्यांना सांगावयाला, किंबहुना बादशहासहि सांगावयास आम्ही तयार पाहिजे. ज्या दिवशीं तुम्ही तयार व्हाल त्या दिवशीं–विशेषतः या काळामध्यें ही लढाई झाल्यानंतर राज्य व्यवस्था कांहीं तरी निराळी करावी लागेल हल्लींच्या सारखी राज्याची व्यवस्था असली तर युरोपियन राष्ट्रांत इंग्लंडला कांहीं अधिकार देतां येत नाहीं. सध्यां इंग्लंड सर्वांत मोठें प्रबळ आहे. विलायतसरकार बलिष्ठ आहे. परंतु तें तसेंच कायम ठेवण्याला हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत जरूर फरक केला पाहिजे. वस्तुतः तो फरक करा असें ते म्हणत आहेत; हिंदुस्थान तो फरक करा असें कांहीं म्हणत नाहीं. त्यांत कांहीं तरी खोड्या निघतात. मी आज उभा राहिलों. उद्यां दुसरा उभा राहिला. आणि सांगतो कीं यांत तुमचें कल्याण नाहीं आज जी चालली आहे तीच व्यवस्था बरी आहे. दयाळू सरकार आहे. अधिकारी वर्ग शहाणा आहे. तेव्हां त्यांच्या तंत्रानें चालला

तर बरें. व्यापारी वर्गाला ही स्थिति लागू नाहीं. बुद्धिमान लोकांना ही स्थिती लागू नाहीं. कोणत्याही धर्मातील मुसलमानांना वगैरेंना लागू नाहीं. एकाच केवळ वर्गाला केवळ मुसलमान व्यापाऱ्यांना लागू आहे असें नाहीं. मला जी गोष्ट सांगावयाची आहे ती मुसलमानाकरितां, हिंदूकरितां, व्यापाऱ्यांकरितांही नाहीं. सगळ्यांना लागू आहे. सगळ्या लोकांना एकच औषध आहे, तें औषध सत्ता, आपल्या ताब्यांत घ्या ती तुमच्या ताब्यात आली म्हणजे तुमचीं आमचीं भांडणें असलीं तर तीं आपल्याला तोडतां येतील. आपल्या हातांत सत्ता आल्यानंतर तीं भांडणें आपल्यांला तोडायाला पुष्कळ वेळ आहे. धर्मसंबंधीं समजुतीत मतभेद असला तरीही आम्हीं तोडूं. सत्ता याच्या करितां आम्हांला पाहिजे आहे. भांडणें मिटवावयास सत्ता पाहिजे. ती वाढविण्याकरिता सत्ता नको आहे. जें कांहीं आम्हांला आमच्या देशा करितां करावयाचें आहे तें आम्हांला जितकें कळतें तितकें कांहीं परकीयांना कळत नाहीं त्यांची दृष्टी निराळी असते यासांठीं इंग्रज सरकारचें राज्य वर कायम ठेवून एकच बादशाहा इंग्रज सरकारच्या सांम्राज्यावर ज्याप्रमाणें राज्य करतो त्याचप्रमाणें तो हिंदुस्थानावरहि राज्य करील. पण इतर वसाहतींत जशी व्यवस्था आहे तशी येथें सुरू करा. तेथें वसाहतीमध्यें त्यांची सत्ता त्यांची मालकी कायद करण्याची सत्ता सर्व त्यांच्याच हातांत असते. त्यानें बादशाहाला बाध येत नाहीं इंग्रज सरकारचे राज्य बुडविण्याचा प्रयत्न नाहीं तर इंग्रज सरकारचें राज्य लोकांना अधिक समाधानकारक करण्याचा हा प्रयत्न आहे यानें काहीं लोकांचीं पोटें बुडतील, नाहीं असें नाहीं. तेवढ्या लोकांकरितां हिंदुस्थान बादशाहानें राखून ठेवलें आहे असें वाटत नाहीं कांहीं कारणानें ही व्यवस्था आली आहे , ती गेली पाहिजे लोकांच्या हातांत बादशाहानें अधिकार दिले पाहिजेत. आणि हिंदी प्रजेमध्यें, व इंग्रजी प्रजेमध्यें, गोऱ्या आणि काळ्या प्रजेमध्यें कोणत्याही प्रकारचा भेद न ठेवतां ती जशी बादशहाची प्रजा तसेच आम्हीही प्रजा आहों. ते जितके सुखी आहेत तितकें आम्हालाही सुख झालें पाहिजे. या सगळ्यांची किल्ली म्हणून जी हल्लीं कांहीं लोकांनीं शहाण्या, विद्वान विचारी पुरुषांनीं जी गोष्ट ठरविली आहे ती स्वराज्य होय. त्याची वेळ आज आली आहे. त्याचा अर्थ काय आहे तें मी आपल्याला समजावून सांगितलें आहे. त्याची वेळ आली आहे. ही ती कशी हें आपल्याला मीं सांगितलें आहे. परंतु सर्व कांहीं असलें तरी तुमचा निश्चय

अखेरीचा आहे. वेळ आलेली फुकट जाईल जी व्यवस्था मी ह्मणतों ती होणार असली तर तुह्मांला लाभणार नाहीं. तुमचा निश्चय पाहिजे. ती मिळविण्याची सुदैवानें गोष्ट अशी आहे कीं याप्रकारची चळवळ सुरू झाली आहे. नुकतीच बेळगांवाला आम्ही स्वराज्याचा उद्योग करण्याकरितां एक संस्था स्थापिली आहे. कॉंग्रेस सभेत हा विषय आहेच. आणि ते त्याची कांहीं तरी व्यवस्था लावतीलच. परंतु प्रांतांप्रांतांनीं आपली जरी तजविज केली आणि त्यांना साहाय्य केलें निदान इतकें धैर्य दाखविलें पाहिजे कीं कोणी विचारलें. कलेक्टर कमिशनर वगैरे यांनीं—कीं तुम्हांला काय पाहिजे तर आम्हांला सभा पाहिजे. आमच्या हातांत सत्ता पाहिजे. सरकारी नोकर लोकांचे नोकर आहेत. असें समजावें. तुह्मी असें समजूं नका कीं पुढें तुमचे हातांत सत्ता असली ह्मणजे तुम्ही युरोपियन लोकांना नोकर ठेवावयाचेच नाहीं. त्याला चांगलें काम येईल तर ठेऊं. आणि आम्हांला योग्य दिसेल तें त्याला देऊं. प'तु तो आमचा नोकर पाहिजे. त्याचे नोकर आम्ही नाहीं. अशी बुद्धी मनामधें बाळगून त्याकरितां आपण जर खटपट केली तर ही गोष्ट साध्य होण्यासारखी आहे. याकरितां लागेल ती मदत करा. याला जे कांहीं लोक आपल्याला सांगावयास येतील त्यांना जें कांहीं साहाय्य करावें लागेल तें करण्यास तयार व्हा. आणि असें तुम्ही तयार झालां–ठिकठिकाणचे लोक–पुणें, मुंबई, नगर इतकेंच नव्हे तर मद्रास, बंगाल वगैरे ठिकाणचे लोक तयार झाले तर ही गोष्ट साध्य आहे. ती सिद्ध होण्याकरितां, लवकर सिद्ध होण्याकरितां त्या उद्योगाला लागा. इतकें आपल्याला सांगून त्याप्रमाणें कांहीं तरी फळ लवकरच दृष्टीस पडण्याचा काळ हिंदुस्थानावर येईल, अशी आशा प्रदर्शित करून जर कांहीं मी आपल्या व्याख्यानामधें प्रमाद केले असले किंवा आपल्याला कांहीं लागून बोललों असलों तर त्याबद्दल आपली क्षमा मागून मी आपले अत्यंत आभार मानतों ( cheers )

ता. १-६-१६

## टिळक यांचें दुसरें व्याख्यान.

**जागाः—जुना कापड बाजार, नगर.**

रा. चौकर वकील यांनीं टिळकांस व्याख्यान देण्याची विनंति केली. ( Cheers )

बाळ गंगाधर टिळक म्हणालेः—( " टिळक महाराजकी जय अशी आरोळी " ) काल जें येथें व्याख्यान झालें, त्यानंतर दुसरें व्याख्यान देण्याचा बहुधा प्रसंग येणार नाहीं असें मला वाटलें होतें. स्वराज्यासंबंधी ज्या दोन चार कांही सामान्य गोष्टी आहेत त्या एका तासांत जितक्या मला सांगतां येणें शक्य होतें, तितक्या त्यावेळीं मीं सांगितल्या आहेत. परंतु हा विषय असा आहे कीं, त्यावर एक काय दहा व्याख्यानें झालीं तरी ती पुरीं पडणार नाहींत. तेव्हां कालच्या विषयाला अनुलक्षून काल ज्या कांहीं गोष्टी सांगण्यांत आल्या नव्हत्या, अशा प्रकारच्या स्वराज्यासंबंधानें दुसऱ्या २ गोष्टी, ज्यामुळें याच विषयाचें अधिक स्पष्टीकरण होईल, अधिक समजूत पडेल, लोकांच्या मनांतील. कल्पना अधिक विशद होतील, अशा प्रकारें आज त्या विषयावर पुन्हां मी बोलणार आहें. साधारणतः माझें मत असें कीं, आम्हांला ज्या कांहीं सुधारणा पाहिजे आहेत? जर तिला त्या स्वराज्याच्या सुधारणा होत. आपल्याला माहीत असेल "वृद्ध जरठी ती न्याय" तो असा आहे कीं, त्या म्हाताऱ्या बाईला देवता प्रसन्न झाल्यानंतर तिनें काय मागावयाचें याचा विचार केला, आणि असें सांगितलें कीं, देवतपासून असा वर मागितला कीं माझे नातु सोन्याच्या ताटांत जेवतलि असें मी प्रत्यक्ष पाहीन, असा वर देवतेनें मला द्यावा, म्हणजे तिनें तोंपर्यंत हयात रहावें, मुलगा व्हावा, त्यानें संपत्ति मिळवावी वगैरे वगैरे—या एका लहानशा वरामध्यें सगळा अर्थ एका ठिकाणीं येतो तद्वतच स्वराज्याची गोष्ट आहे. स्वराज्य जर मिळालें नाहीं तर औद्योगिक उन्नत्ति व्हावयाची नाहीं, स्वराज्य मिळालें नाहीं तर कोणत्याही प्रकारचें प्राथमिक शिक्षण असो, वरिष्ट शिक्षण असो, राष्ट्राला उपयुक्त असें शिक्षण मिळणें शक्य नाहीं—स्वराज्य जर मिळालें नाहीं तर नुसतें स्त्रीशिक्षणही वाढवून चालावयाचें नाहीं, औद्योगिक सुधारणा होऊन चालावयाचें नाहीं, सामा-

जिक सुधारणा होऊन चालावयाचें नाहीं, हीं सगळीं स्वराज्याचीं अंगें आहेत, सत्ता आधीं. आणि ज्या ठिकाणीं सत्ता त्या ठिकाणीं शहाणपण, शहाणपण सत्तेला सोडून नसतें. असेल तर तें विफळ होतें. कोणत्याही राष्ट्रामध्यें हा सिद्धांत कांहीं विशेष विशद करून सांगावा लागत नाहीं. पण आमच्या लोकांना हा विशेष रीतीनें समजावून द्यावा लागतो. याचें कारण आमच्याकडे स्वराज्य नाहीं. हें होय. कांहीं लोक आमच्या पक्षावर असा आक्षेप घेत असतात कीं, तुम्ही सामाजिक सुधारणा कां करीत नाहीं ? हें बोलणें आमचें नाहीं त्यांना आम्हाला स्वराज्याचे हक्क द्यावयाचे नाहींत, त्यांचें, आमच्या चळवळीची गाडी या रुळावरून काढून दुसऱ्या रुळावर घालण्याकरितां, हें बोलणें आहे. सामाजिक सुधारणा ज्यांची झाली आहे. असे पुष्कळ लोक आहेत. सामाजिक सुधारणा ब्रह्मदेशांत पुरी झाली आहे. धर्म एक आहे. ( तेथें ) हव्या त्या गोष्टीला ते लोक तयार आहेत. त्यांचीं मुलें हवे त्यांच्यांशीं लग्न करितात. कोणत्याहि गोष्टीला राष्ट्रीयत्वाचें तेज तेथें नाहीं. तो देश पारतंत्र्यांत पूर्ण बुडून राहिला आहे. तेव्हां पाहिजे आहे काय ? आह्मी एक राष्ट्र आहों आम्हांला कांहीं या जगांतील कर्तव्य आहे. मनुष्याचे जे स्वाभाविक हक्क आहेत ते आम्हांला मिळाले पाहिजेत, स्वतंत्रता आम्हांला पाहिजे आहे. आमचा कारभार चालविण्याचा हक्क आमचे हातांत पाहिजे. या गोष्टी जर तुम्हांला मिळाल्या नाहींत, तर कोणतीही सुधारणा तुम्हांस फलद्रूप होणार नाहीं. तें सगळ्या सुधारणांचें मूळ आहे. सत्ता नाहीं. शहाणपण नाहीं, नुसतें पुस्तकी शहाणपण सत्तेशिवाय व्यर्थ आहे. अशी जर तुमची समजूत असेल, कीं जे लोक राज्यकर्ते—आमच्यावर राज्य करावयाला आले आहेत ते आमच्यापेक्षां बुद्धीनें आणि विद्येनें अधिक आहेत. माझी अशी स्वतःची समजूत नाहीं. त्यांच्या इतकी विद्या, त्यांच्या इतकें शौर्य, त्यांच्या इतकी कर्तबगारी, आम्ही दाखवूं शकूं. कदाचित ती आज निदर्शनास आली नसेल, पण ती आमच्या आंगांत आहे. ज्योतिषामध्यें जसे योग असतात तसेच इतिहासामध्येंही योग आहेत. मुसलमानांचें एक राज्य बुडत चाललें होतें तेव्हां मराठे नुकतेच उदयास आले होते. पुढें ह्या हिंदुस्थानांत इंग्रजांचा पाय पडल्यामुळें सर्व सत्ता त्यांच्या ताब्यांत गेली आहे, आणि त्यांचें जें कांहीं तुम्ही कौतुक करितां, त्यांच्या कर्तबगारीबद्दल जो कांहीं एक आपल्याला अभिमान वाटतो मग तो खरा असो वा खोटा असो—तो अभिमान किंवा तें त्यांचें कौतुक याला त्यांची सत्ता कारण होते.—आणि या

सत्तेचा जेव्हां कांहीं थोडा तरी अंश तुमच्या ताब्यांत येईल तेव्हां तुमच्या शहाणपणाचें बीज होईल. पुष्कळ गोष्टी आज आम्हांला पाहिजे आहेत. आमच्या उद्योगधंद्याची सुधारणा झाली पाहिजे, पण ती अडली कां ? कोणी अडविली ? याला कारण काय याचा जर विचार करावयास लागलों तर ही औद्योगिक सुधारणा आम्हीं अडविली नाहीं, सांपत्तिक सुधारणा आह्मीं अडविली नाहीं; ज्या राष्ट्रामध्यें वर यावयास आपणांस आपली कांहीं तरी कर्तबगारी दाखविण्यास मार्ग आहे, मोकळीक आहे त्या राष्ट्रामध्यें गुण उदयाला येत असतात शहाणपण असेल तर कोणत्या तरी मोठ्या अधिकाऱ्याला मदत करून त्यांनीं जेव्हां तुम्हांस शाबासकी द्यावी तेव्हां तुह्मांला वाटतें कीं, तुमच्या अंगांत कर्तबगारी आहे हा जो एक प्रकारचा मनाचा हलकेपणा,—नाहुरूपपणा, आहे तो सर्व राष्ट्राला ग्रासून राहिला आहे. ह्मणावयाचें कीं; माझ्या हातून होणार नाहीं, तूं कधीं केलें नाहीं, तुला कोणी सनद दिली नाहीं, त्याच्या आधींच तूं कां ओरडतोस कीं, अमुक गोष्ट माझे हातून होणार नाहीं ह्मणून कोणत्या तरी दुसऱ्या मार्गाला लागतात. निदान आमच्या महाराष्ट्रांत तरी अशा रीतीनें लोकांना कांहीं कांहींनीं हीच सबब काढून स्वराज्याचे हक्क प्राप्त होण्यासाठीं जी चळवळ चालविली आहे त्याचे आड यावें हें माझ्या मतें मोठें दुर्दैव होय. आह्मी या गोष्टी केल्या नाहींत का ? याचा विचार करा राष्ट्राकरितां उपयोग करून घेण्यासारखा गुण महाराष्ट्रांत खचित आहे. पण त्या गुणाचा उपयोग करण्याची संधी आपल्याला हल्लींच्या काळीं मिळत नाहीं आणि ती संधी मिळत नाहीं. ह्मणून दुसरें कांहीं तरी करा, स्त्रीशिक्षण करा, अमुक करा, तमुक करा, इकडे आमचें मन कांहीं वळत नाहीं ( cheers ) दुसऱ्या कोणाला यामधें जर—कांहीं धोका वाटत असेल तर त्यांनीं करावें पण माझ्या मानाची खात्री होऊं शकत नाहीं, झालेली नाहीं आणि जीं कांहीं थोडीं वर्षे राहिलीं आहेत—त्यांत होईल असें वाटत नाहीं. ( cheers ) इतर विषयासंबंधानें बोलणें वायफळ आहे. आमचे लोक आज वीरश्रीनें शौर्यानें विद्येनें युक्त नाहींत ते आमच्या बायका शिकल्या ह्मणचे त्यांची पिढी तशी होईल परंतु तें तरी आमच्याच वीर्यापासून व्हावयाचें ( cheers ) अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. स्त्रीशिक्षण नको असें मी ह्मणत नाहीं पण ही इकडची चळवळ बंद करण्याकरितां तिकडे वळा असें जेव्हां आह्मांला सांगतात त्यावेळीं आमचें असें ह्मणणें आहे कीं; राष्ट्र मृत करण्या-

च्या हा उपाय आहे. तुमच्या आंगांत जर कुवत नसेल तर, तुमच्या आंगांत एखादा गोष्ट प्राप्त करून घेण्याची धमक नसेल तर शिकलेली बायको घेऊन तिच्या पोटीं जें संतान होईल तें तसें होईल आणि ते आमचे पुत्र उतराई ह्मणून कांहीं खटपट करतील असें ह्मणणें अगदीं मूर्खपणाचें आहे. ( cheers ) तुह्मांला आपल्या पायावर उभें राहिलें पाहिजे. तुह्मांला या गोष्टी घडवून आणल्या पाहिजेत. आणि त्यांतील मुख्य गोष्ट ती प्रथमतः घडवून आणिली पाहिजे. ज्यांनीं आज ५० वर्षें प्रयत्न केले त्यांचा असा अनुभव आहे कीं, हें स्वराज्य ही सगळ्यांची किल्ली आहे. आणि ही जर तुमच्या हातांत आली नाहीं तर किरकोळ प्रयत्न करून मग ही सुधारणा आम्ही करितों. तुम्हांला करावयाची असेल तर करा माझी हरकत नाहीं. परंतु तें कांहीं—याला ( स्वराज्याला ) पोषक नाहीं. या मार्गाला पोषक नाहीं. आणि याच—बुद्धीनें मीं जें काल सांगितलें त्याच विषयावर पुन्हा मी आज बोलणार आहें. स्वराज्य म्हणजे काय हें काल सांगितलें. स्वराज्य ह्मणजे इंग्रजांना घालवून द्यावयाला नको राजा कोणी असला तरी चालेल. राजाशीं आह्मांला कांहीं करावयाचें नाहीं. आमचे हक्क आह्मांला मिळाले ह्मणजे झालें. आणि तो राजा कोणीही वर असोन ते हक्क मिळूं शकतात. इंग्लंडांत राजा आहे. परंतु इंग्रज लोकांना हक्क आहेत किंवा नाहींत. इंग्लंडचा राजा तोच आमचा बादशाहा. मग इंग्लंडात त्यांचें राजेपण कायम राहून जर इंग्रज लोकांना स्वातंत्र्याचे हक्क मिळतात, तर हिंदुस्थानांत तोच राजा बादशाहा ह्मणोन कायम राहून ब्रिटिश नागरिकत्वाचे हक्क आह्मांला मिळण्याला अडचण कोणती ? कोणत्याहि प्रकारची अडचण राहात नाहीं. हें जें काहुर उठविलें आहे कीं, होमरूल—स्वराज्य—याबद्दलची जळवळ राजद्रोही आहे, आणि जो राजद्रोह आहे असें समजून बीझांटबाईकडोन दोन हजारांचा परवां जामीन घेण्यांत आला, हें काहुर हा आक्षेप बादशाहाचा नाहीं, प्रजेचा नाहीं मध्यंतरी जे कोठावळे आहेत त्यांचा आहे ( Cheers. ) तुह्मांला जें कांहीं कर्तव्य आहे, तें कीं, ही राज्यव्यवस्था बदलली पाहिजे. राजा बदलावयाला नको. ज्या पद्धतीनें ज्या व्यवस्थेनें हल्लींचें राज्य चाललें आहे, ती व्यवस्था ती पद्धत बदलल्याखेरीज हिंदुस्थानाचा प्रत्येक मनुष्य अधिक अधिक नामर्द होत जाईल. आपल्याला जें कांहीं कर्तव्य आहे तें हें कीं, कांहीं लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, खायला तर देतात कीं, नाहीं, कोणाला मारित नाहींत, पशुपक्ष्यांना सुद्धां खायाल मिळतें. खायाला मिळणें हा कांहीं पुरुषार्थ नाहीं.

"काकोपि जिवति चिराय बलिंच भुंक्ते " कावळा आपला उदरनिर्वाह करितो. त्यांना कांहीं शेतें पिकवावीं लागत नाहींत, रोज त्यांना शिजविलेला भात खायाला मिळतो. उदरनिर्वाह करून पोट भरून राजानें लावून दिलेल्या मर्यादेच्या आंत, त्यांनीं मोकळ्या ठेवलेल्या जेवढ्या जागा असतील तेवढ्या स्वीकारून त्यांचे हुकूम मानणें, त्यांच्या तंत्रानें उदरनिर्वाह करणें, यांत कांहीं मी पुरुषार्थ समजत नाहीं. पशूंचा आणि हा समान धर्म आहे. मनुष्यामध्यें जर कांही मनुष्यपणा पाहिजे तर आमची बुद्धि, आमची कर्तबगारी, आमची एकंदर हिंमत हिय्या यांना कांहीं तरी प्रदेश मोकळा आहे कीं नाहीं हिंदुस्थानाला तसा प्रदेश मोकळा नाहीं. याकरितां तुम्हांला जर काहीं कर्तव्य असेल तर पहिलें कर्तव्य हें कीं, या सत्तेपैकीं कांहीं अंश आपल्या ताब्यांत घ्या, थोडा कां घ्याना, अध्यक्षांनीं ह्मटल्याप्रमाणें ( नगर जिल्हापरिषदेचे अध्यक्ष N. C. Kelkar ) थोड्यामध्यें आह्मी मुखत्यार—आमचा पैसा आह्मीं खर्च करणें, आम्ही कर देतों तो कोणत्या कार्याकडे लावावा, याच्याबद्दलचा ठराव आम्ही आपल्या बुद्धीनें करणें, दहापांच लोकांच्या संमतीनें करणें, अशा प्रकारची उमेद जर बाळगिली नाहीं तर उत्तरोत्तर सृष्टीनियमाप्रमाणें—अशी जी कांहीं मनुष्यामध्यें या प्रकारची उमेद किंवा बुद्धी असते ती कमी कमी होत जाईल, त्या मानानें अधिक अधिक पशूंच्या समानतेला येत जाऊं. स्वराज्य स्वराज्य म्हणजे काय ? आणि त्यानें होणार काय ? स्वराज्य म्हणजे काय एक कलेक्टर काढला आणि तुमचा ( Natives ) आला. हें जरी आम्हांला कलेक्टर राहून शेवटीं ते ( English ) आले तरी पाहिजे आहेत. अमुक मनुष्य काढा अमुक ठिकाणीं अमुक व्यवस्था ठेवा असें सांगण्यास कांहीं हरकत नाहीं. कदाचित् गोरा मनुष्य पगार देऊन आमचाही नोकर होईल,चांगला असला तर आम्ही ठेऊंही. व्यक्तीचा वादच नाहीं. राष्ट्राचा वाद आहे. अमुक एका राष्ट्रला पशुसारखें वागवावयाचें कीं त्या राष्ट्रांतील लोकांना माणसें आहेत, तसें समजून त्यांच्या मनोवृत्तीला त्यांच्या स्वातंत्र बुद्धीला कांहीं तरी वळण लावणें, त्यांना सुधारलेल्या राष्ट्राच्या पंक्तीला आणून द्यावयाचें, हा मुख्य प्रश्न आहे. आणि अशा दृष्टीनें जर विचार केला तर त्याला स्वराज्याखेरीज—सत्ता हातीं असल्याखेरीज दुसरा कांहीं मार्ग नाहीं. ती सत्ता ज्यावेळीं एकदां आपल्या हातांत येईल त्यावेळीं आपल्याला हजारों गोष्टी करितां येतील. पुण्याला एवढा मोठा प्रयत्न झाला कीं, घोड्याला एक दारूचें दुकान एक हजार दोन हजार प्राप्तीचें असेल सरकाराला—परंतु तें उठविण्याचें

आमच्या ताब्यांत नाहीं असुक ठिकाणीं दारूचें दुकान घाला, किंवा घालूं नका, याला इतकें correspondence कशाला? ह्या येवढ्या खटाटोपाला मला वाटतें, कीं, जितके कागद लागले असतील तितका दुकानाला वर्षाचा नफा नसेल. ( laughter here here ) हा जो खटाटोप चालतो हल्लींच्या व्यवस्थेंत तो बंद व्हावा, ही अरेरावी बंद व्हावी, आणि ती सत्ता आमचे ताब्यांत यावी ती सत्ता आमचे ताब्यांत आल्यानें आमचे अंगांत असलेल्या वडलोपार्जित गुणांचा उत्कर्ष होईल. ते गुण कोणत्याही तऱ्हेनें उपयोगांत आणावयाला आम्हांला वाट सांपडेल. तें स्वराज्य, स्वराज्य म्हणजे दुसरें कांहीं नाहीं. थोडें कां असेनां? तें तुम्हांला जाचत नाहीं. जितकें जाचावें तितकें जाचत नाहीं. घरामध्यें बसला कांहीं तरी धंदा केला, दोन पैसे मिळविले, मुलाबाळांचें पोट भरलें हें इतकें पुरतें आहे. आतां स्वराज्याची खटपट कशाला याचें उत्तर येवढेंच आहे कीं, जी एक राष्ट्राबद्दलची बुद्धी, आपल्यापेक्षां कांहीं तरी अधिक या जगामध्यें आहे, आपल्या एका व्यक्तीपेक्षां अधिक व्यक्तींच्या समुदायाचा फायदा करण्याचें जें एक अधिक कर्तव्य आहे, तें कर्तव्य तुम्हीं विसरत चाललां एक वेळ अशी होती कीं महाराष्ट्राच्या मालिकेंत या मुलखांत असे कर्ते पुरुष होते कीं, ज्यांना ध्येयांची जागृती होती. परंतु दैवयोगानें हा मनुष्य स्वभाव राहिला नाहीं. आमचें काम जर दुसरा करूं लागला तर आह्मी ह्मणतों बरें झालें. काम झालें ह्मणजे झालें. पण कोठें बरें ह्मणावयाचें आणि कोठें नाहीं याचा विवेक मात्र आमच्यांतून नाहींसा झाला आहे. इंग्रज लोक आमचा राज्यकारभार चालवितात, तुह्मी स्वस्थ बसलां आहां. गुरांच्या गोठ्यांत घाण असेल तर झाडलोट करितात—Sanitation—बघतात, वेळच्या वेळीं खायाला घालतात, पाणी पाजतात—परंतु गुरांनीं असा प्रश्न केला आहे का, कीं ही व्यवस्था आमच्या हातांत यावी ( Laughter ) मनुष्यांमध्यें आणि गुरांमध्यें भेद आहे तो हा कीं, नगरच्या शहरचें Sanitation कलेक्टरसाहेबांनीं पहावयाचें, रोग आला तर काय करावें हें त्यांनीं सांगावयाचें, दुष्काळ पडला तरी त्यांनीं व्यवस्था करावयाची तुमच्यावर कोणतीही आपत्ति येऊं नये याची व्यवस्था त्यांनीं करावयाची. ह्मणजे ज्याप्रमाणें पोपटाला पिंजऱ्यांत ठेवितात त्याप्रमाणें तुमची स्थिती झाली आहे, ही स्थिती नको आहे, याला कारण नुसतें ते चालवितात हें नव्हे तर त्या व्यवस्थेमुळें आपल्या अंगचे सर्व गुण नाहींसे होत चालले आहेत, ते नाहींसे होऊं नयेत, याकरितां ते करितात, तें करावयाला आम्हांला

मोकळीक पाहिजे, ते करतात त्या पलीकडचे दुसरे विषय शोधून काढावयाचे नाहींत. ते करीत आहेत ते सोडून दुसरे काय वाटेल तें करूं असें करावयाचें नाहीं. तेंच पाहिजे आहे. तीच सत्ता आम्हांला आमचे हातांत पाहिजे आहे. याला एकच काय तो आक्षेप आहे. परंतु अशी अवस्था होणें अत्यंत वाईट आहे. एक गोष्ट केसरीमध्यें प्रसिद्ध झाली होती, पिंजऱ्यांत ठेवल्याबद्दलची अशी कविता रवींद्रनाथ टागोर यांनीं आपल्या आत्म-चरित्रांत लिहिली आहे. पिंजऱ्यांत ठेविलेला एक पोपट आणि बाहेरचा एक पोपट या दोघांचा संवाद त्यांत सर्व सांगितलेला आहे. बाहेरच्या पोपटांनीं पिंजऱ्यांतील पोपटाला सांगितलें कीं, बाहेर अशी मजा आहे. इतकें हिंडावयाला मिळतें वाटेल तेथें जायाला मिळतें, वाटेल त्या वेळीं खायाला मिळतें. हा आनंद तुला कोठें आहे. पिंजऱ्यांत ठेवलेल्या पोपटानें उत्तर दिलें कीं, बाबा तूं ह्मणतोस तें खरें आहे. परंतु ही सोन्याची काठी बाहेर गेल्यावर कोठें मिळणार आहे. तशी आमची अवस्था झाली आहे ! स्वराज्य मिळालें तर चालविणार कसें ? देत नाहीं घेत नाहीं कोणी, तुम्हांला काळजी पडली स्वराज्य मिळालें तर आह्मी चालविणार कसें! आह्मी योग्य नाहीं. त्या पोपटाला पिंजरा बसावयाला कांठी वगैरे कशी मिळणार तो बाहेर गेला तर तीच आमची अवस्था झाली आहे. ही अवस्था स्वाभाविक नव्हे. ती कृत्रीम आहे. त्या पोपटाला जसें पुष्कळ वर्षे पिंजऱ्यांत कोंडल्यामुळें त्याला अशी भावना उत्पन्न झाली, तसेंच हे अधिकार आमच्या हातांतून गेल्यामुळें आह्मांलाही ती भावना उत्पन्न झाली. ही आमची मूळची स्वाभाविक—मनुष्याची स्वाभविक—भावना नाहीं. जशी पोपटाची ती स्वाभविक भावना नव्हे. तशीच आमच्या राष्ट्राचीही स्वाभाविक भावना नव्हे. हें पहिल्यानें लक्षांत घेतलें पाहिजे. जें अंगावर काम पडेल तें करायला आह्मी तयार होतों, याप्रमाणें जे लोक तयार होते, त्याचे वंशज आह्मी आहोंत, आणि त्यांचे जर आपण वंशज असाल तर आह्मांला ती संधी आली असतांना त्यांचे or तेच गुण आमचे अंगांत प्रगट झाले पाहिजेत. आणि होतील अशा भरंशानें त्या करितां आपण उद्योग केले पाहिजेत असें माझें ह्मणणें आहे (cheers) अनुवंशिक संस्काराला जर कांहीं किंमत असेल तर या, नाहीं तर अमक्याचे नातू पणतू हे तरी ह्मणावयाचे सोडून द्या. हल्लीं आमचेकडे पुष्कळ सरदार आहेत ते ह्मणतात आमचे आजे सरदार होते, त्यांच्या अंगांतहि त्यांच्या रक्ताचे गुण आलेले आहेत. परंतु त्यांनीं जें वतन मिळविलें आहे तें बचावण्याकरितां ते साहे-

यांची कोणत्या प्रकारें वाटेल त्या प्रकारें सेवा करतात, बरें मी ह्मणतों हे सरदार ह्मणून असे लागले. परंतु तुह्मी आम्ही ज्यांना कांहीं मिळवावयाचें नाहीं, त्यांनीं तरी त्यांच्या नादीं कां लागावें? अशा तऱ्हेची जी राष्ट्रावर एक प्रकारची छाया पडली आहे या छायेंतून आपल्याला सुटावयाचें आहे. हें ग्रहण आहे. चंद्राला ग्रहण लागलें ह्मणजे तें सुटण्या-करितां दानें करितात, तुम्हांला जें ग्रहण लागलें आहे, तें सुटण्याकरितां एक पैहि खर्च करावयला तुम्ही तयार नाहीं. किंवा त्याकरितां हलायला तयार नाहीं. चंद्राला ग्रहण लागलें म्हणजे पूर्वींचे ब्राह्मण जप तरी करीत होते. तुम्ही कांहीं जप तरी करितां आहां कां? याकरितां खटपट करीत आहां कां? याकरितां कोणाला दोन पैसे द्यायाला तयार आहां कां? नाहीं. कांहीं नाहीं. येवढा मात्र आक्षेप काढतात कीं, हिंदूस दिलें तर मुसलमानाचें कसें चालावें? हिंदूस स्वराज्याचे अधिकार दिले तर मुसलमानांना मिळणार नाहीं. मग मुसलमान बंधूबरोबर याचा योग्य विचार करून ठराव करितां यावयाचा नाहीं जसें? आमचे हातांत सत्ता आली तर आम्ही मुस-लमानांवर जुलूम करूं आणि मुससलमानांच्या हातांत गेली तर ते हिंदूवर जुलूम करणार? हे लोकांच्या तर्फे ह्या गोष्टी तुम्हांला सांगायला येतात. ते कोण? कशाकरितां ह्या गोष्टी तुम्हांला सांगतात. तुम्हांला भुरळ पाडण्याकरितां. याचा विचार केला पाहिजे. हे सिव्हिल सर्वंट लोक तुमच्या पेक्षां फार हुशार आहेत. त्यांना आपले हातांत सत्ता ठेवावयाची आहे. हा "त्रयाणां धूर्तानाम्" सारखा प्रकार आहे. राजकीय कामामध्यें तुम्हा मागितलें ह्मणजे तुह्मांला सांगावयाचें कीं, तुम्ही नामर्द आहां तुमच्या विरुद्ध मुसलमान आहेत ( असें ते सांगतील ) मुसलमानांनीं सांगितलें कीं आमची कांहीं हरकत नाहीं. तर तिसरीकडे बोट दाखवावें. मला तुमच्यापैकीं कोणाला असें सांगणें नाहीं कीं, हे हक्क मिळविण्याकरितां बेकायदेशीर गोष्टी करा. कायदेशीर मार्ग आहे परंतु तो कायदेशीर मार्ग असा आहे कीं, तुम्ही अगदीं दुसऱ्याचें ऐकतां कामा नये. तुमचें जें काय आहे त्या गोष्टी आम्हांला पाहिजे असें निश्चयानें तुम्ही म्हणावयाला तयार झालें पाहिजे. जोंपर्यंत तुमच्या मनांत निश्चय नाहीं. तोंपर्यंत कोणी पोलिसाचा अमलदार आल्याबरोबर " कां टिळकांच्या व्याख्यानाला गेला होतास काय ?" " हो मागून गेलों होतों. लांब बसलों होतों. मला सगळें ऐकूं आलें नाहीं. " ( cheers ) पोलीस अंमलदारांनीं पाहिलें असतें नाहीं ह्मणतां येत नाहीं. अशा तऱ्हेची तुमच्या मनामध्यें भीति कां? आम्हांला

स्वराज्य पाहिजे आहे, असें म्हणण्यांत काय भीति आहे, हें अडतें घोडें तें येथें आडतें, त्याला ( लोकांना ) ( व्याख्यानास येणाऱ्या ) मागाहून विचारलें म्हणजे सांगतों खरें असेल तें. पण ( पोलीसनी विचारलें तर ) म्हणतो " मी नीट ऐकलें नाहीं. २१४ माणसें सांगत होतीं त्याला काय करावें माझें मत नाहीं हो त्याचे सारखे " अशी लटपटपंची नाहीं चालावयाची या कामांत. लटपटपंचीनें कोणतीहि देवता प्रसन्न होत नाहीं. त्या देवतेला तुमच्या मनांत काय आहे तें कळत असतें आणि या सगळ्या ज्या कळणाऱ्या देवता आहेत त्यांत स्वतंत्रता देवीचा या विषयावर मोठा कटाक्ष आहे. तुम्हांला पाहिजे तें मागा आणि देतील, कदाचित् एक दोनदां नाहीं म्हणतील कितीदां नाहीं म्हणणार हें अशा लटपटपंचीचें काम नाहीं इतकी खात्री झाली पाहिजे. यत्न झाल्याखेरीज गत्यंतरच नाहीं अशी त्यांची खात्री झाली पाहिजे. तुमच्यांत कांहीं तरी दिसेपर्यंत भीति दाखवावयाची, हें प्रत्येक देवतेचें काम आहे. आमच्या योगशास्त्रामध्यें पाहतां देवता साधन करण्यास पाहिजे. त्या भीति दाखवावयाला लागतात. साधलें म्हणजे बरेंच झालें. आपण भीतीला न जुमानतां आपण आपलें काम निश्चयानें केलें तर योगशास्त्रांतील देवता आपल्याला प्रसन्न होतात. हें प्रमेय आहे. हा न्याय आहे. राजकीय बाबतींतहि दुसरा न्याय नाहीं. मार्ग नाहीं. आम्हांला तें पाहिजे आहे, तें ( स्वराज्य ) प्राप्त करून घेणार आणि तें मिळाल्याखेरीज आह्मी आपले उद्योग सोडणार नाहीं अशी दृढ भावना तुमच्यामध्यें असल्याखेरीज ही गोष्ट कांहीं प्राप्त व्हावयाची नाहीं. हें भय मागें राहील, पोलीस मागें राहील, सी. आ. डी. कलेक्टर मागें राहील, अखेर ती गोष्ट प्राप्त होईल. यांच्या डुरकावणीला तुह्मी डरतां कामा नये, किंवहुना असें समजलें पाहिजे कीं, हा याचा एक निश्चित परिणाम आहे. इंग्रजीमध्यें अशी एक ह्मण आहे कीं, अंधारांतून गेल्याखेरीज उजेड दिसणार कसा ? सूर्याला सकाळीं उगवावयाला अंधारांतून जावें लागतें. सामान्य लोकांची समजूत सांगतों. शास्त्राची समजूत सांगत नाहीं. अंधारांतून गेल्याखेरीज उजेडाची प्राप्ती होत नाहीं. या छळा जाचणुकींतून आणि लोकांच्या डुरकावणींतून बाहेर पडल्याखेरीज स्वतंत्रतेची प्राप्ती नाहीं. निश्चय पाहिजे आहे. स्वराज्य म्हणजे काय हें मीं आपल्याला सांगितलें. त्याचे प्रयत्न तितक्या जोरानें सुरू झाले पाहिजेत. ईश्वरकृपेनें आज जगाची स्थिती पालटत चालली आहे. भाविक भाषेंत बोलावयाचें म्हणजे ईश्वर साहाय्य करण्याला तयार झाला आहे. पण ईश्वर तयार होऊन तुह्मी कोठें तयार आहांत

( Laughter ) ईश्वर स्वस्थ आहे. आकाशांतून तुम्हांस देणगी धाडावी ! कोणीच धाडीत नाहीं. ईश्वर सुद्धां धाडीत नाहीं. आणि जर त्यानें धाडली तर तिचा उपयोगहि व्हावयाचा नाहीं. कारण तुम्ही भिऊन चाललां म्हणजे आहे हेंच पाठीमागून आहे कीं नाहीं, ही देणगी दिली तर तिचा उपयोग कसा करावा ? म्हणजे ईश्वराची कोठें जर जागा असली तर त्याच्या घरीं ती पोहचती कराल. जर पोस्टानें जात असेल तर पाठ-वाल ( Laughter ) अशा तऱ्हेची जी भावना ती झाल्यानंतर—राष्ट्रीय हक्क काय हें मी आपणाला सांगितलें, याच्यापैकीं भाग जी अशा तऱ्हेची सत्ता ती आपल्या हातीं आल्यानंतर काय घडून येईल. राष्ट्रावर काय परिणाम होईल हें मी आज सांगणार आहें. स्वराज्य म्हणजे काय हें मी आपल्याला सांगितलें. माझे मित्र केळकर यांनीं सांगितलेंच आहे कीं, स्वराज्य म्हणजे इंग्रज लोकांना घालवून आपली सत्ता त्या ठिकाणीं स्थापित करावयाची नाहीं कांहीं लोकांना घालवावें लागेल, राजाला घालवून राजसत्ता हातांत घेणें नव्हे. तर प्रजेचे हक्क हातांत घेणें होय. इंग्लंडला या एका राष्ट्राला गुलाम ठेवण्यापासून कांहीं फायदा आहे काय याचा जर नीट विचार केला तर आज एकंदर जगाच्या स्थितीवरून असें दिसून येतें कीं, केव्हांना केव्हां तरी इंग्लंडला आपल्या हातांतील सामराज्याचे अवयव जे प्रांत व देश आहे, त्या देशांना स्वतंत्रता देणें जरूर पडेल. केव्हां तरी ही गोष्ट घडावयाची आहे. घडली पाहिजे. पण तुम्ही जर कांहींच केलें नाहीं तर मात्र घडावयाची नाहीं. सगळी रात्र जागून चोर ज्यावेळीं आला त्यावेळीं निजलेले, तशी तुमची स्थिती होईल. वेळ येते आहे. परमेश्वराच्या कृपेनें जगाच्या—इतर राष्ट्रांच्या—घडामोडीचें स्वरूप कदाचित् तुम्हाला अनुकूल होईल. पण हा काळ अनुकूल झाला, तुम्ही जागे असेल तर उपयोग–नाहीं तर निजलांत म्हणजे निजला. त्यामुळें जर आप-त्याला स्वराज्याचे हक्क मिळाले तरी काय होणार आहे ? काय होणार याचें थोडक्यांत मी आपणाला चित्र सांगतों. पेशवाईच्या वेळीं काय झालें. त्याला थोडासा इतिहास अवलोकन करावयास पाहिजे. पेशवाईचे वेळीं महाराष्ट्रांतील व्यवहार चांगल्या रीतीनें चालला होता. अशी ही पेशवाई ज्यांनीं बुडविली, आणि बुडविल्यातंतर जे कमिशनर झाले ते:—Elphinstone साहेब आहेत. त्या साहेबांची साक्ष आहे. एवढें मोठें पुणें शहर असतांना रात्रीं दरवडे पडत नसत. दारूचा खप शून्य होता. त्याची बंदीच होती. मूळ जमाबंदीची पद्धत जी नाना फडणविसांनीं एकदां घालून दिली तिचीच नक्कल पुढें

करण्यांत आली. किंबहुना जमाखर्च ठेवावयाचा कसा, accounts ठेवावयाचे कसे हें शास्त्र पेशवाईमध्यें आमच्याकडे उदयाला आलें आणि तेच अकाऊंट्स अजून ठेविले आहेत. प्रांताची व्यवस्था कशी करावी हें आम्हांला ठाऊक होतें. नाना फडणविसाची सी. आय. डी. इतकी मोठी उत्तम होती कीं, अमुक सरदार जेवतांना अमक्या जवळ अमुक बोलला ही त्याच्याकडे बातमी जात असे ( Cheers ) एका वेळीं अशी गोष्ट सांगतात कीं, खोपोली घाटांतून मुंबई सरकारनें * रेसिडेंटकडे दारूगोळा मेण्यांतून पाठविला होता. पुणें दफ्तरांतून असा हुकूम सुटला कीं, अमुक तारखेला तो मेणा येईल तो घाटावर अडवून ठेवावा, याला बातमी होती कीं, मेण्यामधून दारूगोळा यावयाचा आहे. पुढें रेसिडेंटनें तक्रार केली कीं, आमचा मेणा आडविला कां ? तेव्हां नाना फडणिसांकडोन त्यांना जबाब आला कीं, याचा तुम्हीच विचार करा. आम्ही मेणा जप्त केला आहे. तो सोडीत नाहीं. कोठें काय घडलें हें राजाला कळलेंच पाहिजे. आम्ही तें केलें. सांगितलें. C. I. D. पाहिजे आहे. नको कोठें आहे. जर राजाला बातमी नसली तर राज्यकारभारच करतां यावयाचा नाहीं. सी. आय. डी. बद्दल आमची मुळींच तक्रार नाहीं. त्याच्या काम करण्याच्या रीतीबद्दल तक्रार आहे. ( cheers)(hear hear) ती रीती कांहीं आमच्या ताब्यांत नाहीं.ज्याला राज्य चालवावयाचें आहे,त्याला सगळीं खातीं पाहिजेत. पोलीस पाहिजे. C.I.D. पाहिजे. रेव्हेन्यू पाहिजे, ज्युडिशियल पाहिजे. सगळीं खातीं पाहिजेत.अडतें कोठें? एका गोष्टींत अडतें.सगळें लोकांच्या ताब्यांत आमच्या ताब्यांत पाहिजे. यामध्यें कायतें आडतें. कित्येकांचें असें मत झालें आहे कीं, इंग्रज हे अगदीं सुधारलेले आहेत, आम्ही ही सुधारा, सुधारणा नको आहे कोणाला ? सगळ्या सुधारणा पाहिजे आहेत. नाना फडणविसाचे वेळीं पत्रें पाठवावीं लागत. आतां C. I. D. तार करील. साधनें उपलब्ध झालीं आहेत. या सगळ्यांचा उपयोग करूनच राज्यकारभार चालवावयाचा आहे. पण ही सगळी पेशवाईच्या वेळीं राज्य व्यवस्था होती. ती मोडून आतां काय झालें आहे. तें लक्षांत आणा. पेशव्याचें राज्य गेलें. त्यावेळीं नगर, सातारा, पुणें, हीं जीं खुद्द पेशव्याच्याकडे ताब्यांत होती. त्याच्या ताब्यांतील मुलूख इंग्रज सरकारच्या ताब्यांत आला. आणि पेशव्याचे जे हस्तक होते, ते त्यावेळीं मोठे मोठे सेनापति होते. सैन्यावर ज्याचा अंमल चालत असे असे जाहागीरदार आणि सरदारापैकीं प्रमुख बडोदे होळकर आणि शिंदे होते हे तिघेही इंग्रज सरकारला लवकर सामील झाल्यामुळें जिवंत

राहिले. आणि पेशवाई बुडाली हा १८१८ तला इतिहास आहे आज या तिघांची स्थिति काय आहे बडोदेंसरकारची काय स्थिती आहे. होळकराची स्थिती काय आहे. शिंदेसरकाची स्थिती काय आहे. आणि पुण्याच्या आसपासच्या मुलखाची किंवा जिल्ह्याची स्थिती काय आहे. याचा विचार करा. हे ३१४ जिल्हे इंग्रज सरकारच्या ताब्यांत गेल्यामुळें हळू हळू यांचा सर्व कारभार एका ब्युराक्रसीच्या ताब्यांत आला. ह्या ब्युरॉक्रसीची व्यवस्था कशी काय आहे कीं, लोकांचें कांहीं ऐकावयाचें नाहीं. गव्हर्नर पहिल्यानें मग कमिशनर, नंतर कलेक्टर, कलेक्टरच्या हाताखालीं asatt: collr. मामलेदार, अवल कारकून फौजदार पोलीस शिपाई सगळ्या एकंदर अधिकारी वर्गाची पहिल्यापासून शेवटपर्यंत अशी ही मांडणी आहे त्यांनीं लोकांकरतां काय तें करावयाचें. वर सरकारला जें लोकांच्या कल्याणाचें वाटेल किंवा अकल्याणाचें वाटेल तें तिकडून हुकूम येईल त्याप्रमाणें खालीं व्यवस्था व्हावयाची, पहिल्या पहिल्यानें मोठें गोड वाटलें होतें. बाजीरावाची अंदाधुंदी मोडली आतां म्हणालें आम्ही सुरक्षीत आहोंत. घी दृष्टीस पडलें परंतु बडगा कोठें दृष्टीस पडला. ( Laughter ) तो मागून हळू हळू दिसावयास लागला. सर्व सत्ता या अधिकारीवर्गांच्या ताब्यांत गेली आणि बाकीचे जे लोक होते, जे राहिले होते शिलक त्यांना शिक्षण मिळालें. आगगाड्यांचा उपयोग करतां येऊं लागला, नगरास मी येतों किंवा नाहीं असें कळवावयाचें असेल तर तार पाठवितां येते. शिक्षण मिळालें हे सर्व फायदे मिळाले. परंतु ही जी सगळी सत्ता होती, ती सगळी सत्ता अधिकारीवर्गाचे ताब्यांत गेली ती कंपनीच्या वेळीं कांहीं गेलेली होती. आणि १८५८ सालीं हिंदुस्थानसरकारचा जो आक्ट झाला. तो आक्ट झाल्यापासून यंदा ५८ वर्षें झालीं. या ५८ वर्षांत काय झालें ? अधिकारी प्रबळ झाले. सत्ताधारी झाले. लोकांची सत्ता कमी झाली. ती तेथपर्यंत कीं कुळकर्णी आम्हाला नको. नोकर पाहिजेत सगळे. कोणाला आपले अधिकार जन्मतः पिढिजाद असले तेही गेले. इनाम कमीशन आलें त्यावेळीं लक्षांत आलें नाहीं. त्याला कांहीं इलाज नाहीं त्यांनीं सांगितलें कीं, विंचूरकर त्या वेळी जाहागीरदार होते. सैन्याचे मालक होते कोणी १०००० तर कोणी १५ हजाराच्या सेनेचा अधिकारी होता. त्यांना सांगितलें कीं तुम्हांला १५ हजार सैन्य पुरवावयाचें आणि तुम्हांला १५ लाख रुपये द्यावयाचे, यामुळें तुम्हाला खर्च येतो १४ लाख मग एक लाख रुपये घ्या कबूल केलें. त्यांनीं घरीं बसून खायला मिळतात. मग काय ? हें

मोठें तत्व आहे. त्या वेळीं असें कोणींहि म्हटलें नाहीं कीं, आमचा सैन्य ठेवण्याचा, सरकाराकरितां लढण्याचा, अधिकार गेला. असें कांहीं कोणाला वाटलें नाहीं. चांगलें आहे सरकार, घरीं बसून खायला देतें. आणखीं पाहिजे आहे काय ? या स्थितीमुळें आमची अशी अवस्था झाली आहे. ५०।६० वर्षांमध्यें या प्रांताचे सगळे अधिकार युरोपीयन अधिकारी वर्गाच्या ताब्यांत गेले आहेत. यावरून असें समजूं नका कीं मी युरोपीअन अधिकारी वर्ग वाईट म्हणतों. ते फार मोठे शिकलेले आहेत. विलायतेंतून उत्तम विद्यार्थी जे येतात, त्यांना या जागा मिळतात. त्यांची कर्तृत्वशक्ति अधिक असते. पण इतकें सगळें जरी कबूल केलें तरी त्यांना आपल्याकरितां काम करितांना मोठी झीज लागते विलायतची हवा थंड आणि इकडची उष्ण हवा म्हणोन त्यांना पगार अधिक द्यावा लागतो. आपल्या कल्याणाकरितां आलेले, त्यांना नाहीं म्हणोन म्हणणार तुम्ही ? ( Laughter ) ह्या सगळ्या गोष्टी आम्हाला कबूल आहेत. ते कदाचित आमच्या-पेक्षां कांकणभर जास्त काम करित असतील हें ही मी नाकबूल करित नाहीं. माझें म्हणणें इतकेंच आहे कीं, तें काम आम्ही करावयाला तयार असता, तें काम आमचें असतांना लोकांकडे कां, ते वाईट करतात असेंहि म्हणणें नाहीं. आमच्या कामांत आमच्या हितास निर्बंध घातल्यानें आमचीं मनें निःशक्त होऊं लागलीं आहेत. आमच्या आंगाचें हुरुप कमी होऊं लागलें आहे. नामर्दपणा वाढत चालला आहे म्हणून हें आम्हाला नको आहे. हे शिकलेले नाहीं म्हणून ते नको असें माझें म्हणणें नाहीं. चांगले आहेत व्यापारी आहेत. तुम्हाला तुमच्या दुकानीं तुमच्यापेक्षां एकादा हुषार मुनीम मिळणार नाहीं काय; असतील परंतु तुम्ही त्या मुनीमाच्या हवालीं दुकान कराल काय आणि बाजूला राहाल. तो पैसे देईल तेवढे घेऊन ? व्यापारांत हा प्रश्नच आहे. कोठेंहि झालें तरी तो प्रश्नच आहे तर इकडच्या प्रांताची ही अशी व्यवस्था झाली. बडो-द्याचें काय झालें. बडोद्याच्या इतिहासाकडे पहा. बडोद्याच्या इतिहासांत असे लेख आहेत. आणि तेथें त्यास कांहीं क्रमानें करतां आलें. तसें कांहीं येथें क्रमानें झालें नाहीं. बडोद्याच्या महाराजांची गादी कायम ठेवावी लागली. त्याला कांहीं पूर्वपरंपरा आहे. हा इतिहासाचा भाग आहे. पूर्वीं बडोद्याची व्यवस्था किंवा बडोद्यावर देखरेख पुण्याकडून होत असे. आणि बाकीचे बडोद्याच्या राजांनीं केलें. दुसऱ्या इतर राजांनीं केलें असतें. तेव्हां आतां येथें जर शिकून तयार झालां तर बडोद्यांत जाऊन नोकरी मागतो. पुण्यांत

मुंबईंत शिकलेले लोक आहेत ते Distt: Magt: तेथें आहे. मुनसफ तेथें आहे. सुभे आहेत, दिवाण तेथें आहेत, नायब दिवाण हायकोर्ट जज्ज तेथे आहेत. तेथें ते लोक कामें करीत आहेत बिनबोभाट कामें चालली आहेत तर मग येथें चालण्याला हरकत काय आहे ? पुणें आणि सातारा या प्रांतांतील लोक जाऊन बडोद्याचा राज्यकारभार जर चालवितात, तर तोच राज्यकारभार त्याचप्रकारें या आमच्या प्रांतांत चालविण्याला त्यांना हरकत कोणती ? कोणी घेतली आहे हरकत ! राष्ट्राचे दोन विभाग होऊन एक भाग मराठी राष्ट्र कांहीं एका ऐतिहासिक कारणामुळें इंग्रज सरकारच्या ताब्यांत गेला, एक राहिला संस्थानिकांच्या ताब्यांत. या राष्ट्रांतील माणसें काम करण्याला लायक आहेत, असें एक भाग सांगतो. दुसऱ्या भागांत ते नालायक आहेत असे अधिकारी म्हणतात आणि आम्हीहि त्याचा शब्द झेलून आम्हीही त्यासारखे वेड्याप्रमाणें म्हणावयाला लागतों. दोन प्रमाणें दोन बाजू आहेत. तर मग स्वराज्य म्हणजे काय पाहिजे आहे. आतां आपल्या लक्षांत येईल कीं, बडोद्याची जी व्यवस्था आहे तीच पुणें सातारा यांची करायला काय हरकत आहे ? राहील इंग्रज सरकारचें राज्य तें बडोद्यावरहि आहे. बडोद्याचा संस्थानिक कांहीं स्वतंत्र राजा नाहीं. पुण्यामध्यें पेशवाई चालू असतांना वसईचा तह १० आणे ६ आणि असा झालेला होता. पुण्याचें संस्थान राहिलें असतें, तर त्यांनाहि त्याची वेवस्था करतां आली असती, निजामच्या राज्यामध्यें तीच वेवस्था आहे, स्वराज्य म्हणजे इतकें.—जे हक्क नेटिव्ह संस्थानांना आहेत, जे हक्क बडोद्याला आहेत, शिंदेसरकारला आहेत, तशाच प्रकारें पुणें सातारा मध्य भागाचें एक संस्थान करा आणि त्यांना हे हक्क द्या. मात्र एक त्यामध्यें फरक करावयाला पाहिजे. आतां आम्हाला पिढीजाद संस्थानिक मात्र चालावयाचा नाहीं. आम्हाला आम्ही निवडलेला कोणी तरी एक अध्यक्ष निवडावा लागेल. एवढ्या फरकानें जी व्यवस्था नेटीव संस्थानांची आहे ती जो प्रांत मराठ्यांची राजधानी होती त्या प्रांताला ती संस्था व्यवस्था द्यावयाची नाहीं, आणि जे प्रांत या प्रांतावर अवलंबून होते, त्या प्रांतांना ती मिळावी हें केवळ एक ऐतिहासिक कोडें किंवा विसंगतता आहे. याला कांहीं कारण नाहीं. आम्हीं कां तसें होऊं नये ? मी आपल्याला सांगितलें कीं, गायकवाड शिंदे सरकार यांनीं पैसे आणि फौजा लढाईला युरोपांत पाठविल्या आहेत. आमच्या ताब्यांत असती तर आम्हीहि तेंच केलें असतें. ब्रिटिश राज्य जाणें किंवा ब्रिटिश राज्य राहणें या

गोष्टीशीं याचा कांहींएक संबंध नाहीं. परंतु अधिकारी वर्गाची, सत्ता राहणें न राहणें एवढा भेद आहे. हा व्यवस्थेंत भेद आहे. मूळ जी साम्राज्याची सत्ता तिच्यामध्यें भेद नाहीं मला वाटतें कीं, पूर्वी Lawrence साहेबांनीं असें सुचविलें होतें कीं, ही जी स्वराज्याची चळवळ चालली आहे–त्याचें असें म्हणणें होतें कीं, हिंदुस्थान तोडून निरनिराळीं संस्थानें काढून द्या. तेथें कांहीं तज्ञ ठेवून पर राष्ट्राशीं तह करणें, इंग्रजी राज्यसत्तेला धोका येणार नाहीं अशा प्रकारची लष्कराची किंवा आरमाराची व्यवस्था करणें इत्यादि जे अधिकार तेवढे मात्र आपल्या ताब्यांत ठेवा, ते अधिकार तुम्ही ताब्यांत ठेऊं नका, असें म्हणत नाहीं स्वराज्याचे व्यवस्थेंत हे वरचे Imperial politics मधले प्रश्न आहेत. हिंदुस्थानचे इतर राष्ट्रांशीं संबंध कोणत्या प्रकारचे असावे. अमक्याबद्दल लढाई करावी कीं न करावी आणि ज्या वेळीं परराष्ट्रांशीं संबंध येईल, त्यावेळीं कोणतें धोरण स्वीकारावें हें इंग्लंडानें खुशाल आपल्या ताब्यांत ठेवावें. स्वराज्य मागणारे लोक त्यांत ढवळाढवळ करूं इच्छित नाहींत. आम्हांला जें काय पाहिजे आहे तें हें कीं, आज जशी नेटिव्ह संस्थानामध्यें आम्ही आपली व्यवस्था करतों. त्याच प्रकारें व्यवस्था आमच्याकडे करायला आम्हांला अधिकार पाहिजे आहे. आमचे जें कांहीं कराचें उत्पन्न येतें तें अमुक बाबतींमध्यें खर्च करूं, दारूपासून कमी उत्पन्न झालें तर त्याच्या मोबदला दुसरे कोणते कर बसवावे, तें आम्ही ठरवूं आणि त्याप्रमाणें आम्ही व्यवस्था ठेऊं, व्यापाराची व्यवस्था ठेऊं सगळ्या गोष्टीची आम्ही व्यवस्था ठेऊं, तुम्हीं त्यांत हात घालूं नये, हिंदुस्थानचे लोक दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राकडे जात नाहींत, कां नाहीं ? फ्रान्सला जर्मनीला सामील होतात कीं नाहीं, हे पाहिजे तर पहा, अजुन शंका असेल तर हल्लीं जी कांहीं स्थिती आहे त्यावरून कळून यावयास पाहिजे कीं, हिंदुस्थानचे लोक जर कोणत्याहि एका राष्ट्राशीं संबंध ठेवण्यास तयार असले तर ते इंग्लंडशीं ठेवण्यास तयार आहेत ( Cheers ) इंग्लंड जाऊन या ठिकाणीं जर्मनी येण्यांत आमचा कांहीं फायदा नाहीं. आम्हाला ती गोष्ट नको आहे. दुसऱ्या व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तरी १०० वर्षें आज इंग्लंड येथें आहे जर्मनी नवा येणार त्याचा नवा दम नवी भूक आणि तें चालणार कसें ? आहे तें ठीक आहे राजा दुसरा नको आहे. पण हे जे अधिकार आपल्या हातांतले गेले आणि त्यामुळें आमची पोरक्या पोराप्रमाणें स्थिति होत चालली ह्या सत्तेपैकीं भाग आमच्या ताब्यांत द्या. हें मीच आपल्याला

सांगतों असें नाहीं. हे लॉरेन्स साहेबांनीं म्हटलें आहे, जर हिंदुस्थानांत पुढें सुधारणा करावयाची असेल लढाईनंतर जर कांहीं एक प्रकारें यांची व्यवस्था लावावयाचा सरकारचा हेतु असेल तर सर्व हिंदुस्थानचे निरनिराळे प्रांत करा. त्यांच्या डोक्यांत कांहीं भाषेची कल्पना नव्हती. परंतु आम्ही ती आणखी घालतों. मराठी प्रांताचें असें एक एक संस्थान करा. देशी भाषेचा वाद सुद्धां या स्वराज्यांतच येतो. कोणताहि असा प्रश्न नाहीं कीं जो स्वराज्यावर अवलंबून नाहीं. सामान्य मोकळीक असती तर एक गुजराथी युनिव्हरसिटी झाली असती, एक मराठी युनिव्हरसिटी झाली असती, शेतकी युनिव्हरसिटी झाली असती, परंतु तें करणें आपल्या हातांतील गोष्ट नाहीं; देशीभाषेंतून शिक्षण द्यावें की नाहीं हा केवढा मोठा प्रश्न आहे कीं त्यांत मतभेद होणार आहे ! परंतु येथें चालत नाहीं. इंग्लिश आपले लोकांना फ्रेंच भाषेंतून शिक्षण देतात ? जर्मन इंग्लिश भाषेंतून ? तुर्क फ्रेंच भाषेंतून देतात काय ? इतकीं उदाहरणें डोळ्यांपुढें असतांना त्यांच्यावर आम्ही त्रासून कॉलमच्या कॉलम लेख लिहावे हे कां ? हे म्हणतात तसें हल्लीं का[illegible]ात नाहीं सत्ता नाहीं म्हणोन. आमच्या पोरांना काय शिकवावें हें ठरविण्याची सत्ता तुमच्या ताब्यांत नाहीं. तुम्ही इतके लोक शाळेत पोरांना पाठवितां परंतु तिकडे त्यांची वाट काय ? होईल तें होईल. याचा विचार नाहीं. तात्पर्य हल्लीं कोणताहि प्रश्न असा नाहीं, कीं, जो स्वराज्यावर—सत्तेवर अवलंबून नाहीं. आज फर्ग्युसन कॉलेजमध्यें युनीव्हरसिटींत रानडे वगैरे सगळ्यांनीं प्रयत्न केले. परंतु वळवावयाचें कोणाला ? सरकारला ? त्यांच्या देशांत काय व्यवस्था आहे हें त्यांना माहीत होतें. तुमच्या देशांत कां नको ती. इंग्रजी शिक्षण सगळ्यांना देऊन ७।८ वर्षें इंग्रजी भाषा शिकवावी लागते. आयुष्यांतील आठ वर्षें कांहीं लहान सहान नाहींत. असें कोठेंही नाहीं कोणत्याही सुधारलेल्या देशांत ही व्यवस्था नाहीं. असें असतांना जर तुमचें या स्वराज्याकडे लक्ष जात नाहीं. तर कांहीं तरी तुमच्या डोळ्यांला विकार झाला आहे, हें खास समजा. ( cheers ) जें कांहीं सांगावयाचें असेल जी प्रार्थना सरकाराची करावयाची असेल, ती सत्ता देण्याकरितां प्रार्थना करा. दुसऱ्याकरितां करूं नका. या राज्यामध्यें आम्हांला मुख्य गोष्टी पाहिजे आहेत. कोठेंही गेलें तरी अखेरीला आमचें अडतें तें मीं आपल्याला सांगितलेंच आहे. शिक्षणाचा साधा प्रश्न आहे. दरगांवीं शाळा पाहिजेत. कोठून आणावयाचा आम्ही पैसा ? सरकारला कर देतों. ते फुकट देतों ? इंग्लंडांत पद्धत आहे ती आम्हांला शिक्षण देण्याक-

रितां या. पैसे आहेत तिजोरींत, दुसऱ्या कामाला उपयोगी पडतात दिले जातात. आम्हांला ज्या गोष्टी जरूर आहेत, तिकडे मात्र ते खर्च होत नाहींत. म्हणोन अखेरीस जें सांगितलें कीं, हिंदुस्थान हा मोठा देश आहे. भाषावार त्याची वांटणी करा पाहिजे तर मराठीचा भाग निराळा काढा, गुजराथीचा निराळा काढा, पण हिंदु मुसलमान त्यांत कसे शिकवावयाचे ? यांच्या बद्दलही मी बोलणार आहें. कानडामध्यें फ्रेंच आणि मुसलमान लोकांची वस्ति आहे. तेथें इंग्रज मुत्सद्याला तें ठरवितां आलें तर मुसलमान आणि हिंदु यांना कसें चालावें हें कां त्यांना ठरवितां यावयाचें नाहीं ? मग हल्लीं या गोष्टी न देण्याच्या बाबतींत या सबबी आहेत. या न देण्याच्या सबबी आहेत. अशी तुमची दृढ बुद्धि झाली पाहिजे. हिंदुस्थानचीं जर याप्रमाणें निरनिराळीं संस्थानें केलीं. बंगाल प्रांत निराळा त्या प्रांतावर इकडचा एक संस्थानिक न नेमतां मी म्हणतों कांहीं वर्षें युरोपिअन गव्हर्नर नेमला तरी चालेल. लोकानियुक्त अध्यक्ष मिळविण्यापूर्वीं काय होत होतें. विलायतेंतून गव्हर्नर आस्ट्रेलियांत जात होता त्यांना कौन्सिलमध्यें ते सांगतील त्याप्रमाणें काम करावें लागे. येथें उलट तुम्हांला काय गोष्टी पाहिजे असल्या तर काउन्सिल मध्यें रेझोल्यूशन आणावा मारून खटाटोप करावा आंकडे गोळा करावे त्याला एकही पैसा मिळत नसतो. बाकीच्या कौन्सिलांना पगार असतो. यांनीं फुकट मेहनत करावी आणि अखेरीस ठराव नापसंत होतो. पास झाला तर सरकारावर सक्ति नाहीं. त्यांनीं तो अमलांत आणावा म्हणोन. तो पोरखेळ आहे. ज्याला तो पोरखेळ वाटत नाहीं. त्या मानानें तितका त्यांच्यामध्यें राष्ट्राबद्दल अभिमान कमी आहे असें मी समजतों ( Cheers ) कांहीं हातांत न देतांना कोणत्याही प्रकारची सत्ता आपल्या ताब्यांत नसतांना शीतें टाकून झुंजवायची गोष्ट आहे. तशांतला हा प्रकार आहे. यापासून पुढें जर कांहीं हक्क मिळतील. सत्ता ताब्यांत येईल, त्याची ही पायरी आहे म्हणून जर आम्हांला दिलें असेल तर त्याची किंमत आहे. नाहीं तर त्याची कांहीं किंमत नाहीं. होतें काय ? चांगल्या सुशिक्षित लोकांना २।४ घटका झुंजावयाचे कसे याची ही विद्या आहे. यासाठीं स्वराज्यानें होणार काय मागतों आहों काय ? हें लक्षांत आणा, स्वराज्यानें आम्हीं असें मागतों आहों कीं, सर्व हिंदुस्थानभर अशा प्रकारचीं अखेर संस्थानें होऊन त्या संस्थानांत पहिल्यानें विलायतेहून आलेलीं इंग्रजी माणसें—अखेरीस लोकांनीं निवडलेले अध्यक्ष राहून सर्व राष्ट्रासंबंधानें जे कांहीं प्रश्न आहेत. यांचे निराळें कौंसिल ठेवावें. युरोप, अमेरिका युनायटेड स्टेट्समध्यें जशी व्यवस्था आहे त्यांची निरनिराळीं लहान संस्थानें होऊन त्यांचें ऐकीकरण करण्याला त्या ठिकाणीं

ता.

जसें काँग्रेस आहे. त्याच प्रकारचे अधिकार Imperial Council चे अधिकार हिंदुस्थान सरकारानें आपले ताब्यांत ठेवावे. आणि हल्लीं जे निरनिराळे ७।८ प्रांत आहेत. त्यापेक्षां पाहिजे तर आठांचे वीस प्रांत करा आणि लोकांना ज्याप्रमाणें सुलभ पडेल अशा तऱ्हेनें, त्यांना पसंत होईल, त्यांच्या हातांत सत्ता राहील. अशा तऱ्हेनें या प्रांताची व्यवस्था लावा. हेंच स्वराज्याचें मागणें आहे. स्वराज्याचें मागणें ह्मणजे बादशहाला काढा असें नाहीं. कदाचित् या व्यवस्थेकरितां कांहीं ठिकाणीं इंग्रजी अंमलदार तुह्मांला आणावे लागतील. कबूल आहे गोष्ट, पण ते अंमलदार आमचे राहतील, लोकांचे राहतील. लोकांचे नौकर ह्मणोन राहतील, ते आपले धनी ह्मणून राहणार नाहींत जी कांहीं आतां हिंदुस्थानची सुधारणा ह्मणोन करावयाची ती सुधारणा घडवून आणण्याला केवळ आमच्या कडच्या लोकांची बुद्धि पुरी पडणार नाहीं. आह्मांला इंग्लंडांतून अमेरिकेंतून लोक आणावे लागतील, पण ते लोक आह्मांला जबाबदार राहतील. बेजबाबदार राहणार नाहींत. तेव्हां एका दृष्टीनें विचार केला तर युरोपीअन लोकांच्या विरुद्ध ही चळवळ आहे असें कांहीं ह्मणतां येत नाहीं. जबाबदार कोणाला ते आपल्या स्वतःला कीं लोकांना ? ही जबाबदारी जोंपर्यंत आमच्याकडे आली नाहीं. त्यांची जबाबदारी आमच्या सत्तेखालीं आली नाहीं. तोंपर्यंत ही अशीच चालणार ! तोंपर्यंत आह्मीं कोणत्याहि दिशेनें प्रयत्न केले तरी ते वायफळ होणार तोंपर्यंत दुसऱ्या कोणत्याहि बाबतींत आह्मीं हालचाल केली तरी ती लंगडी पडून उद्दिष्ट हेतु जो आहे तो कधींहि सिद्धीस जाणार नाहीं. ज्या राष्ट्राला आपलें कल्याण करावयाचें स्वातंत्र्य नाहीं. ज्या राष्ट्राला असुक एक गोष्ट मनांत आली असतां ती अंमलांत येऊन त्याप्रमाणें सुरू होणें, अशा तऱ्हेची व्यवस्था आपल्या हातांत सत्ता नाहीं. तोपर्यंत लोकांनीं तुम्हाला भरवून तुमचें पोट भरेल असें मला वाटत नाहीं. आतां ज्याला इंग्रजीमधें Despotic rule ह्मणतात. एकतंत्री सत्ता-त्या सत्तेनें लोकांना कल्याण व्हावयाचें नाहीं. ही गोष्ट कळली. कांहीं लोकांच्या मनांत ही गोष्ट बिंबली आहे, त्यासाठीं तुम्ही प्रयत्न करा. हें सांगण्याचा माझा उद्देश आहे. जर माझे शब्द त्याला कमी पडले असेल तर तो माझा दोष आहे यांत कल्पनेचा कांहीं दोष नाहीं. ती निर्दोष आहे. इतक्या सगळ्या गोष्टी, त्याचीं निरनिराळीं स्वरूपें एकाच व्याख्यानांत आपल्यापुढें मांडतां येत नाहींत. ही जी मीं संस्थानाची कल्पना सांगितली यांत काय काय व्यवस्था असावी यांत कोणते हक असावे. जी व्यवस्था इंडियन आक्ट १८६८ चा आक्टप्रमाणें कॉनसालीडेशन बद्दल झाला आहे. त्यांत

कोणत्या तऱ्हेची दुरुस्ती केली पाहिजे. इत्यादी पुष्कळ प्रश्न आहेत. आणि ते मी एक नाहीं ४, १० व्याख्यानें दिलीं तरी पुरे पडण्याची नाहीं. आमचें तत्व एक आहे. एवढ्याच बद्दल व्याख्यानांत काय तें सांगावयाचें आहे. तुमच्यापैकीं जे लोक बुद्धीनें पैशानें किंवा दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेनें या गोष्टीचा विचार करण्याला अधिकृत असतील त्यांना या गोष्टी पाहिजे आहेत. असें आपोआप कळून येईल. हें मिळेल कीं नाहीं. हें मिळेल कीं नाहीं हें विचारावयाचें काय ? मिळविणें ही त्यांच्या हातांतील गोष्ट आहे. मला हा प्रश्न मुळीं कळत नाहीं. इतकी तुम्हीं खटपट करतां नाहीं मिळालें. उद्योग करावयाचें तर आपल्या हातांत आहे. मिळेल कीं नाहीं ही आपल्याला दृष्टी नको. उद्योग करा, जें तुम्ही काम कराल त्याचा कांहीं तरी परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं. मनाची दृढ समजूत ठेवा. राज्यांत स्वतंत्रता कोणीं मनुष्यांनीं मिळविलेली आहे कीं नाहीं. इतर राष्ट्रांतून काय देवता वरून पडल्या होत्या ! तुमची हिंमत नसेल तर मिळणार नाहीं. मी साफ सांगतों. हिंमत असेल तर आज नाहीं उद्यां मिळेल, १०।२० वर्षांनीं मिळेल. परंतु तुमचा उद्योग पाहिजे आहे त्याकरितां, तुमचे धर्माचें तत्व आहे कीं, " कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन " तें कशाला म्हटलें आहे गीतेमध्यें ? पुजेला जाऊन देवळांत पुराण सांगून शेरभर तांदुळ मिळविण्याकरितां ! श्रेष्ठ धर्म हीच गोष्ट सांगतात. पाश्चिमात्य इतिहास हीच गोष्ट सांगतो. इतकें सगळें असून आपण विचाराल कीं, आपले कसें होईल कार होईल ? " यथा मृतपिंडकृताः " &c. मातीचा गोळा आहे. आम्ही त्याला विष्णु म्हणवितों. त्याला शिव म्हणवितों. आणि त्याची पूजा लोकांनीं करावी. इतकी त्याच्या ठिकाणीं योग्यता आणतों. अहो अगदीं मातीचा गोळा, ज्याला हालचाल नाहीं. जमीनीवर टाकला असतांना थब्बदिनीं खालीं पडतो. त्या गोळ्यावर कांहीं कृतीनें, कांहीं उद्योगानें, संस्कारानें आपल्याला स्वरूप देतां येतें. तर त्या मातीच्या गोळ्यापेक्षां सजीव जे हे आपले पिंड आहेत. मातीच्या गोळ्याला एक प्रकारचें स्वरूप देतां आलें नाहीं. तर तो तुमचा दोष आहे असें म्हटलें पाहिजे त्यांना स्वरूप देणें शक्य आहे. घाई करूं नका. यांत ( घाईंत ) कांहीं मिळावयाचें नाहीं. निश्चयानें जर तुम्ही कराल तर मातीच्या गोळ्याला निराळ्या प्रकारचें स्वरुप येतें. ही गोष्ट शास्त्रांत आहे. सिद्ध आहे. अनुभवानें सिद्ध आहे. प्रमाणानें, इतिहासानें सिद्ध आहे इतकी साक्ष तुमच्यापुढें मांडली असतांना जर तुमचें समाधान होणार नाहीं. तुमची खात्री होणार नाहीं तर देशाच्या नूतन अभ्युदयाची गोष्ट तरी बोलण्याची सोडून द्या. आमचें डोकें सतावूं नका. या गोष्टी घडणाऱ्या

आहेत घडल्याच पाहिजेत. असा विश्वास पाहिजे. त्या विश्वासानें कामें होत असतात. तो विश्वास जेथें नाहीं, तेथें काय करावें. हे कांहीं देत नाहींत देऊं ह्मणतात तेवढेंच.| या ही बुद्धी नको, कांहीं दिलें तर घेऊं नका असें माझें ह्मणणें नाहीं. दिलें तेवढें घ्या, अधिक मागा, मागणें आपलें सोडूं नका ( Laughter )आह्मांला अमुक रुपये पाहिजे तुह्मी शंभर दिले दुसरीकडून शंभर घ्या अशी कां तुमची बुद्धी व्हावी ? शंभरांतील ही देऊं नाहीं तर आतां काय बोलतां त्यांचे विरुद्ध (Laughter ) आह्माला हजार पाहिजे आहेत. हजार रुपये आमच्या पदरांत पडतील, तेव्हां आमची तृप्ती होईल. शंभरांतील एकदशांश जर दिले तर आह्मी आभार मानूं ( Laughter ) आभार मानणार नाहीं असें नाहीं. हा मनुष्यस्वभाव आहे. माझा कागद खालीं पडला आणि तो तुह्मी मला दिला ह्मणजे मी Thank you ह्मणणार. मनुष्याची ही मनोवृत्ती आहे. ती सोडून द्या असें मी सांगत नाहीं. परंतु या मनोवृत्तींत ज्या कांहीं महत्वाकांक्षा आहेत, त्या संपादन करण्यांत मनुष्याचें मनुष्यपण आहे. त्या मनोवृत्तीला त्या एका उद्योगाला, त्या एका ध्येयाला या सर्व बाकीच्या मनोवृत्ती नोकरासारख्या वागविल्या पाहिजेत. इतकें होईल तेव्हां स्वराज्य हातांत पडेल. स्वराज्य हें कांहीं फळ नाहीं. कीं लगेच तें आकाशांतून तोंडांत पडेल. तोंडांत घालायला आणखी एक मनुष्य लागतो. ही अशी कृती आहे; आणि याकरितां हा आरंभ झालेला आहे. आतां माझ्या हातांत माझे मित्र तात्यासाहेब यांनीं जो एक कागद दिला आहे तो अशाच प्रकारचा आहे. कृतीला हिंदुस्थानांत थोडा थोडा आरंभ झाला आहे. मद्रासेस बीझांट बाईनीं होमरूल लीग काढली आहे. येथेंही आह्मी काढली आहे. आणि याच प्रमाणें बंगाल्यांत किंवा इतर ठिकाणीं लवकर होमरूल लीग निघेल. कदाचित् कॉंग्रेस हा प्रश्न हातीं घेऊन तेच स्वतः लीग काढतील तर बाकीच्या लीग तिच्यामध्यें मिसळून जातील. उद्योग एकच करावयाचा. हा उद्योग एक आणि तुह्मी करणारे आहां. फायद्याचा प्रश्न आहे. स्वराज्य आह्मांला मिळवावयाचें आहे. तें कोणत्या प्रकारचें मिळावयाचें हें सांगितलें. त्यानें हल्लींच्या स्थितींत पुढें काय फरक पडेल, तें सांगितलें. लॉर्डांच्या सभेला अशीं स्वप्नें पडायाला लागलीं आहेत. लॉर्ड हार्डींगसाहेब यांनीं सांगितलें. सिव्हिलियन लोकांना थोड्या काळांत तुमचे अधिकार तुमच्या हातांतून तुह्माला लोकांना द्यावे लागणार. आपल्या विरूद्ध पक्षाचे जे लोक आहेत या कामांत त्यांना वाईट स्वप्नें पडावयाला लागलीं आहेत. ( Laughter ) आणि तुह्मी मात्र नालायक:— आह्मी नाहीं घेणार हे. हा कोठचा आग्रह ? ( Laughter ) याची उपपत्ती काय ?

तर त्यांना अशीं स्वप्नें पडूं लागलीं आहेत. या तऱ्हेची कांहीं तरी व्यवस्था करावी लागणार असें त्यांच्या बुद्धीनें घेतलें आहे. तुम्हांला उद्योग करावयाचा तो एक करावयाचा पहिल्यानें सर्व देशभर चळवळ करून प्रत्येक मनुष्याची अशी खात्री करून दिली पाहिजे कीं, हेंच आमचे ध्येय आहे. याकरितां आम्ही खटपट करण्याची आहे. एवढेंच नव्हे तर कांहीं तरी व्यवस्था आम्हांला काय पाहिजे ती मागणी कायम केली पाहिजे. विलायतेंत जाऊन लोकांची तशी खात्री केली पाहिजे. आणि पार्लमेंट सभेंत ज्या वेळीं या विषयाचा वादविवाद होईल, त्या वेळीं त्या सभेपुढें आपला हा हेतु योग्य तऱ्हेनें मांडला पाहिजे. ती योग्य तऱ्हा म्हणजे इंडीयन आक्ट ( act ) हल्लीं जो आहे त्याची दुरुस्ती करण्याबद्दल पार्लमेंटमध्यें बील आणिलें पाहिजे. हें आम्हांला मागावयाचें आहे कीं, हा कायदा आम्हाला दुरुस्त करून द्यां. कंपनी ज्या वेळीं गेली ( East India Company) आणि राणी सरकारचें राज्य आलें, तेव्हां हा कायदा दुरुस्त केला, म्हणजे त्यांत किरकोळ दुरुस्ती केली. त्यांत आम्हांला अमुक तऱ्हेची दुरुस्ती पाहिजे आहे. आणि ती केवळ आमच्या हिताकरितां नाहीं तर साम्राज्याचे हिताकरितां आपल्याला पाहिजे आहे. अशा तऱ्हेची मागणी त्यांच्यापुढें मागणें हें ह्या उद्योगाचें काम आहे. हा उद्योग सर्वांच्या साह्यानें, सर्वांच्या अनुकूलतेनें झाला पाहिजे. याबद्दल मतभेद राहतां कामा नये. moderates आणि nationalists यांचें एकच ध्येय, एकच मागणी मांडून एकच मिळविण्याचें आहे. अशी भावना ठेवून जो हा उद्योग करावयाचा त्याकरितां होम रूल लीग म्हणोन निराळी संस्था काढली आहे. कॉंग्रेसपुढें हा विषय मांडला गेला आहे. परंतु कॉंग्रेस ही वर्षांतून एकदा मिळणारी असल्यामुळें एकदांची संधी गेली, म्हणजे दुसरे वर्षी—परंतु वर्षभर हा उद्योग आम्हांला करावयाला पाहिजे आहे. हें कॉंग्रेसला कबुल झालें आहे. अशा बुद्धीनें ही लीग आम्ही काढली आहे याला विशेष खटपट नाहीं. हें ध्येय कबूल करा, ध्येय मागण्याचा आम्हांला अधिकार आहे. आज जी पैशाची मागणी केली आहे ती इतकीच कीं, प्रत्येक मनुष्यानें एक रुपया द्यावा. २ रुपये Admission बद्दल आहेत, पण हे द्यावयाचे नसेल तर निदान एक रुपया द्या. ३० कोटींमध्यें लाख माणसें मिळालीं नाहींत तर हिंदुस्थानबद्दलच्या गप्पा तरी बोलावयाच्या सोडा. कान किटऊं नका आमचे. मला वाटत नाहीं कीं, एक वर्षापेक्षां अधिक या चळवळीला यश यावयाला वेळ लागेल. वर्षाची वर्गणी एक रुपया ठेवली आहे. १०।२० वर्षें चळवळ करावयाला नको आहे. अशी वेळ आली आहे तर या चळवळीकरितां एक रुपया तुमच्या खिशांतून काढण्या इतका स्वार्थत्याग करण्याची जर तुमची बुद्धी

नसेल तर मग या व्याख्यानाला तरी येऊं नका. म्हणजे एवढ्या मोठ्यानें बोलावें लागणार नाहीं. कांहीं करावयाचें असेल तर तुम्हांला एवढेंच करावयाचें आहे. बाकीची व्यवस्था या संस्थेंतील लोक करावयाला तयार आहेत. याकरितां पुष्कळ जागोजाग या तऱ्हेचीं व्याख्यानें द्यावीं लागतील. लोक गोळा करावे लागतील लोकांना समजावून सांगावें लागेल. पोलीस बंद करावयाला आले. येथें नाहीं तर दुसऱ्या ठिकाणीं जाऊन मिळालें पाहिजे. त्या ठिकाणीं पोलीस जाण्यापूर्वी आपण गेलें पाहिजे. पिच्छा याचा सोडावयाचा नाहीं. हे कांहीं सुखासमाधानानें मिळेल असें समजुं नका एक रुपया हा कांहीं नाहीं. मनाचा निश्चय पाहिजे आहे. कोणी विचारायाला आलें तर इतके तुम्हीं स्पष्ट सांगायाला पाहिजे कीं, हें जे ध्येय आम्हीं मागतों हें कायदेशीर आहे. आम्ही त्याचे मेंबर होऊन आम्हीं एक रुपया दिला आहे. आम्हांला ती गोष्ट पाहिजे आहे. इतके निर्भीडपणें तुम्हीं सांगितलें पाहिजे. इतकें सांगावयाचें धैर्य नसेल तर मग गोष्ट निराळी आहे. अगदीं सगळ्या हिंदुस्थानास, तुम्हांस नाहीं, तुमच्या वंशजांस कदाचित् ही गोष्ट बरी वाटेल. असा मला भरंवसा आहे इच्छा जरी तुमची नसली तरी ही गोष्ट व्हावयाला पाहिजे. तुम्ही नाहीं तर तुमच्या पिढीचे लोक प्रयत्न करितील. परंतु तुम्हांला गाढव म्हणतील. हें जर सोसून घ्यावयाचें असेल तर माझी हरकत नाहीं. तें मिळणार अशी माझी स्वतःची खात्री आहे. तुम्ही आपला उद्योग काय करावयाचा ही गोष्ट लक्षांत आणा. कदाचित् पोलीसचा त्रास होईल मागें, नाहीं असें नाहीं. कां वर्गणीदार झाला, कां मेंबर झालां कां ? होय झालों. म्हणोन सांगायाला पाहिजे एवढा कायदा आहे. दुसरें होत नाहीं खटला झाला तर यांतील वकील पैसे न घेतां चालवितील. ( Laughter) एक रुपाया या कामाला दिला. हा राजद्रोह नाहीं. याचे मेंबर होणें हा कांहीं राजद्रोह नाहीं. यापेक्षां (१ रुपया देण्यापेक्षां आणि मेंबर होण्यापेक्षां) तुह्माला कांहीं करावयाचें नाहीं. बाकी काम करण्याचा बोजा ही लीग आपल्या आंगावर घेत आहे. तर अशावेळीं महाराष्ट्रांतील लोकांनीं गप्प बसावें ! कोणीही असो, मुसलमान, हिंदु मारवाडी असो, सगळे आम्हांला पाहिजे आहेत. नको असें कोणी नाहीं. यांत जाती भेद धर्माचा भेद नाहीं यांत, हे हिंदुस्थानाकरितां काम करावयाचें आहे. मागें जसें एक ठिकाणीं मी सांगितलें कीं, तुमच्या व्यापारामध्यें असें आहे कीं, एक आणा आपल्या नफ्यापैकीं गोरक्षणाकरितां ठेवितात. अशी एक संवय आहे तुम्हाला. मी असें विचारतों कीं इकडे सुद्धां एक आण्यापैकीं एक पैसा अर्धा पैसा आम्हांला व्यापारी लोकांनीं कां देऊं नये. हिंदुस्थान ही मोठी गौ आहे लहानसहान गौ नाहीं. त्या गौनें तुम्हांला जन्म दिला आहे. त्या

गौच्या उद्योगावर तिच्या फलद्रुपतेवर, तिचें दुध पिऊन तुम्ही आपला उदरनिर्वाह करित आहां. त्या गौला विसरावयाचें आणि त्याचा जमाखर्च पहावा तर एक आणा एक आणा नांवें घातला आहे. ( गोरक्षणाकरितां ) कशाला काढला तर गाईला चारा घालण्याकरितां कसायाचे हातून सोडवावयाला, येथें आह्मी कामाशिवाय आज मरतों आहों. परंतु तुम्हांला ही गौ आहे. ही कोठें कल्पना येते. ती कल्पनाच येत नाहीं. हें धर्मरक्षणाचेंकाम आहे, हें गौरक्षणाचें काम आहे. हें राष्ट्राचें काम आहे, राजकीय उन्नतीचें काम आहे, हें धर्माचें आहे. उन्नतीचें आहे. हें सर्व लक्षांत आणून यथाशक्ती जी कांही तुम्हांला मदत होईल ती मीं सांगितलीच आहे कीं, एक रुपया माणसापेक्षां अधिक आह्मी मागत नाहीं, ज्याला ती शक्ति आहे त्यांनीं एकदां तरी हा रुपया या संस्थेला देऊन गौचें रक्षण कर-ण्याचें श्रेय घ्यावें. हें मोठे काम आहे. गौचे जे पुत्र आहेत ते जर काळजी करणार नाहीं तर गोपुत्रांना बैल ह्मणतात. तसें तुह्मांला ह्मणावें लागेल ( Laughter ) साधारण गोपुत्रांना जें लोकामध्यें नांव आहे तें ह्मणावें लागेल. येवढ्या मीं आपल्याला गोष्टी सांगितल्या. ही संस्था निर्माण झाली आहे. उद्योग सुरू झाला आहे. तिच्यावर संकटें आलीं, तर तीं आम्ही सोसायाला तयार आहों, तीं सोसलींच पाहिजेत सुस्त म्हणोन ( बसोन ) सगळ्याचा निर्वाह लागावयाचा नाहीं. यासाठीं अशा तऱ्हेनें मदत करा, याप्रमाणें कार्याला मदत करा, मग ईश्वर तुम्हांला सोडणार नाहीं अशी माझी खात्री आहे. ईश्वराच्या कृपेनें या गोष्टी साध्य झाल्या पाहि-जेत. आम्ही मात्र उद्योग केला पाहिजे, फार जुनें तत्व असें आहे कीं, God helps them who help themselves हें ऋग्वेदांतील तत्व आहे. ईश्वर अवतार घेतो केव्हां ? तुम्ही जेव्हां त्याच्याकडे गाऱ्हाणीं नेऊन देवाची प्रार्थना कराल तेव्हां. फुकट अवतार ईश्वर घेत नाहीं, आळशी लोकांकरितां ईश्वर अवतार घेत नाहीं. उद्योगी लोकां-करितां ईश्वर अवतार घेतो. म्हणोन उद्योगाला लागा. दुरुस्ती कायद्यांत कोणत्या प्रका-रची करावी. हें सर्व लोकांना आज सांगण्याची वेळ नाहीं. इतक्या प्रत्येक गोष्टीबद्दल एवढ्या मोठ्या सभेंत त्याची चर्चा करणें कठीण आहे. यासाठीं सामान्यतः मी आप-ल्याला ज्या चार गोष्टी सांगितल्या, काल ज्या कांहीं सांगितल्या त्या दोघांचें एकीकरण करा, उद्योगाला लागा, आणि परमेश्वर तुमच्या प्रयत्नाला यश देवो अशी परमेश्वराची अखेर प्रार्थना करून मी आपलें भाषण पुरें करितों ( Cheers ) ( टिळक महाराजकी जय from the audience )

Deshpande Pleader from Sheogaon ह्मणालेः—कालपासून होम रूललीगचे सेक्रेटरी आमच्यापैकीं बऱ्याच माणसांकडे आले. त्यांनीं आम्हांला

हकीकत सांगितली, कांहीं २१५ माणसें आम्हीं मेंबर झालों आहेंत मी खुद्द येथें सांगतों कीं, मला एका अर्थानें सांगावयाला वाईट वाटतें कीं, खरोखर बाबू अरविंद घोस यांनीं सांगितल्याप्रमाणें आम्हीं माणसें विकारवश नाहीं. नुसत्या बुद्धीचीं आहेंत. करूं कीं करूं नको. असला मनामध्यें वादविवाद करून प्रसंग गेला कीं गोष्ट सांडली; अशांतलीं माणसें आहेंत. म्हणूनच कालपासून आमच्या गुरुवर्यांनीं आमच्या सन्मान्य लो. टिळकांनीं आपल्यापुढें सारखा कंठशोष केला असतांना बंगाल्यांत ज्या गोष्टी सहज घडून येतात त्यांतील एक लक्षांश येथें घडून येऊं नये ही लाजिरवाणी होय. सुरेंद्रनाथ बानर्जी हे अशा एखाद्या प्रसंगीं उभे राहिले तर त्यांच्या अंगावर बायकांच्या हातांतल्या सोन्याच्या बांगड्या फेंकल्या जातात, आणि आमच्या येथें ज्यांना आम्हीं चांदीच्या करंड्यांतून मानपत्र अर्पण करितों, ज्याला मोठ्या भाविक बुद्धीनें बोलावतों, त्यांच्या पाया पडतों, ते आपल्यापुढें केवळ सत्कार्याकरितां यापेक्षां दुसरें कोणतेंही कार्य नाहीं, अशी आपली पक्की खात्री केल्यानंतर मोठ्या कळकळीनें उपदेश करून फक्त आपल्याला काय पाहिजे, तर निश्चय असें सांगितलें. त्यांनीं आज येथें पैसे द्या, इतकेंही पण म्हटलें नाहीं. आणि मला वाटतें कीं, खरोखर नगर जिल्हा फार मागें आहे. कालपासून आपण जें ऐकतों आहों कीं, प्रत्येक ठिकाणीं शहरांतील गोष्ट सोडून द्या. खेडेगांवांत कोणाच्या पाठीमागें आहेत. अनुयायी मी नाहीं. होय असें ह्मणण्याला एक तयार नाहीं अशा माणसांना बहुधा काळजी फार वाटते. अशी स्थिती असते. अशा स्थितीमध्यें आह्मी ह्मणजे खरोखर आपल्यापैकीं कोणी असें निघूं नये कीं, यांना सांगावें कीं, आम्ही आहों तयार आम्ही अमुक देतों. लाखोपती मारवाडी का कमी आहेत! परंतु असें कां नव्हे? ते कां ह्मणत नाहींत. त्यांना इच्छा नसते असें नाहीं परंतु छाती नाहीं. छाती पाहिजे आहे. मी म्हणतों आज आपल्या पुढें यांनीं जी एवढी थोरली कालपासून खटपट करून आपल्यास भासविलें, त्याचा परिणाम उद्यां परवा आपल्या मनामध्यें कांहीं यःकश्चित जरी दिसला तरी खरोखर इतक्या श्रमाचें थोडें तरी चीज केलें यापेक्षां जास्त बोलून आपला वेळ घ्यावा अशी माझी इच्छा नाहीं. मेहेरबानी करून माफी असावी. Tilak was then garlanded.

विनायक बळवंत चौकर वकील ह्मणाले कीं, मला कांहीं मंडळींनीं व्यापारी मंडळींनीं आग्रहानें विनंति केली कीं, जि. परिषद भरवावी. अशा प्रसंगीं लो. टिळक आले आणि तुह्मी जर खटपट केली तर ठीक होईल. त्या वेळेस मला वाटलें कीं जर लोकांच्या मनांत अशी बुद्धी उत्पन्न झाली आहे तर त्यांना मदत करावी. त्या वेळेस मी त्यांना कबूल केलें

कीं, तुमची खरोखर अशी इच्छा असेल, तर तुम्हांला वचन देतों कीं कसेंही करून मी त्यांना घेऊन येतों आणि त्या वचनाप्रमाणें मी त्यांना (टिळकांना) पत्र लिहिलें होतें. त्या पत्रावर त्यांनीं सांगितलें कीं, माझी प्रकृती अतिशय अस्वस्थ आहे. मला उष्णता सोसत नाहीं. मी बेळगावांस गेलों होतों परंतु त्याचा ताप मला पुढें ८ दिवस पुढें भोगावा लागला होता. त्यामुळें सिंहगडास थंड हंवेंत येऊन पडलों आहें. आणि माझी अशी स्थिती झाली आहे परंतु त्यांनीं सांगितलें कीं तुमचा आग्रह असेल तर मी नाहीं म्हणावयाचें मला धैर्य नाहीं. परंतु हें पत्र येण्याच्या पूर्वी मला वाटलें असें करून कांहीं उपयोग नाहीं. मीच जावें-त्यावेळीं ते anne Besant च्या व्याख्यानाला अध्यक्ष होते. रविवारीं त्यांची गांठ घेतली आणि वचन घेतलें. आणि मग मी एथें आलों. त्यांचें एक दिवस हजर राहण्याचें वचन होतें. मी त्यांना सांगितलें कीं, एक दिवस कां होईना तेवढेंच मी मान्य केलें. येण्याचें मान्य करित असलां तर तुम्ही जितके दिवस राहाल तितके रहा. येथें त्यांनीं एक दिवसाचे ठिकाणीं दोन दिवस राहण्याचें कबूल केलें. कालच्या व्याख्यानामध्यें अडथळा आला नव्हता. (Rain) मी बळजबरीनें त्यांच्यावर व्याख्यान लादलें. आणि त्यांनीं तो भार कबूल केला. आपणास आज परमेश्वर अनुकूल आहे एवढें दिसतें. आजही पुन्हां ढग नसतांना आपल्याला याच ठिकाणीं व्याख्यान ऐकावयास सांपडेल. मी असें पाहतों कीं, लो० आल्यानें इतर लोकांनीं त्यांच्या बद्दलची आदरबुद्धी बाहेरून व्यक्त केली, एवढें दिसलें. अंतःकरण पाहण्याचें माझेजवळ सामर्थ्य नाहीं. त्याचा माझेजवळ फोटो नाहीं. लोकांच्या अंतःकरणामध्यें काय आहे हें बाहेरून अनुमान करावयाचें म्हटलें म्हणजे त्यांच्यामध्यें ती ( आदरबुद्धी ) असली पाहिजे. त्यांना देवाप्रमाणें–मनुष्य नाहीं म्हटलें तर–साधु गुरु असतात त्याचे शिष्य असतात. ते शिष्य करितात. ते शिष्य त्यांच्या पायां पडतात. चरणस्पर्श करावा अशी त्यांची इच्छा असते. त्याप्रमाणें हे (टिळक) च्या म्हणजे टिळक महाराजांचा जयजयकार असें म्हणावयाला तयार परंतु आपल्या मधुन ही दाखविण्याची गोष्ट आहे. कीं आज काल तुमच्याकरितां तुमच्या फायद्याकरतां आपलें कर्तव्य असें समजून ते जर येथें आले आहेत व त्यांना आपण कळकळीनें बोलाविलें आहे तर त्यांचें कांहीं आपण चीज केलें पाहिजे तर त्याचा उपयोग आहे. चीज करण्याचीं आपल्याजवळ पुष्कळ साधनें आहेत. आपल्या अंतःकरणामध्यें जें कांहीं आहे तें लोकांना दाखविण्यास पुष्कळ साधनें आहेत. आपण देवाची भक्ती करतों. ती दाखविण्याला जशीं आपल्याला पुष्कळ साधनें आहेत. तशाच प्रकारचीं हींहीं साधनें आहेत. तेव्हां माझे मित्र देशपांडे यांनीं सांगितल्याप्रमाणें जर ही गोष्ट आपल्याला पटली

असेल कीं, आपलीं सर्व गाऱ्हाणीं जीं कांहीं सर्व दुःखें आहेत, ज्या कांहीं आपल्या व्याधी आहेत, त्या सर्व व्याधी जायाला त्या सर्व व्याधी दूर व्हावयाला, इतर अडचणी नाहींशा व्हावयाला जर कांहीं उपाय असेल तर तो स्वराज्य आहे. चष्मा आपण सूर्यासमोर अशा रीतीनें धरा कीं, सूर्याचे किरण एका बिंदूमध्यें पडतील. मग लागलीच काय परिणाम होतो तो पहा! त्याच्या खालीं कागद ठेवा, जळायाला लागतो, सर्व तेज एके ठिकाणीं केंद्रीभुवनामध्यें आणिलें त्याचा हा परिणाम होय. सर्व तेज आपल्यामध्यें जें थोड्या अंशानें आहे तें सर्वांची एकच विषयावर योजना करणें एकच विचार करणेंचें जर तुमच्या मनामध्यें आलें तर त्याचा प्रभाव पडेल. त्या ठिकाणीं दुसरें कांहींही नसावें सर्वांनीं अगदीं विचार केला कीं, आम्हांला स्वराज्य द्याल तर त्याबरोबर स्वराज्य मिळालेंच पाहिजे. लक्षांत ठेवा प्रत्येक जणाच्या मनामध्यें जेव्हां ही एक गोष्ट अशी बिंबून राहील आणि ज्या वेळीं तुम्हांला रात्रं दिवस त्याचा निजध्यास लागेल कीं आपली उन्नती स्वराज्याशिवाय केव्हांही व्हावयाची नाहीं. जर रात्री झोंपेंमधून एखाद्याला जागे केलें. आणि त्याला विचारलें कीं तुला काय पाहिजे तर त्यांनीं स्वराज्य असें म्हटलें पाहिजे. सर्वांचा आवाज एके ठिकाणीं केला तर तोफेसारखा होतो. आयुष्यामध्यें पुष्कळ विषय एके ठिकाणीं येतात, त्याच्यायोगानें विचार फाकतो, परंतु मन एकाग्र होईल तेवढाच त्याचा परिणाम होत असतो. मनुष्याचें मन उईक झालें. मनुष्य मनानें उईक झाला तर ब्रह्मदेवही त्याला स्वतंत्र करूं शकत नाहीं. जर त्याचें मन सुदृढ व बलवत्तर असेल त्याच्या मनामध्यें जी गोष्ट आहे. स्वराज्य हा आपला नैसर्गिक हक्क आहे. याप्रमाणें सर्वांचे मनामध्यें विचार येईल आह्मी प्रजा आहों. आणि प्रजेचे हक्क आह्मांला असतांना ते मिळत नाहींत याला काय म्हणावें. तेव्हां एक गोष्ट सांगावयाची पुष्कळ पुस्तकें वाचावयास सांगावयाचीं नाहींत. एकदां सर्वांनीं दुसरें कांहीं नाहीं. राणीचा जाहिरनामा पाठ करून टाका. चार सूत्रें आहेत तीं पाठ करा. चार प्रकारचे हक्क आपल्याला प्राप्त झाले. ( यामुळें आपल्यावर ) ते यांनींच दिले आहेत तेच हक्क आपल्याला पाहिजे आहेत. आपल्याला दुसरें कांहीं नको आहे. ५८ वर्षांपूर्वी जे आम्हांला हक्क दिले आहेत ते आमचे जन्मसिद्ध हक्क आहेत असें सर्वांनां समजले पाहिजे. एक हजारांशानें भागत असलें तरी तुमच्या हिताची गोष्ट आहे. तुम्हांला फायदा करून घ्यावयाचें, हें मनामध्यें बिंबवणें व देशबांधवांना समजावून देणें आहे. अगदीं विशेषेंकरून तर ही गोष्ट होणार नाहीं. परमेश्वराचा अनुग्रह दिसतो, पाऊस आला असता तर ( आपल्याला व्याख्यान ऐकावयाला मिळालें नसतें ) यावरून परमेश्वराचे मनांत आहे. रा. सा. रानडे

हे म्हणत असत कीं हिंदुस्थान हा परमेश्वराचा आवडता देश आहे. हिंदुस्थानचे लोक परमेश्वराचे अवडते आहेत याकरितां त्यांनीं ( परमेश्वरानें व्यवस्था करून ठेवली आहे, याकरितां बाहेरच्या लोकांना व्याख्यानें अशीं द्यावयाची नाहींत, तर नीट रीतीनें देतील ते या कमेटीनें पाहून मंजुर केल्यानंतर दिले जातील. ह्याला द्रव्यसाह्य पाहिजे आहे. हे कायदेशीर आहे. कलकत्त्याच्या हायकोर्टानें, लॉर्ड हार्डीज यांनींही कबूल केलें आहे. तेव्हां मला आपल्याला एवढीच प्रार्थना करावयाची आहे कीं, आत्मसंरक्षणाकरितां आपण ही गोष्ट केली पाहिजे. केली तरच आपल्याला माणसें म्हणतां येईल. आतां शेवटचें काम एवढेंच राहिलें आहे कीं लो. टिळकांनीं दोन दिवस श्रम घेऊन आमच्या संमतीला मान देऊन येथें येऊन २ व्याख्यानें दिलीं. आणि आपल्यावर अनुग्रह केला, म्हणोन त्यांचे लो. टिळकांचे सर्व लोकांचे तर्फे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

सदाशिव खंडो आळतेकर, कराड हे ह्मणाले त्यांनीं आपल्याला दृढनिश्चयानें होमरूल-लीगचे मेंबर होण्याविषयीं विनंती केली आहे. तात्यासा. केळकर लीगचे सेक्रेटरी बाबुराव गोखले येथें आहेत. ते आपल्याला लीगचे उद्देश कळवितील. मातृभूमीची कळकळ असेल, स्वराज्य प्राप्त व्हावें असें वाटत असेल तर लीगचे मेंबर ह्मणोन नांवें नोंदावी. ( Cheers ) ११-१५ वाजतां रात्रीं संपलें. Audience about 4000.

Compared by B. S. Purandhare.
Comparing fee Rs. 1-12-0.
Copy applied for by Mr. S. K. Damle, Pleader for Mr. B. G. Tilak on—24th July 1916.
Copy ready on—26th July 1916.
Copy delivered on—26th July 1916.

True Copy
G. W. HATCH.

District M
M. S. K.
D. C.

REFBK-0001518
१५१८